RNI No. MAHMUL/2013/54090

ISSN-2349-3984
*Seventh Year Issue - XXX*

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

*(A Quarterly Journal)*

July to September 2021

Peer Reviewed and Refereed Journal with
Journal Impact Factor : 5.868

## MULTIDISCIPLINARY

MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL WORK
Post Box No. 23
Ring Road, Ambajogai, Dist.Beed, (MS) Pin-431 517
E-mail:- manavlok1999@gmail.com
Websit :- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

MANAVLOK RESEARCH BULLETIN

RNI No. MAHMUL/2013/54090 ISSN – 2349-3984
SeventhYear Issue –XXX
Journal Impact Factor 5.868

# MANAVLOK RESEARCH BULLETIN

(A Quarterly Journal)
July – September 2021

**MANAVLOK'S COLLEGE OF SOCIAL WORK, AMBAJOGAI**
Post Box No-23
Ring Road, Ambajogai, Dist. Beed, (MS) Pin -431517
E-mail:-manavlok1999@gmail.com
Website:- www.manavlokcollegeofsocialwork.co.in

**Manavlok Research Bulletin is published quarterly in the Month of March, June, September & December every year by**

**Manavlok's College of Social Work, Ambajogai, Dist Beed.**


**Chairman**
**Dr. Prakash Jadhav**
**Principal**,
Manavlok College of Social Work

**Editorial Board**

**Dr. Nazir Sheikh**
Editor
Manavlok’s College of Social Work

**Dr. Arundhati Patil**
Manavlok’s College of Social Work

**Dr. Rama Pande**
Manavlok’s College of Social Work

**Sukeshini Jogdand**
Assistant Professor
Manavlok’s College of Social Work

**Advisory Board**

**Dr. Keshav Walke**
Professor,
Matru Seva Sangh Institute of Social Work,
Nagpur

**Dr. Smita Awachar,**
HOD,
Department of Sociology, Dr. B.A.M.University,
Aurangabad

**Dr. Gangadhar B. Sonar,**
Chairman
Dept. of Social Work, Karnataka State
Akkamahadevi Women’s University, At Toravi- 586108
Dist. Vijaypura, Karnataka
Email: gbsonar@kswu.ac.in

**Dr. Avinash Gedam**
Mahatma Jyotiba Phule College of Social Work, Chikhali
Road, MIDC, Buldhana

**Dr. Pandit Chavan**
Vasantrao Naik Mahavidyalya, Nanded.

**Dr. Nilesh Deshmukh**
Principal,
Ramrao Sarnaik College of Social Work, Washim.

**Dr. Ashok Chavan**
Assst. Prof. Late Rameshrao Varpudkar College,
Sonpeth, dist. Parbhani

**Dr. Kisan Pawar**
Principal, Lokmanya Tilak Mahavidyalaya,
Wadvani, Dist. Beed

**Dr. Rajkumar Mhaske**
Principal, Jalna College of Social Work,
Ramnagar, Jalna

**Dr. Manisha Manjramkar**
Associate Professor, Jawaharlal Nehru College of
Social Work, CIDCO, New Nanded

**Dr. Sakure S. M.**
Principal, Sushilabai Ramchandrarao
Mamidwar College Of Social Work
Padoli, Chandrapur, 442406



**Date of Publication:-25Sept**

**Payment by Demand Draft/**
**'Principal Manavlok’s College of Social Work, Ambajogai.'**
***Price : Rs. 100/-***

**Typeset By:-** Bibhishan Ghadge, Ramdas Kale, Niranjan Jogi
Manavlok’s College of Social Work, Ambajogai

# MANAVLOK RESEARCH BULLETEIN

## *Theme for forthcoming issue*

---

## MULTIDISCIPLINARY

### October to December–2021

---

Research articles/papers up to 3000-4000 words are invited on the above mentioned themes. The authors are requested to send the articles/papers/review of books etc in the form of hard and softcopy or email. The article should reach before the last date of submission at the below address.

**Principal,**
Manavlok College of Social Work,
Ring Road, Ambajogai Dist Beed.
Maharashtra-431517
Email:- manavlok1999@gmail.com

Manavlok's college invites research papers and reviews for Manavlok Research Bulletin. The research paper must be original and unpublished. The Editor is not responsible for the papers that have appeared elsewhere.
The views expressed in the articles published in the Journal are those of the Authors and the Manavlok's College of Social Work, Ambajogai- Manavlok's Research Bulletin does not hold itself responsible for them.

# CALL FOR PAPERS

## Manavlok Research Bulletin (a Quarterly journal) ISSN: 2349-3984

Manavlok College of social Work (college of social work) has started multilingual (English, Hindi & Marathi) quarterly journal with ISSN No. which publishes in March, June, September and December every year. It is aimed to promote the quality research articles/paper. This journal provides a platform for the researcher, academicians, social work professionals and students from the discipline of social Work.

**Call for Papers: -** Quality research papers/articles are invited in English, Hindi & Marathi language.

**Guidelines for paper submission:-**

- Papers should be typed in MS Word, Times New Roman, Font Size 12
- For Marathi &Hindi use DVB-TTsurekh, Font Size 14
- Full paper should not exceed more than 3000 words.

**Guidelines for Autours :-**

- ABSTRACT (TNR 11 Bold)
- KEYWORDS (TNR 11Bold)
- INTRODUCTION (TNR 11 BOLD)
- HEADING S (TNR 11 BOLD)
- FIGURES AND TABLES (TNR 11 BOLD)
- CONCLUSIONS (TNR 11 BOLD)
- ACKNOWLEDGEMENTS (TNR 11 BOLD)
- REFERENCES (TNR 11 BOLD)

**Format for research article:-**

1. Abstract
2. Key words
3. Introduction
4. Problems/objectives
5. Methodology (coverage, sampling, tools of data collection and data analysis, use of statistics etc)
6. Conclusions
7. References: -References should be embedded in the text in a consistent style, for instatnce, Patil, A.S. 2013. "Social Work Research: An Overview", Aai Publications, Ambajogai.

**Research paper/Article to be sentEmail: -**manavlok1999@gmail.com, **Hard & Soft** copy at College Address

**Subscription Amount:**

1) Annual Individual Membership - Rs. 1000/- + Rs. 160/- (reg. postal charges)
2) Annual Institutions Membership - Rs. 1200/- + Rs. 160/- (reg. postal charges)

(Payment by DemanDraft/M.O in favour of - Principal, Manavlok College of Social Sciences. ambajogai)

3) **Bank Details. :-** Bank of Maharashtra, Branch Ambajogai
A/C/ No.– 60178141511,
IFSC Code- MAHB0000037

**Note:**

New Subscription fees will be effective from 1st July 2015 to onwards.

Impact Factor Calculated by Thomson method.

**Contact:**


- Dr. Prakash Jadhav, Principal, Manavlok's College of Social Work, Ring Road, Ambajogai, 431517 Dist Beed (Maharashtra) Cell No. 7770015050
- Dr.Arundhati Patil - 9422744166, Dr.Rama Pande-9405343510, Lect. Sukeshini Jogdand-9405826977.
- Dr. Sheikh Nazir, Editor, Manavlok Research Bulletin, Manavlok College of Social Work, Ring Road, Ambajogai, 431517 Dist. Beed (Maharashtra) Cell No. 7588162786, 7770015057

# CONTENTS


| Sr. No | Name of the Article | Page No. |
|---|---|---|
| 1. | भोई समाज आणि त्यांचा पारंपारीक व्यवसायांचा अभ्यास विशेष संदर्भ बुलढाणा जिल्हा<br>*दिनेश आनंदा मात्रे* | 2 |
| 2. | निरीक्षणगृहातील मुलांच्या सामाजिक व मानसिक स्थितीचा अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा<br>*प्रा.डॉ. अशोक द. सातपुते* | 8 |
| 3. | अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी व कुटुंबात येणाऱ्या अनुभवाचे अध्ययन; संदर्भ परभणी जिल्हा<br>*राजू ग्यानोबा गायकवाड, प्रा. डॉ. नझीर जब्बार शेख* | 13 |
| 4. | पोलीस प्रशासनामध्ये कार्यरत असणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांना पालकत्वाची जबाबदारी पार पाडत असतांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास (विशेष संदर्भ औरंगाबाद जिल्हा)<br>*सहा. प्रा. यू. एस. बनकर* | 18 |
| 5. | कोविड-१९ आणि व्यावसायिक समाजकार्याची भूमिका<br>*प्रा.डॉ. अविनाश अ. गेडाम* | 25 |
| 6. | मराठवाड्यातील वृद्धाश्रमातील वृद्धांच्या समस्या एक दृष्टीक्षेप<br>*सिताराम विधाते* | 28 |
| 7. | स्त्री–पुरुष यांच्या शेतीतील सहभागाच्या स्वरूपाचे अध्ययन; संदर्भ बीड जिल्हा.<br>*माळवदकर तेजस लक्ष्मनराव, प्रा. डॉ. नजीर जब्बार शेख* | 37 |
| 8. | कोवीड–19 च्या काळात ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांवर व पालकांवर झालेला परिणाम अभ्यास संदर्भ अंबाजोगाई<br>*डॉ. हनुमंत अंगदराव साळुंके* | 44 |

| | | |
|---|---|---|
| 9 | ऊसतोड महिला कामगारांची अभिवृत्तीचा अभ्यास संदर्भ ता. धारूर जि. बीड<br>***महादेव चैतराम चुंचे*** | 51 |
| 10 | मंदिर परिसरातील उपेक्षितांचे अंतरंग (संदर्भ 12  खांबी मंदिर, अंबाजोगाई जि. बीड)<br>डॉ.मोहन मिसाळ | 55 |
| 11 | Women Exploitation And Gender Justice<br>*Mr. S. G. Dhawad* | 59 |

# भोई समाज आणि त्यांचा पारंपारीक व्यवसायांचा अभ्यास विशेष संदर्भ बुलढाणा जिल्हा

***दिनेश आनंदा मात्रे***
संशोधक विद्यार्थी
श्री. सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम
e-mail :- dineshmatre0@gmail.com
Mo. No. 8600114490

**प्रस्तावना :-**

भारत देश हा विविध जाती, धर्म, पंथ यांच्या विविधतेत वाटलेला देश आहे. या आपल्या भारत देशात प्रत्येच जाती धर्माची वेगवेगळी संस्कृती आहे आणि ही आपली वेगवेगळी संस्कृती प्रत्येक समाजाने जपुण ठेवली आहे. या समाजापैकी भोई हा एक समाज आहे. हा समाज एका जाग्यावर कामाशिवाय न थांबता आज इथे व उद्या तिथे अश्या अवस्थेत भटकत आहे. गावो-गावी देशो-देशी व रानोमाळ फिरून आपले जिवन जगत आहे. म्हणून त्यांना भटके म्हटल्या गेले. पोटाची खळगी भरण्यासाठी जे मिळेल ते कामधंदे करण व आपली उपजिविका भागवणं. या कामधंद्यांच्या मागमातुनच भोई जमातींच्या पारंपारीक व्यवसायास सुरूवात झाली. या समाजातील मुख्य व्यवसाय म्हणजे प्रवाशांना नदिपलीकडे नेणे-आणणे, राजदरबारी राज्यांच्या त्यांच्या राणीच्या पालख्या, मेणे उचलणे, डोल्या वाहणे, मासेमारी करणे, गाढवाच्या सहाय्याने दगड, माती, रेती वाहणे, टरबुज-खरबुजांची शेती करणे, फुटाणे भाजुन विकणे हे होय. भोई समाजाचे पारंपारीक चालत आलेले व्यवसाय आजही हे लोक त्याच पारंपारीक रितीने व्यवसाय करतांना दिसत आहेत. आधूनिक पद्धतीने हे व्यवसाय करताना दिसत नाहीत. त्याचं शिक्षणाचं कमी प्रमाण असल्याकारणाने शास्त्रशुद्ध आधूनिक पद्धतीने व्यवसाय कसा करावा याची कल्पनाच नाही. शासनाच्या कोणकोणत्या या भोई समाजासाठी योजना आहत ह्या योजना या समाजापर्यंत पोहचाव्या व त्यांनी आपला पारंपारीक व्यवसाय आधूनिक पद्धतीने करावा व आपली प्रगती करावी. म्हणून या भोई समाजाच्या पारंपारीक व्यवसायाचा वास्तवीक आढावा घेण्यात येत आहे.

**भोई समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:-**

भोई समाज हा भारताचा प्राचिन वंश आहे. ज्याचा उल्लेख रामायन, महाभारत या प्राचिन महाकाव्यात मिळतो. भोई समाज हा शैव धर्माचा वंशज मानला जातो. (शैव धर्म :- भगवान शंकराला व त्यांचे अनेक रूपाला मानणारा व पुजा करणारा धर्म) भोई मुळात वनवासी, भरकंती करणारी जमात आहे. ओरिसातील भोई वंशाचा उल्लेख इतिहासात केला जातो. गोविंद विद्यासागर हा भोई वंशाचा राजा होता. त्यांची सत्ता १८ वर्षापर्यंत चालली. जंगल आणि जमिनीवर अवलंबुन असलेले पाणी, ते नैसर्गिक संसाधनाच्या मदतीने जिवन जगत आले आहे. आणि आजही त्याच नैसर्गिक साधन संपत्तीच्याच माध्यमावर अवलंबुन आहेत. भोई समाज हा १८०० व्या शतकापासुन उडीसा राज्यातील मुळ रहीवासी आहे. परंतु अन्न, वस्त्र, निवारा या गरजा पुर्ण करण्यासाठी हे लोक भटकंती करू लागलेत जसे की, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, आंध्र प्रदेश, पंजाब, जम्मु कश्मीर, राजस्थान, हरियाना, उत्तरांचल, हिमाचल प्रदेश इत्यादी महाराष्ट्र राज्यात भोई समाज प्रामुख्याने मुंबई, नाशिक, धुळे, जळगाव,

बुलढाणा, अकोला पुणे नगर, कोल्हापुर, सोलापूर, सातारा, रत्नागीरी, ठाणे, कल्याण इत्यादी जिल्ह्यात वास्तव्यास आहे. प्राचिन काळात व्यावसायावरून त्यांची जात निर्माण झालेली आपल्याला दिसुन येते. तस्याच प्रमाणे भोई जमातीत काही व्यावसायावरून पोट जाती निर्माण झालेल्या आहेत.

झिंगा भोई, परदेशी भोई, राजभोई, कहार, भोई, गोडिया कहार, धुरीया कहार, किरात, मछूआ, मांझी, जातिया, केवट, ढीवर, धिवर. धीमर, पालेवार, मच्छेंद्र, नावाडी, भोई नावाडी, तारू नावाडी, मल्हार, मल्हाव, बोई, गाढव भोई, खाडी भोई, खारे भोई, ढेवरा, भनारा, भनारी, भनारे, मल्ल, मल्हाह, नावीक, ओडा, ओडेवार, ओडेलु, बेस्तार, बेस्ता, बेस्ती, बेस्तालु, भेनार

(शा.नि.दि. ३० जानेवारी २०१४ प्रमाणे समाविष्ट)

भारत देशात अनेक सत्तांतरे होऊन गेली मोघलाई, शिवशाही, पेशवाई या सर्व राज्यांच्या पदरी भोई जमातींना राखिव स्थान होते.इंग्रजांनी या देशावर १५० वर्ष राज्य केले.बरेच राज्य खालसा करण्यात आले. संस्थानिकांचे तनखे बंद झाले आणि तेव्हापासुन भोई जमातीच्या लोकांचा राजाश्रय संपला व जैवीक गरजा भागवण्यासाठी मिळेल तेथे नोकरी करणे, काही कामधंदा करणे या शिवाय या समाजाला पर्याय उरला नाही, मासेमारी करणे, चणे फुटाने बनवून विकणे, गाढवांचा वापर करून त्यांच्यावर रेती, माती आणी धोंडे वाहून नेणे व त्यावर उपजिविका भागवणे. अशा प्रकारचा व्यवसाय हा समाज करतांना आज दिसत आहे.तसेच नदिच्या पात्रात टरबुज (कलिगड) खरबूज किंवा पालेभाज्याचे उत्पादणे घेणे, शेतमजुरी करणे परंतु शेतिच्या बाबतीत हे लोक निश्चित नसतात.

म्हणुन त्यांची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. त्यामुळे भोई समाजाच्या पारंपारीक व्यवसायाचा आढावा.

**भोई समाजाचा पारंपारिक व्यवसाय :-**

भोई समाजाचा व्यवसाय हा कष्टकरी व्यवसायात गणला जातो. भोई समाजाच्या व्यावसायावरूनच पोटजातींची निर्मिती सुद्धा आली आहे. महाराष्ट्रात सद्य:स्थित भोई समाजाच्या ३८ पोटजाती दिसुन येतात. (शा.न.दि.३० जाने २०१४)

**१) राजांची पालखी उचलणे :-**

देवदेवता धर्मगुरू श्रीमंत सरदार इत्यादी, कांस खांद्यावर वाहून नेण्याचे एक वाहन, पालखीला मराठीत मेणा व संस्कृतमध्ये शिबीका अथवा अंदोलिका म्हणतात.मेणा हा शब्द मात्र प्रामुख्याने सन्मान्य व्यक्तींना वाहून न्यावयाच्या साधनालाच लावलेला दिसतो. पुर्वी मेण्याचा उपयोग पडदानशीन स्त्रिया जाण्यायेण्यासाठी करित. प्राचिन काळापासुन पालखीचे अनेक प्रकार, रूढ होते. लहुशाने सप्तर्षींना पालखी वाहण्यास लावणे. यासारख्या कथा पुराण वाङ्मयात आढळतात. अलिकडच्या काळात देवतांच्या मुर्ती वाहून नेण्यासाठी मुख्यत: पालखीचा उपयोग करतात. ग्राम देवतेच्या यात्रा भरतात तेव्हा उत्सवमुर्तींना पालखीमध्ये ठेवून त्यांची गावातून मिरवणूक काढतात ते पालखी वाहण्याच काम भोई जमात आजही करते आहे. छत्रपती शिवाजी राजे, संभाजी राजे, माता जिजाऊ यांची पालखी उचलून त्यांना एका ठिकाणाहून दूसऱ्या ठिकाणी पोहचण्याचे काम भोई समाज करत असत. त्याच्या मोबदल्यात त्यांना मुद्रा मिळत व त्यावर ते कुटूंबाचा उदनिर्वाह करीत. आजही काही पंणजोबा किंवा आजोबांकडे राजा महाराजांकडून मिळालेली ताम्रपात्र उपलब्ध आहेत.

**२) मासेमारी :-**

राजे, महाराजांचा काळ संपल्यानंतर, मेणे पालखी वाढून नेण्याचे काम बंद पडले. त्यामुळे हाताचा रोजगार निघून गेला. मिळणरी बंक्षीसे बंद झाली.उपासमारिची पाळी आली. राजदरबारातील हे सर्व कामे संपुष्ठात आल्याने भोई समाज हा मासेमारी या व्यवसायाकडे वळला. समुद्रात खाडीत खोऱ्यात, तलाव, नदी, नाल्यात इ. ठिकाणी मासेमारी करतात.

मासेमारीच्या विविध पद्धती आहेत. त्यापैकी काही पद्धती पुढिल प्रमाणे कोणत्याही साहित्याशिवाय (नुसत्या हाताने), माश्यास जखमी करून, गुंगी आणून, गळ वापरून (आमिश दाखवून), सापळे वापरून नरसाळ्यांसारखी स्थिर जाळी वापरून, खोळीसारख्या ओढ जाळ्याने, दोन्ही टोकांच्या खेचण्याच्या जाळ्याने, जाळे फेकुण, जाळ्यात गुंतवून अश्या अनेक पद्धतीने मासेमारी केली जाते.

**३) गाढवाच्या साहाय्याने दळणवळण करणे :-**

बरेचशे भोई गाढव पाळत असत.गाठवाच्या सहाय्याने ते जड माल वाहून ने आन करत. नदिच्या पात्रातील वाळु उपसुन गाढवाच्या पाठीवर गोण्या भरून रेतिची वाहतुक करत असत. वाळू बरोबरच घर बांधण्यासाठी गडीची माती वाहून नेण्याचं कामही गाढवाद्वारे भोई करत असत. त्याच बरोबर दगड, विटा याचीही वाहतूक गाढवाद्वारे केली जात असे. आजही काही ठिकाणी गाढवाद्वारे बरेचशे भोई आपला पारंपारीक व्यवसाय टिकवून ठेवत आहेत. आणि त्या द्वारे आपली उपजिविका भागवत आहेत.

**४) भेळभत्ता, बेदाणे, फुटाणे विक्री :-**

भोई समाजाचा उदरनिर्वाह करण्यासाठी बरेच छोटे - मोटे व्यावसाय करताच त्यांमध्ये चणे - फुटाणे भाजुन विकणे. भेळभत्ता बनवण्यासाठी शेव, चिवडा, पापळी बनवून विकणे, तसेच यात्रा मोहोत्सावात रेवड्या बनवणे व विकणे. तसेच दिवाळीच्या सिजनाला शेरणी बत्तासे बनवून विकतात. होळीच्या सनालाही गाठिचे हार बनवतात व विकतात. हे पारंपारीक उदरनिर्वाह करण्यासाठी चालत आलेले हे भोई समाजाचे व्यावसाय आहेत. आजच्या परिस्थीतीत जवळपास ५० टक्के समाज हे व्यवसाय करतात. हे व्यवसाय करतांना खुप जोखीम पत्करावी लागते. सर्व व्यावसाय हे आगीजवळ तासनं-तास बसुन हे सर्व पदार्थ बनवावे लागतात. हे बनवत असतांना बऱ्याच वेळेस अपघातही होतात. परंतु पोटाची खळगी भरण्यासाठी त्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून नियमित व्यवसाय करित राहतात.

**५) नदी / तलावाच्या पात्रात टरबूज - खरबुजाची शेती :-**

टरबुज - खरबुजाची शेती करणे हा व्यवसायही भोई समाजचा पारंपारीक चालत आलेला व्यवसाय आहे. नदिच्या पात्रात रेतिवर ही शेती केली जाते. या शेतीला खुप मेहनत लागते. नदिच्या पात्रातील गोटे उचलून नुसत्या रेतिवर ही शेती होत असते. तसेच धरणात असणारा ओळा गाळ त्यावर ही शेती केली जाते. यामध्ये नदिच्या पात्रातील ही शेती केली जाते. यामध्ये नदिच्या पात्रातील शेतीपेक्षा कमी मेहनत लागते. पाऊस जर चागंला पडला नाही तर ही शेती करता येत नाही. ही निश्चित अशी शेती नाही. या शेतीला खर्च जास्त असल्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात उत्पन्न होत नाही त्यामुळे बऱ्याचश्या लोकांना ही शेती करणे सोडून दिले व मोल मजुरी करू लागले.

**पारंपारीक व्यावसाय करतांना येणाऱ्या अडचणी :-**

१. दळवळणाचे साधने प्रगत झाल्यामुळे पारंपारीक चालत आलेल्या पाखली, मेणे वाहून नेण्याचा व्यावसाय संपुष्ठात आला. फक्त देवदेवतांच्या पालख्या उचलण्याचा प्रथा तेवढा राहीला आहे. त्यातून मिळणारा रोजगार पुर्णत: बंद झाला आहे.

२. आज निसर्गचक्र योग्य होत नसल्यामुळे पावसाचं प्रमाण कमी जास्त होत असते. त्यामुळे मासेमारीचा व्यवसाय पाहिजे त्या प्रमाणात होतांना दिसत नाही. तलाव, धरण हे लिलाव होत असल्यामुळे पैसेवाल लोक उच्च बोली लावून ठेके घेतात. पैश्यांच्या अभावामुळे भोई लोक लिलावात बोली बोलू शकत नाही. त्यामुळे हे पारंपारीक मासेमारी व्यवसायापासुन दूर होतांना दिसत आहेत.

३. शासनाचे रेती, दगड, माती या संदर्भात नियम कडक होत गेले आहेत. त्यामुळे गाढवाद्वारे रेती, माती, दगड वाहण्याचा व्यवसायही संपुष्ठात येतांना दिसत आहे. तसेच गाढवाचं कमी होत असलेली संख्या प्रमाणही या व्यवसायात अडचण होत आहे. आणि गाढवाचं पालन पोषण करणेही व्यक्तीला परवडण्यासारखे नाही.

४. स्पर्धेच्या युगात कोणत्याही समाजाचा व्यक्ती कोणाताही व्यावसाय करतांना आज दिसत आहे. भोई समाजाचा चालत आलेला भेळभत्ता बेदाने, फुटाणे चा व्यवसाय करणारे लोक विविध कंपन्या वाढत असल्यामुळे पारंपारिक व्यवसायातून बनवून विकणाऱ्या लोकांकडून घेण्याचं प्रमाण कमी होतांना दिसत आहे. विशिष्ट नावाजलेल्या कंपन्या बाजारात भेळभत्ता, बेदाने, फुटाणे पॅकींग करून विकत आहेत. यामुळे पारंपारीक पद्धतीने करणारे व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.

५. आजपर्यंत भटकंती करत आलेला भोई समाज स्वत:च्या जमिनी नसल्यामुळे टरबुज खरबुजांची शेती करतांना दिसते नाहीत. नदी तलावात पावसाच्या अभावामुळे तेथिल शेती व्यवसाय संपुष्ठात आलेला आहे. त्यामुळे टरबुज - खरबुजाची शती करण्याचं प्रमाणही कमी होतांना दिसत आहे.

**भोई समाजाचा पारंपारीक व्यवसाय आधूनिक पद्धतीने करण्यासाठी उपाययोजना.**

१. मासेमारीचे प्रशिक्षण शासनाद्वारे घेतले जाते. त्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आधूनिक पद्धतीने मासेमारी व्यवसायात प्रगती करता येते. प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तांना शासनाकडून मासेमारीचे साहीत्य खरेदी करण्यासाठी कर्ज दिले जाते. त्याचा फायदा आपल्याला घेता येईल.

२. भेळभत्या, बेदाने, फुटाने याचा व्यवसाय करण्यासाठी दुकाण परवाणा काढून जिल्हा उद्योग केंद्राकडून कर्ज मिळवता येते. आणि लघु उद्योग म्हणून हा व्यवसाय करता येतो.

३. मच्छीमार सोसायटी नोंदणी करून त्या संस्थेमार्फत तलाव, धरणे घेता येतात. त्यातून आधूनिक पद्धतीने मत्सव्यवसाय करता येईल.

## पुर्वसाहित्याचा आढावा :- (Review of Literature)

संशोधन करतांना पुर्वसाहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. भोई समाजाच्या इतिहासाबाबत, त्यांच्या पारंपारीक व्यवसायाबाबत इंटरनेटवरील विविध वेबसाईटसचा वापर करण्यात आला आहे. तसेच वर्तमान पत्रातील लेख, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष निरिक्षण, मुलाखत, या प्राथमिक व द्वितिय साहित्याचा समावेश करण्यात आला आहे.

## संशोधनाची आश्यकता (Need of Study)

भोई समाज हा १८ अलुतदारीत येतो. प्राचिन काळापासुन हा समाज आपल्या पारंपारीक व्यवसाया बाबत प्रसिद्ध आहे. परंतु आधूनिक काळात हे पारंपारीक व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. परंतु त्याच व्यावसायावर आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करणारे बरेच भोई समाजातील लोक आहेत. याच पारंपारीक व्यवसायाला धरून आधूनिकतेची कास या भोई समाजाने धरावी व आधूनिक तंत्राच्या सहाय्याने आपला व्यवसाय वाढवावा. हा या संशोधनामागिल उद्देश आहे. भोई समाजात

शिक्षणाच कमि प्रमाण असल्या कारणाने आधूनिक पद्धतीचा वापर होतांना दिसत नाही. आधूनिक पद्धतीने नवनविन तंत्रज्ञानाशी आपला व्यवसाय जोडावा व उत्पन्न वाढवावे ह्या सर्व समस्यांचे निराकरण करण्याची आवश्यक्ता वाटल्यामुळे म्हणून हे संशोधन आवश्यक आहे.

**संशोधन पद्धती (Research Methodology) :-**

सदरिल संशोधनात संशोधन आराखड्यातील चार प्रकारापैकी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन आराखडा घेण्याचे निश्चित केले आहे. कारण की संबंधित विषयामध्ये संशोधकाला भोई समाज आणि त्यांचा पारंपारीक व्यवसाय यांचे विश्लेषण करावयाचे असल्यामूळे हा संशोधन आराखडा निवडला आहे.

**संशोधनाच्या मर्यादा (Limitations of Research) :-**

प्रस्तूत संशोधन विषयावर अध्ययन करण्यासाठी संशोधकाने अध्ययनाचे क्षेत्र म्हणून बुलडाणा जिल्ह्यातील एकुण तेरा तालुक्यांची अध्ययन क्षेत्र म्हणुन निवड केली आहे. या क्षेत्रात वास्तव्यास असलेल्या भोई जमातीच्या पारंपारीक व्यवसाय व व्यावसाया ीक शासकीय योजना आणि व्यावसायाच्या पद्धती एवढ्या पुर्तेच मर्यादीत असणार आहे.

**समग्र (Overal) :-**

संशोधनाचे समग्र हे बुलडाणा जिल्ह्यातील पारंपारीक व्यवसाय करणारे भोई समाजातील व्यक्ती संशोधनातील समग्र आहेत.

**संशोधनाचे उद्देश :-**

१. भोई समाजाचे पारंपारीक व्यवसायासंबंधीत सद्यस्थितीची पडताळणी करणे.
२. भोई समाजाचा पारंपारीक व्यवसायाकडे पाहण्याच्या दृष्टीकोण जाणून घेणे.
३. भोई समाजासाठी असणाऱ्या शासनाच्या विविध व्यावसायीक योजनांचा आढावा घेणे.
४. भोई समाजातील पारंपारिक व्यवसाय प्रक्षिणाचा आढावा घेणे.

**संशोधनातील उपकल्पना (Hypothesis) :-**

१. भोई समाज सद्यस्थितीत पारंपारीक व्यवसाय सोडून इतर व्यवसायाकडे विभागला गेला आहे.
२. भोई समाजाचा पारंपारिक व्यवसायाकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक आहे.
३. भोई समाजासाठी असणाऱ्या शासनाच्या योजना अपुऱ्या आहेत.
४. भोई समाजातील पारंपारीक व्यवसायामध्ये कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण घेतले जात नाही.

**सुचना :- (Suggestions)**

१) भोई समाजांच्या लोकांनी शास्त्रशुद्ध आधूनिक पद्धतीने आपला पारंपारीक व्यवसाय करावा.
२) आजही उदरनिर्वाह करण्यासाठी होणारी भटकंती थांबवून स्थायी व्यवसाय करावा. यासाठी शासनाने प्रोत्साहन द्यावे.
३) शासनाने भोई समाजाला आपला पारंपारीक व्यवसाय आधूनिक पद्धतीने करण्यासाठी त्यांचे प्रशिक्षण वर्ग घेऊन त्यांना आर्थिक मदत करावी.
४) भोई समाजाला आधूनिकतेच्या प्रवाहात आणण्यासाठी शासनाने ठोस पावले उचलावीत.

**निष्कर्ष :- (Conclusion)**

भोई समाज आपल्या पारंपारिक व्यवसायावर जास्त अवलंबुन दिसतो. पुर्वजापासून चालत आलेला व्यवसाय पुढे ढकलतांना दिसत आहेत. परंतु तो पारंपारीक व्यवसाय पारंपारीक पद्धतीनेच

करतांना दिसून आले. त्यांनी अजुनही आधुनिकतेची कास धरली नाही. मत्सव्यवसाय करणारे भोई तेही पारंपारीक पद्धतीनेच मासेमारी करतात. त्यांना आधूनिक प्रशिक्षणाचा व तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे त्यांच्यात बदल होऊ शकला नाही. तसेच आर्थिक परिस्थिती योग्य नसल्यामुळे नविन तंत्रज्ञान विकत घेण्यासाठी पैसा उपलब्ध नाही. शासनाने थोड्या बहूत योजना अमंलात आणल्या आहेत.परंतु त्या कोणकोणत्या योजना आहेत तर तेच या लोकांना माहीत नाही. काही भोई समाजातील लोकांनी आपला पारंपारीक व्यवसायावर आपली उपजिवीका भागत नसल्याने पारंपारीक व्यवसाय सोडून इतर व्यवसायाकडे जातांना दिसत आहे. भोई समाजाच्या पारंपारीक व्यवसायाला कोणत्याच प्रकारचें शासनाचे सरक्षण कवच नसल्याने बरेच नुकसान होतांना दिसत आहे. त्याची भरपाई मिळत नसल्यामुळे त्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

**संदर्भग्रंथ :-**

१. पालखी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई खंड - ९.
२. भोई समाजाचा इतिहास, विकीपिडीया - bhoimangalvivah.com
३. महाराष्ट्रातील मासेमारी जनजाती - wikipedia.com
४. महाराष्ट्रातील भटक्या जामातीची (ब) यादी - wikipedia.com
५. भोई भारत की एक - प्राचिन जाती है - https://m.facebook.com
६. bhoivarvadhu.com
७. https://shodnaganja.inflibnet.ac.in
८. https://hi.unionpedia.org

* * *

# निरीक्षणगृहातील मुलांच्या सामाजिक व मानसिक स्थितीचा अभ्यास विशेष संदर्भ मराठवाडा

***प्रा.डॉ. अशोक द. सातपुते***
कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा
मो. ७५८८९३५३०३

आज भारतातील सुमारे ५० कोटी मुलं जगण्याच्या संघर्षात आपलं बालपण हरवून जगताना दिसतात.यातील ५४ टक्के मुलं ग्रामीण भागात शेती वा शेतीजन्य उद्योगधंदयात राबत आहेत.१५.५ टक्के बांधकाम, १८ टक्के घरगुती कामात, ५ टक्के जॉब तयार करणे व उरलेले ८ टक्के इतर रोजगाराच्या ठिकाणी आहेत.तर एकूण बालमजूरीपैकी सुमारे ८५ टक्के मुलं असंघटित उद्योगात अमानुष पिळवणूकीला आणि वेगवेगळया प्रकारच्या शोषणाला तोंड देत आहेत. अशा जीवघेण्या प्रक्रियेमध्ये आपले जीवन व्यतित करीत असलेल्या बालकांमध्ये समाजाविषयीचे प्रेम हळूहळू कमी होवून त्याचे रुपांतर समाज म्हणजे आपला शत्रु अशी मानसिकता बालकांची होत आहे. तसेच बालकांच्या गरीब, अनाथ तथा दुर्लक्षिततेचा गैर फायदा घेवून काही समाजविघातक घटक आपल्या स्वार्थासाठी बालकांचा वापर करतात व बालकांना गुन्हयाच्या चक्रव्यहामध्ये अडकवितात. त्यामूळे मुले छोटे मोठे गुन्हे करता करता सराईत गुन्हेगर बनतात.

सहज उकळता येण्याजोगा पैसा किंवा इझी मनीचं आकर्षण हे आज तरुणांमधल्या वाढत्या गुन्हेगारी वृत्तीमागचं एक कारण सांगितलं जातं. पालकांना मुलांकडे लक्ष देण्यास वेळ नसणं किंवा संस्कारांचा अभाव, हेही एक मोठं कारण आहे.महाराष्ट्रातल्या बालगुन्हेगारांमध्ये कौटूंबिक वार्षिक उत्पन्न असणाऱ्याचं प्रमाण ५९ टक्के आहे.२५ ते ५० हजार रुपये वार्षिक उत्पन्न कमी असणाऱ्याचं प्रमाण २२ टक्के, ५० हजार ते एक लाख रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या गटातल्या गुन्हेगारांचं प्रमाण चार टक्के आहे. आर्थिक स्तर वाढतो तसं गुन्हेगारांच प्रमाण कमी होत आहे. त्यामुळे दोन ते तीन लाख रुपये वार्षिक उत्पन्न असणाऱ्या कुटूंबातल्या गुन्हेगारांचं प्रमाण दोन टक्के ही आढळत नाही, तर तीन लाखपेक्षा अधिक वार्षिक उत्तन्न असणाऱ्या कुटूंबातले गुन्हेगार तर पाव टक्का ही आढळत नाहीत. परंतू गुन्हे नोंदवले जावू नयेत, यासाठी या वर्गातल्या मुलांचे पालक वजन वापरु शकतात, हे ही लक्षात घेणं गरजेचं आहे.म्हणजेचं बालकाची आर्थिक स्थिती गुन्हा करण्यास मुख्य स्वरुपात जबाबदार आहे.परंतू एकमेव हे कारण नसून त्यामध्ये त्यांची सामाजिक आणि मानसिक स्थिती पण तेवढीच जबाबदार आहे. कारण 'मरता वो क्या नही करता' या युक्तीप्रमाणे बालकांची आर्थिक स्थिती कमकूवत असेल, त्याच्यावर उपासमारीचे संकट असेल, कोणी कायदयामुळे काम देण्यास तयार नसेल आणि अशा स्थितीमध्ये एखादयाने पैशाचे आमिष दाखवून बेकायदेशिर कार्य करण्यास सांगितले तर मुले त्यास सहज होकार देणार, कारण त्याला आपले अस्तित्व टिकवून ठेवायचे आहे, म्हणून मग प्रश्न पडतो बालकांच्या हातून झालेल्या गुन्हयास मुख्य कारणीभूत किंवा मुख्य आरोपी कोण? समाज तर विधी संघर्षग्रस्त मुलांचा शक्यतो हवा तसा स्विकार करत नाही हे सत्य आहे.

आपण पाहतो की समाजात गुन्हेगारी काही प्रमाणात का असेना असतेच गुन्हेगारीच्या शिवाय समाजाची कल्पना करणे कितपत योग्य आहे हे सांगता येणार नाही. तसे पाहता जगातील प्रत्येक देशात

गुन्हेगारी आढळून येते.पण ही गुन्हेगारी जर देशाचे भविष्य समजल्या जाणाऱ्या बालकांमध्ये आढळून येत असेल तर ती धोक्याची घंटा समजण्यास काही हरकत नसावी.

भारता सारख्या विकसनशिल देशात आज बालगुन्हेगारीने कळस गाठला आहे.उत्तर प्रदेश, बिहार, दिल्ली, महाराष्ट्र, पंजाब अशा राज्यात व केंद्रशासित प्रदेशात घडणाऱ्या घटना आपण वर्तमानपत्रात आणि दुरचित्र वाहीणीवर पाहत असतो. आणि याच कारणांमुळे भारतच काय, पण कुठल्याही विकसनशिल देशाच्या प्रगतीला यामुळे नक्कीच खिळ बसते. कारण हे लहाण मोठे गुन्हे करणारी मुले पुढे चालून सराईत गुन्हेगार बनतात. बेल्जीयमचे सांख्यकीय तज्ज्ञ 'अडोल्फ क्वेटिलेट' यांच्या मते पौगंडावस्थेत शारीरिक ताकद आणि उत्कटता त्यांच्या शिखरावर असतात परंतू विवेक बुध्दीचा संयुक्त प्रभाव याला नियंत्रित करण्यासाठी परिपक्व होत नाही. अशा वेळेला या मुलांमध्ये गुन्हा करण्याची प्रवृत्ती सर्वात जास्त असते.

**नमूना निवड :-**

प्रस्तूत संशोधनाकरीता संभाव्यता नमूना निवड प्रकारातील साधा यादृच्छिक नमूना निवड पध्दती मधील लॉटरी तंत्राचा वापर करुन एकूण ९३१ मुलांपैकी ४०० मुलांची निवड नमूना म्हणून करण्यात आली.

**तथ्य संकलन :-**

संशोधन कार्यामध्ये तथ्य संकलनास खूप मोठ्या प्रमाणात महत्व असून तथ्य संकलनाशिवाय संशोधन कार्य पूर्ण होत नाही निष्कर्ष निघूच शकत नाही. म्हणून तथ्य संकलनासाठी प्राथमिक साधनामध्ये मुलाखत अनुसूची, निरिक्षण, तर द्वितीय स्त्रोतामध्ये संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे, मासिके, दस्तऐवज व इतर उपलब्ध प्रकाशित अप्रकाशित स्त्रोतांचा वापर केला.

**संशोधनाचे उद्देश :-**

१. निरीक्षणगृहातील मुलांच्या सामाजिक व मानसिक स्थितीचा अभ्यास करणे.

२. निरीक्षणगृहातील मुलांना उद्भवणाऱ्या समस्यांचे अध्ययन करणे.

बालकांच्या कुटूंबाचा प्रकार जाणून घेतला असता असे दिसून येते की, ३७ टक्के विधिसंघर्षग्रस्त मुले विभक्त कुटूंबातून येतात तर संयुक्त कुटूंबातून येणारे मुले हे २१ टक्के आहेत.म्हणजेच बालगुन्हेगारी आणि कुटूंब व्यवस्था यातील सहसंबंध हा निकटचा असल्याचे दिसून येते.तसेच ५१ टक्के मुलांसोबत कुटूंबातील व्यक्ती वाईट वर्तन करतात तर केवळ ३१ टक्के मुलांसोबत कुटूंबातील व्यक्तींचे वर्तन चांगले असल्याचे आढळते. याचा अर्थ असा होतो की, मुलांसोबत वर्तन करतांना कुटूंबातील व्यक्तींनी त्याचा विचार करणे अनिवार्य आहे किंबहूना जर याकडे दुर्लक्ष झाले तर बालगुन्हेगारीचा जन्म हा कुटूंबातील व्यक्तींच्या वाईट वर्तनातून होत राहील. ५३.५ टक्के मुले हे गुन्हेगारी वर्तन असलेल्या कुटूंबातील आहेत. त्यामूळे मुलास गुन्हेगारीकडे वळविण्याचे कार्य हे कुटूंबातून अप्रत्यक्षरित्या होत असल्याचे स्पष्ट होते.६८ टक्के विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या हातून मारामारी सारखे गुन्हे घडलेले आहेत व याला मुख्य कारणीभूत प्रेम प्रकरण असल्याचे दिसून आले.तर ५.७५ टक्के मुलांनी खुनासारखे गुन्हे केले आहेत.तसेच १३.२५ टक्के मुलांनी चोरी केल्याचे आढळते.आणि ४ टक्के मुलांनी बलात्कार सारखे गंभिर गुन्हे केल आहेत.तर बलात्कार करुन खून करणाऱ्या मुलांचे प्रमाण १.७५ टक्के आहे.तसेच ५६.७५ टक्के विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या गुन्हयामध्ये त्यांचे मित्र मुख्य कारणीभूत आहेत.त्यामुळे मुलांना वाईट मुलांची संगत जर असेल तर मुले गुन्हेगार बनण्याची दाट शक्यता वर्तवली जाते.तसेच मुलांचा सामाजिक दर्जा हा त्याच्या वर्तनावर अवलंबून असतो.तर त्याचे वर्तन हे त्याच्या मानसिकतेवर अवलंबून असते जर मानसिक दृष्टीकोन स्वच्छ व चांगला असले तर त्याचे वर्तन चांगले असते.मात्र त्यांची मानसिक स्थिती बिघडण्याकरीता समाजामध्ये अनेक

स्तरावरुन प्रयत्न केले जातात.त्यामूळे मुले एखादया गुन्हयामध्ये अडकतात आणि आपले आयुष्य आणि भविष्य अंधाकारमय करतात.४६.७५ टक्के मुलांचा समाजामध्ये तिरस्कार केला जातो तर २५.२५ टक्के मुलांविषयी समाजातील लोकांमध्ये सतत राग व चिड असल्याचे आढळते. ३६.७५ टक्के मुलांना सार्वजनिक कार्यक्रमध्ये सहभागी करुन न घेतल्याचा अनुभव आहे आणि त्याचे मुख्य कारण म्हणजे संशय होय. ५१.७५ टक्के मुलांना समाजातील गैरसमजूतीमूळे अपमानास्पद वागणूक मिळाली तर ३९.०० टक्के मुलांना गैरसमजूतीमूळे हाणमार तसेच संशय घेवून चोरीचा आरोप करुन पोलीसांच्या ताब्यात दिले असल्याचा अनूभव आहे. तसेच ७२ टक्के मुलांना स्वत:च्या कुटूंबामध्ये पसंत केले जात नाही. तर ५८.२५ टक्के मुलांना कौटूंबिक वादामूळे स्वत: घर सोडावे लागलेले आहे. व ७९ टक्के मुलांनी रात्रीचा मुक्काम रस्त्यावर, बगिच्यामध्ये, बस व रेल्वे स्थानकावर व इतरत्र सार्वजनिक ठिकाणी केल्याचे आढळते.तसेच शेजारच्या लोकांसोबत वाद असलेल्या मुलांचे प्रमाण ७६.७५ आहे म्हणजेच मुलांना सतत वादविवाद किंबहूना असुरक्षित वातावरणामध्येच जीवन जगावे लागते.

निरीक्षणगृहामध्ये ५५.२५ टक्के मुलांना ताण-तणाव जाणवतो तसेच २५ टक्के मुलांना भिती वाटते याचा अर्थ मुलांना निरीक्षणगृहामध्ये असुरक्षितता सतत वाटते.तसेच ५१.२५ टक्के मुले राग आल्यावर व्यसन करतात, तर २७.५४ टक्के मुले मारामारी करीत असल्याचे आढळते. तर ५०.५ टक्के मुलांना न्यायालयाची प्रक्रिया जलद गतीने होण्याची अपेक्षा आहे तर ३५ टक्के मुलांना निरीक्षणगृहामध्ये चांगली व्यवस्था करावी अशी आशा आहे. तसेच ६२.७५ टक्के मुलांना समाजातील लोकांनी माफ करुन स्विकारावे व संशयी वृत्तीने पाहीले जावू नये असे वाटते तर २४.५० टक्के मुलांना समाजातील लोकांनी काम अथवा रोजगार द्यावा असे वाटते. निरीक्षणगृहातील मुलांना समाजिक, आर्थिक, शैक्षणिक तसेच आरोग्यविषयक समस्या उद्‌भवत असल्याचे स्पष्ट होते याचे विश्लेषण सदरील प्रकरणामध्ये सविस्तररित्या केले आहे.

**निष्कर्ष :-**

१. निरीक्षणगृहातील मुलांचा सामाजिक व मानसिक अभ्यास करतांना असे दिसून आले की, या मुलांच्या हातून घडलेले कृत्ये याला जबाबदार फक्त तो मुलगाच नाही तर तो ज्या वातावरणात राहतो ते वातावरण, त्याचे कुटूंब, मित्र, समाज व्यवस्था देखील तेवढीच जबाबदार आहे. त्यामुळे या मुलांना गुन्हेगार ठरवणाऱ्या प्रत्येकाने हे ही तपासून बघावे की प्रत्यक्ष अप्रत्यक्ष यासाठी आपण ही जबाबदार आहोत.

२. विभक्त कुटूंबातील विधिसंघर्षग्रस्त मुलांचे प्रमाण हे ६७ टक्के आहे तर संयुक्त कुटूंबातील मुलांचे प्रमाणे २१.५ टक्के आहे म्हणजेच विभक्त कुटूंब पध्दती बालगुन्हेगारीस संयुक्त कुटूंब पध्दतीच्या तुलनेत जास्त जबाबदार आहे.

३. कुटूंबातील व्यक्ती मुलांसोबत चांगला व्यवहार करीत नसल्याने तसेच त्यांच्यासोबत सतत वादविवाद करत असल्याने, त्यास कंटाळून मुले बाहेर पडली व गुन्हेगारीच्या विश्वामध्ये आली असल्याचे आढळते.

४. मारहाण करणे, चोरी करणे या गुन्हयाबरोबरच खुन, बलात्कार करुन खून अशा गंभिर गुन्हे करणाऱ्या मुलांचे प्रमाण कमी जास्त प्रमाणात आढळते किंबहूना दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते.

५. पालक आपल्या मुलांची तुलना दुसऱ्या तथाकथीत 'हुशार' मुलांसोबत करतात त्याचा नकारात्मक परिणाम मुलांवर होतो व मुले चिडचिड करतात आणि ज्या मुलाचे उदाहरण दिले जाते त्या मुलास शत्रू मानूण त्याचे बरेवाईट करण्याकरीता विधिसंघर्षग्रस्त मुले प्रयत्नशिल असतात.

६. तब्बल ७७ टक्के मुलांना पालक कडक शिस्त व चूक झाल्यास शिक्षा देत असल्यामूळे त्याचा वाईट परिणाम हा मुलांची मानसिक स्थिती नकारात्मक होण्यास व सामाजिक दर्जा खालावण्यास झाला असल्याचे दिसून येते.

७. टि.व्ही. वरील गुन्हयांसदर्भातील कार्यक्रम पाहून ५२.५ टक्के मुले गुन्हा करण्यास प्रोत्साहीत झाले तसेच सदरील कार्यक्रमामुळे मुलांचा मानसिक दृष्टीकोण बदलून गंभिर गुन्हे केल्याचे वास्तव समोर आले.

८. निरीक्षणगृहामध्ये मुलांना असुरक्षितता वाटण्याचे कारण कर्मचाऱ्यांचे अयोग्य वर्तन तसेच बाल न्याय समितीचा, कुटूंब अथवा इतर व्यक्तींचा पाठींबा नसणे तसेच कोणी मारहाण करील याची कायम भिती वाटणे असणे होय.

९. मुलांना व्यसन लावून व आमिष देवून बेकायदेशिर कृत्य करुन घेणाऱ्या व्यक्तीमध्ये मित्र, नातेवाईक, शेजारी तसेच प्रशासनातील कर्मचारी व पोलीस ही सहभागी असल्याचे कबूली मुले देतात.

१०. मुलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्य विषयक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने, व त्यांना कोणाचा आधार नसल्याने ते सतत त्याचा बदला घेण्यासाठी प्रयत्न करतात व पुन्हा पुन्हा गुन्हयाच्या चक्रव्यूवहामध्ये अडकतात.

११. मुलांना राग आल्यावर ते व्यसनाकडे वळून गुन्हे करतात. त्यामूळे व्यसन हा घटक मुलांना गुन्हेगार बनविण्यामध्ये कारणीभूत असल्याचे निदर्शनास येते.

१२. मुलींना प्रेमात पाडण्याकरीता गुन्हे करणाऱ्या मुलांचे प्रमाण ५२.७५ आहे. मुलींचे आकर्षन आणि समाजामध्ये दबदबा निर्माण करण्याकरीता मुले सर्रास कोणते बेकायदेशिर कार्य करण्याकरीता तयार असतात.

१३. मुले सामुहिक स्वरुपात गुन्हे करीत असल्यामुळे त्यांचा अत्मविश्वास वाढतो आणि जबर/ गंभिर गुन्हे करण्याकडे कल वाढतो. यामध्ये लहान मुलांना शिक्षा दिली जात नाही म्हणून प्रौढ गुन्हेगार मुलांना हाताशी घेवून गुन्हे करीत असल्याचे स्पष्ट होते.

१४. चुकीच्या सल्ल्यास बळी पडून मुले व्यसन तसेच अश्लिल तथा बेकायदेशिर कृत्य करतात. मात्र त्यांना केलेल्या कृत्याविषयी पुर्णत: समज व कायद्येविषयक जागरुकता नसल्याचे दिसून आले आहे.

१५. संगणक आणि मोबाईलवर खेळल्या जाणाऱ्या गेममुळे मुलांमध्ये हिंसक प्रवृत्ती निर्माण होते व या हिंसक प्रवृत्तीमूळे मुले इतरांसोबत चांगले वागत नाहीत किंबहूना इतरांना शत्रू समजून त्यांचासतत राग करतात व संधी मिळताच बदला घेण्याचा प्रयत्न करतात.

**शिफारशी :-**

**१.** बाल न्याय अधिनियम हा खूप अभ्यासपूर्ण पध्दतीने व संबंधीत तज्ज्ञांनी बनवलेला आहे. पण प्रत्याक्षात हा अधिनियम सर्वसामान्य तसेच बालकांशी संबंधीत असणाऱ्या लोकांना सुध्दा हा निट समजलेला नाही. त्याकरीता शासनाने सदरील कायदयासंदर्भात विशेष कार्यशाळाआयोजित करणे गरजेचे आहे.

**२.** निरीक्षणगृहातील कर्मचारी वर्गाकरीता विशेष प्रशिक्षण वर्ग आयोजित करुन त्यांच्या कार्यावर काटेकोर नियंत्रन ठेवणारी समिती गठित करावी.

**३.** समाजातील व्यक्तींनी मुलांकडे वाईट अथवा संशय वृत्तीने पाहू नये. मुलांना छोटया-मोठया चुकांसाठी समज देवून माफ करावे त्यांच्यामध्ये सुधारात्मक व सकारात्मक बदल घडून येण्यासाठी हातभार लावावा. त्यांच्या समस्या समजून घेवून त्यांना चांगले मार्गदर्शन तथा सल्ला द्यावा. शाळेत शिक्षकांनी

जीवन मुल्य शिक्षणाचे धडे विदयार्थ्यांनी अंगिकारावे यासाठी विशेष परिश्रम घ्यावे व पालकांनी सुध्दा असे संस्कार मुलांवर होतील यासाठी आग्रही रहावे.

**४.** पौंगडावस्थेतील मुलांवरती त्यांच्या मित्रांचा खूप प्रभाव असतो. म्हणून प्रत्येक पालकांनी आपल्या पाल्यांचे मित्र कोण आहेत? कसे आहेत यावर लक्ष ठेवणे गरजेचे आहे.

**५.** संशोधना दरम्यान असे ही लक्षात आले की, आपल्या मुलांची तुलना पालक नेहमी दुसऱ्या मुलांशी करतात. त्या मुलावरुन त्याला सारखे सारखे हिनवले जाते व त्याचा आत्मविश्वास कमी केला जातो त्यामुळे पालकांनी या गोष्टीकडे लक्ष देणे गरजचे आहे.

**६.** आपली मुले टि.व्ही. वरती कोणते कार्यक्रम पाहतात याकडे पालकांनी लक्ष देणे आवश्यक आहे.

**७.** मुलांना कोणते चित्रपट आवडतात, कोणते नायक आवडतात व का आवडतात हे पालकांनी जाणून घेण्याचा प्रयत्न करावा जेणे करुन मुलांची रुची, मानसिकता पालकांच्या लक्षात येईल व त्याला चांगले काय? वाईट काय? हे देखील समजावून सांगता येईल.

**८.** पालकांनी काही ठराविक कार्यक्रम जसे, शृंगारपूर्ण चित्रपट, गाणी तसेच सी.आय,डी. क्राईम पेट्रोल, सावधान इंडीया असे गुन्हयाशी संबंधीत कार्यक्रम मुलांसमोर पाहू नये व मुलांना देखील पाहता येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

**९.** मोबाईल व संगणकावरील गेम पेक्षा मैदानी खेळाची आवड निर्माण करावी त्यासाठी तसे पोषक वातावरण निर्माण करणे ही पालकांची जबाबदारी असावी.

**१०.** आपल्या मुलांवरती चांगले संस्कार करण्यासाठी म्हणून शक्यतो संयुक्त कुटूंब पध्दतीचा स्विकार करावा.

**संदर्भ ग्रंथ सूची :-**


१. नायडू अमिता (२०१३), प्लॅटफॉर्मनंबर झिरो, समकालीन प्रकाशन, पुणे

२. जगताप उदय (२०१४), यारी भाईगिरी दुनियादारी : कल्पना बुक डिलर्स प्रकाशन, पुणे

३. गावस्कर रेणु, (२००९), आमचा काय गुन्हा?, शब्द प्रकाशन, मुंबई

४. लवटे सुनिलकुमार, (२०१२), खाली जमीन वर आकाश, मेहता प्रकाशन, पुणे

५. साळीवकर संजय, (२०१६), सामाजिक समस्या आणि समाज सुधार चळवळ, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर

६. शिलेदार मीना, (२०१४), मुलांच्या मनात दडलंय काय?, मनोविकास प्रकाशन, पुणे

७. भाटवडेकर मनोज, (२०१०), आपलं मूल यात नाही ना?, अक्षर प्रकाशन, मुंबई

८. माने माणिक चं., (१९९९), गुन्हेगारीशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापुर

९. लोटे रा.ज., (१९९५), भारतील सामाजिक समस्या, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर

१०. भांडारकर, (१९९०) भारतातील सामाजिक समस्या, एस.चंन्द प्रकाशन, नवी दिल्ली

११. कुळकर्णी पी. के., (१९९८), भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर

१२. काचोळे दा. धों, (२००१), गुन्हा-समाजशास्त्र, कैलास प्रकाशन, औरंगाबाद


* * *

# अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी व कुटुंबात येणाऱ्या अनुभवाचे अध्ययन; संदर्भ परभणी जिल्हा

**मार्गदर्शक**
प्रा. डॉ. नझीर जब्बार शेख
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय,
अंबाजोगाई जि. बीड

**संशोधक**
राजू ग्यानोबा गायकवाड
एम.एस.डब्ल्यू.

**प्रस्तावना**

जगातील एकूण अपंग पैकी दोन त्रितीयांश दिव्यांग विकसनशील देशात राहतात. जगभरातील दिव्यांग वेगवेगळ्या प्रकारचे भेदभाव व सामाजिक विलागीकारणाचा अनुभव घेताना दिसून येतात. लोकांच्या दिव्यांग बाबत नकारात्मक दृष्टीकोन, दिव्यांगाना अनेक बाबी पासून वंचित ठेवत असतो. नकारात्मक दृष्टिकोनामुळे दिव्यांग व्यक्ती दुर्लक्ष करणे, कमी महत्वाकांक्षा आणि पूर्वग्रह यामुळे अपोपाच दिव्यांग व्यक्ती समाजाच्या मुख्य प्रवाह पासून दूर जातात. दिव्यांग बाबत असलेल्या पूर्वग्रहा मुळे समाज दिव्यांगाना संयोजीत करत नाहीत. समाजाच्याष्टिकोनामुळे दिव्यांग व्यक्ती आरोग्य, शिक्षण व इतर सेवा घेऊ शकत नाहीत. रोजगाराचा प्रश्न तर असतोच यामुळे दिव्यांग व्यक्तीची परिस्थिती हलाखीची होते.

**रामदास आणि मिश्रा (1987)** यांनी विषयी भारतीया समाजात प्रचलित असलेल्या परंपरागत दृष्टिकोनाचा आढावा घेतलेला आहे. हिंदू धर्मात पुनर्जन्म हि संकल्पना अस्तीतीवत आहे. पूर्व जन्मात केलेल्या कर्मामुळे व्यक्ती दिव्यांग होतो वा पूर्व जन्मातील केलेल्या पापामुळे या जन्मात व्यक्ती हा दिव्यांग होतो अशी धारणा दिसून येते. तसेच दिव्यांगाच्या उपचारातही पूर्वग्रह दुषित दृष्टीकोन दिसून येतो. दिव्यंगासाठी प्रचलित असलेल्या पद्धती अतिशय क्रूर असलेल्या दिसून येतात. धार्मिक ठिकाणी अशा व्यक्तीना ठेवल्याजाते किंवा सोडून देण्यात येते.

**हुसेन, अत्किंसन आणि अंडरवूड (2002)** :– दिव्यांग व्यक्तीचा सामाजिक दर्जाचे विश्लेषण करण्यासाठी बांगलादेश मधील दोन गावात प्रस्तुत अभ्यास करण्यात आला. सामाजिक दर्ज्याचे अवलोकन करण्या करिता संशोधक त्या गावात प्रत्यक्ष राहून नोंदी घेतल्या. या अभ्यासाकरिता संशोधकाने सूक्ष्म निरीक्षण या पद्धतीचा अवलंब करून दर्जाचे विश्लेषण केले. या संशोधनात असे निदर्शनास आलेले आहे की, दिव्यांग व्यक्तींत रोजगाराचा अभाव असल्यामुळे दिव्यांग व्यक्तीचे उत्पन्न अतिशय कमी होते. तर काही दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या कार्यक्षमता कमी झाल्यामुळे व त्यांना ते काम दिव्यांगात्वामुळे करता येत नाल्यामुळे त्यांना त्यांच्या कामातून कमी पण करण्यात आले होते. दिव्यांग व्यक्ती विषयी समाजात प्रचलित असलेल्या धारणामुळे व त्यांच्या विषयी समाजात असलेल्या नकारात्मक दृष्टिकोनामुळे दिव्यांगामुळे दिव्यांग व्यक्तीच्या विवाह, शिक्षण, रोजगार व मानसिकता यावर नकारात्मक परिणाम झालेला दिसून आला. प्रस्तुत संशोधनात असे निदर्शनास आले की, दिव्यांग स्त्री व मुली यांना समाजाच्या नकारात्मक दृष्टिकोनाचा सामना करावा लागतो याचा परिणाम त्यांच्या मानसिक व सामाजिक आरोग्यावर झालेला दिसून येतो.

**गुप्ता, भावना आणि अरोरा, रीम्पी (2020):**–दिव्यांग व्यक्ती करिता असलेल्या विविध वैधानिक तरतुदी असून सुद्धा दिव्यांग व्यक्ती अद्यापही विविध प्रकारचे भेदभाव याचा अनुभव घेत आहेत यामुळे ते सामान्य व्यक्ती सारखे समानतेचे हक्का पासून अलिप्त राहतात. या लेखात दिव्यांग व्यक्ती बरोबर करण्यात येणारे भेद्भावास जवाबदार असणाऱ्याकरणाचा उल्लेख केलेला आहे. प्रस्तुत लेखात दिव्यांग व्यक्ती बाबत असलेल्या चुकीच्या संकल्पना, ज्ञानाचा अभाव, कुटुंब व समुदायात दिव्यांग व्यक्ती विषयी असलेल्या जागृतीचा अभाव वा दिव्यांगाच्या हक्क व अधिकारा विषयी समाज व कुटुंबातील अज्ञान हे दिव्यांगाविषयी भेदाभेद व चुकीच्या संकल्पना विकसित होण्यास जवाबदार असतात.

**मेहरोत्रा (2004)** समाज व कुटुंबाकडून मिळणारी वागणूक व दिव्यांग महिला म्हणून त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन यामुळे या महिलांत नैराश्य, ताण, स्वाभिमानाचा अभाव या बाबी दिसून येतात तसेच दिव्यांग असल्यामुळे समाज व कुटुंब यांना सामान्य व्यक्ती सारखे स्वीकारत नाही किंवा त्यांच्या पासून स्वतःला दूर ठेवतात म्हणून सामाजिक विलगता सारख्या बाबी या महिलांत दिसून येतात.

**संशोधनाचे उद्देशः—**

प्रस्तुत संशोधन विषयास अनुसरून पुढील उदेश विकसित करण्यात आले होते.

1. दिव्यांग अस्थिव्यंग व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या अनुभवाचे अध्ययन करणे.
2. अस्थिव्यंग दिव्यांगाप्रती कुटुंबाच्या व्यवहाराचा आढावा घेणे.
3. अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींच्या मर्जीनुसार जीवन जगण्या बाबत स्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धतीः—**

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादाः—**

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती हि परभणी जिल्हा असून ग्रामीण भागात राहणाऱ्या व शारीरिक अपंगत्व असणाऱ्या 18 वर्षावरील स्त्री व पुरुष यांच्याशी संबंधित असून शारीरिक अपंगत्वामुळे त्यांना येणाऱ्या अडचणी, त्यांच्या मानवीय हक्काची स्थिती, त्यांना समाजात मिळणारी वागणूक, समाजाचा दृष्टीकोन, कुटुंबात मिळणारे सहकार्य, त्यांच्या पुनर्वसनासाठी असलेली कायदे, दिव्यांगासाठी असलेल्या योजना व केंद्र आणि राज्य सरकारचे उपक्रम या बाबी पर्यंतच मर्यादित आहे.

**नमुना निवडः—**

प्रस्तुत संशोधन विषयास अनुसरून असलेला समग्र हा परभणी जिल्हाभर विखुरलेला असून, या समग्रा बाबत गाव निहाय अचूक संख्या उपलब्ध नाही. तसेच जनगणना 2011 नुसार फक्त जिल्ह्याचीच संख्या उपलब्ध असल्यामुळे समग्रातील एककाचा शोध घेणे अधिक वेळ खाऊ व खर्चिक बाब होती. म्हणून परभणी जिल्ह्यातील शारीरिक दिव्यांग व्यक्तीची आकडेवारी, त्यांचा पत्ता कोठे मिळू शकतो याचा शोध घेतला असता, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद परभणी यांच्याकडे दिव्यांग व्यक्तींना जीवनावश्यक वस्तूचा पुरवठा करण्या करिता गावा निहाय यादी असल्याचे माहित झाले. या कार्यालयातील यादीच्या आधारेच नमुना निवड करण्यात आली.

**नमुना निवड प्रक्रिया :—**

प्रस्तुत संशोधना करीता खालील स्तरात नमुना निवड करण्यात आली परभणी जिल्ह्यात एकूण 9 तालुके येतात यात क्रमशः 1. गंगाखेड 2. मानवत 3.पालम 4. परभणी 5.पाथरी 6. पूर्णा 7. सेलू 8. सोनपेठ 9. जिंतूर यांचा समावेश होतो. प्रत्येक तालुक्यात उपलब्ध असलेली दिव्यांग व्यक्तींची आकडेवारीवरून त्या त्या आकडेवारीच्या प्रमाणानुसार तालुक्यांना प्रतिनिधित्व देण्यात आले. दिव्यांगात सर्वच प्रकारच्या अपंगांचा समावेश होतो म्हणून त्या त्या तालुक्यातील गावांची निवड करतांना अधिक संखेने दिव्यंगाची संख्या असणारी गावे उद्देशपूर्ण नमुना निवड पद्धतीने निवडली. गावाची निवड करतांना त्या गावातील संपर्क, गावात उपलब्ध असलेले शारीरिक अपंगांची संख्या, त्यांची उपलब्धता इत्यादी बाबींचा विचारात घेऊन गाव निश्चित करण्यात आले. प्रस्तुत संशोधनाकरिता जिल्ह्यातील एकूण 50 गावांचा समावेश करण्यात आला.

**नमुना आकारः—**

प्रस्तुत संशोधनासाठी नमुन्याचा आकार 200 ठेवण्यात आला होता. निवडलेल्या तालुक्यातून नमुन्याचा आकार निश्चित करण्यासाठी प्रमाणशीर नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे.

**तथ्यांचे विश्लेषण :—**

प्रस्तुत संशोधन विषयास अनुसरून मुलाखत अनुसुचीच्या माध्यमातून प्राथमिक तथ्य संकलित केलेले असून. अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना येणाऱ्या अडचणी, त्यांना सार्वजनिक ठिकाणी वावरत असतांना येणारे अनुभव तसेच त्यांच्या कुटुंबाचा दिव्यांगाप्रती दृष्टीकोन वा व्यवहार आणि स्वतःच्या मर्जीनुसार दिव्यांग जीवन जगतात का? या विषयी तथ्यांची मांडणी सारणी च्या माध्यमातून केलेली आहे.

**अस्थिव्यंग दिव्यांगाना सार्वजनिक ठिकाणी येणारे अनुभव**

| अ. क्र. | विवरण | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | सार्वजनिक ठिकाणी वावरण्यावर नापसंती | 148 (74) | 48 (24) | 200 (100) |
| 2 | सार्वजनिक ठिकाणी तुच्छतेने पाहतात | 136 (68) | 64(32) | 200 (100) |
| 3 | बागेत तुच्छतेने पाहतात | 150 (75) | 50 (25) | 200 (100) |
| 4 | हॉटेल मध्ये येण्यास मालकाची नापसंती | 110 (55) | 90 (45) | 200 (100) |
| 5 | हॉटेल मध्ये दुर्लक्ष करतात | 76 (38) | 124 (62) | 200 (100) |
| 6 | अपंगां सोबत खानपानास नापसंती | 68 (34) | 132 (66) | 200 (100) |
| 7 | आंतरक्रिया करतांना अनुत्साह | 148(74) | 52(26) | 200(100) |

स्त्रोतः प्राथमिक तथ्य

अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना अद्यापही समाजात सन्मानाची वागणूक मिळत नाही. एखादा दिव्यांग व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी वावरत असेल तर, हा इकडे का बर फिरतो अशी लोकांची सहज धारणा होते. अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींनी सार्वजनिक ठिकाणी वावर केल्यास 74 टक्के प्रतीसादाकांच्या मते लोक नापसंती दर्शवितात. लोक तुमच्याकडे तुच्छतेने पाहतात का? या प्रश्नास अनुसरून 68 टक्के प्रतिसादक होय म्हणतात. सर्वसाधारणपने लोकांची अशी धारणा असते की, अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींनी सार्वजनिक ठिकाणी न फिरता एका ठिकाणी बसून राहावे. दिव्यांग व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी विशेतः बागेत गेल्यास इतर व्यक्ती त्यांच्या कडे तुच्छतेने पाहतात, बाग किंवा सार्वजनिक ठिकाण हे सामान्य लोकांसाठी असते, अपंग व्यक्ती आल्यास त्या जागेचे महत्व कमी होते वा अपंगांना येऊ दिले तर इतर भिक मागणारे येतील अशी लोकांची धारणा आहे, दिव्यांग व्यक्ती बागेतील स्वच्छता ठेऊ शकणार नाहीत आणि बाग हे ठिकाण फक्त सामान्यासाठी आहे दिव्यांग व्यक्ती करिता नाही या समाजातून इतर लोक अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तीकडे तुच्छतेने पाहतात असे 75 टक्के प्रतीसादकास वाटते वा त्यांनी तसा अनुभव घेतलेला आहे.

अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींचे हॉटेल मधील अनुभव फारसे समाधान कारक नाहीत, कधी हॉटेल मध्ये गेले तर त्या ठिकाणी त्यांना इतर ग्राहकासारखी वागणूक मिळत नाही, हॉटेल मधील सेवा देणारे कर्मचारी त्यांच्या कडे दुर्लक्ष करतात. हॉटेल मध्ये सामान्य लोक दिव्यांग व्यक्तीच्या बाजूला बसने पसंत करत नाहीत. हॉटेल मध्ये ज्या ठिकाणी अस्थिव्यंग व्यक्ती बसलेली असते अशा ठिकाणी किंवा त्याच्या सोबत बसण्यास सामान्य लोक पसंत देत नाही, तसेच ग्रामीण भागात जेवणाच्या पंक्तीत अस्थिव्यंग व्यक्ती सोबत जेवण करण्यास न पसंती दर्शवितात असे 34 टक्के प्रतीसादकास वाटते तर 66 टक्के प्रतीसादाकांच्या मतानुसार अस्थिव्यंगाच्या स्वरूपानुसार लोक त्यांच्या कडे दुर्लक्ष करता व जेवण्यास नापसंती दर्शवित नाहीत. तसेच सार्वजनिक ठिकाणी अस्थिव्यंग व्यक्तींनी वावर केला तर त्यास लोकांची नापसंती असते व लोक यांना टाळत असतात वा अस्थिव्यंग व्यक्तींनी आंतरक्रिया करण्याचा प्रयत्न केलाच तर लोकांत अनुत्साह दिसून येतो असे 74 टक्के प्रतीसादाकास वाटते.

वरील सारणी वरून असे दिसून येते की, अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्ती बाबत लोकांत अद्यापही उदासीनता दिसून येते, अस्थिव्यंग व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी वावर करू नये, त्यांनी बागेत फिरू नये या सारख्या धारणा लोकांत दिसून येतात. याचीच परिणीती अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींच्या बाबत असलेल्या उदासीन दृष्टीकोनात होते, यामुळे लोक आंतरक्रिया टाळण्यात होते वा सोबत बसून जेवण न करण्याच्या मानसिकतेत होते.

**अस्थिव्यंग दिव्यांगाप्रती कुटुंबाचा व्यवहार**

| अ. क्र. | विवरण | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1 | मागण्यांकडे दुर्लक्ष | 118) 59) | 82 (41) | 200 (100) |
| 2 | गांभीर्याने न ऐकणे | 128) 64( | 72) 36( | 200 (100) |

तथ्य स्त्रोत :– प्राथमिक तथ्य

अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींना त्यांच्याच कुटुंबात दुर्लक्ष करण्यात येते. दिव्यांग व्यक्ती यांच्या दिनचर्या तील बहुतेक भाग हा कुटुंबातील इतर सदस्यावर अवलंबून असतो. यांचे जीवन काही प्रमाणात परावलंबी असल्यामुळे कुटुंबातील सदस्यही दिव्यांग व्यक्ती बाबत उदासीन झालेली दिसून आली. एकूण प्रतीसादकापैकी 59 टक्के प्रतीसादकास असे वाटते की, कुटुंबातील सदस्य त्यांच्या मागण्याकडे दुर्लक्ष करतात तर 41 टक्के प्रतिसादकांच्या मतानुसार कुटुंब त्यांच्याकडे लक्ष देते. तसेच एकूण प्रतीसादकापैकी 54 टक्के उत्तरदात्यास कुटुंबातील सदस्य त्यांचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकतात असे वाटते तर 36 टक्के प्रतीसादकांच्या मतानुसार त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती त्यांचे म्हणणे गांभीर्याने ऐकत नाहीत.

**अस्थिव्यंग दिव्यंगाच्या मर्जीनुसार जीवन जगण्या बाबत**

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | स्वतःच्यामर्जीनुसार | 40 | 20 |
| 2 | इतरावर अवलंबून | 76 | 38 |
| 3 | कधी कधी मर्जीनुसार | 84 | 42 |
| एकूण | | 200 | 100 |

तथ्य स्त्रोत :– प्राथमिक तथ्य

अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तीचे त्याच्या दिव्यंगाच्या स्वरूपानुसार जीवन जगण्याची पद्धत ठरत असते. दिव्यंगाचे प्रमाण अधिक असेल तर त्या व्यक्तीस इतर व्यक्तीवर अवलंबून असावे लागते तसेच ती व्यक्ती स्वतःची कामे स्वतः किती सक्षमपणे करते यावर त्याचे स्वतःचे आयुष्य स्वतःच्या मर्जीनुसार किंवा इतरांच्या मर्जीनुसार जगायचे हि निश्चित होते. एकूण प्रतीसादका पैकी 20 टक्के प्रतीसादकाच्या मतानुसार ते स्वतःचे जीवन स्वतःच्या इच्छे नुसार वा मर्जीनुसार जगत असतात तर 38 टक्के प्रतीसादाकांना त्यांच्या जीवन विषयक बाबी करिता कुटुंबातील इतर सदस्यावर अवलंबून राहावे लागते तर 42 टक्के प्रतीसादाकांच्या मतानुसार त्यांचे जीवन पूर्णतः परावलंबी नसून काही ठराविक बाबीकरिता त्यांना कुटुंबावर अवलंबून राहवे लागते जसे, प्रवास करणे, आर्थिक बाब वा खर्च इत्यादी तर याच बाबीकरिता त्यांना इतरावर अवलंबून राहावे लागते म्हणजेच कधी कधी ते स्वतःच्या मर्जीनुसार जीवन जगतात तर कधी किंवा काही बाबतीत त्यांना इतरावर अवलंबून राहावे लागते.

**निष्कर्षः–**

अस्थिव्यंग दिव्यांग व्यक्तींच्या हक्क व अधिकाराचे जतन व संवर्धन करण्यासाठी विविध कायदे असले तरी प्रत्यक्ष जीवन जगतांना अनेक समस्यांचा / अनुभवाचा सामना करावा लागतो. सार्वजनिक ठिकाणी वावरत असतांना अस्थिव्यंग दिव्यांगांना भिन्न स्वरूपाचे अनुभव येतात. जेंव्हा दिव्यांग सार्वजनिक ठिकाणी वावरत असतांना लोकांची तीव्र नापसंती असते असे बहुतेक दिव्यांगांना वाटते. सार्वजनिक ठिकाणी विशेषतः दिव्यांग व्यक्ती बागेत फिरत असेल तर लोक त्यांच्या कडे तुच्छतेने पाहतात. हॉटेल सारख्या ठिकाणी दिव्यांग व्यक्तीने प्रवेश करणे, त्यांनी सामान्य व्यक्ती बरोबर जेवण करणे या बाबी करिता नापसंती असते. हॉटेल मालक दिव्यांगा बाबत अनुत्साही असतो व त्यांच्याकडे दुर्लक्ष करत असतो. हॉटेल मध्ये सामान्य व्यक्ती त्यांच्या सोबत वा बाजूला बसून जेवण करण्यास अनुत्साही असतो वा त्यांचीशी आंतरक्रिया करण्यास टाळतो.

अस्थिव्यंग दिव्यांगाना समाजाबरोबर कुटुंब हि दुर्लक्ष करीत असतो. कुटुंबातील व्यक्ती अस्थिव्यंग दिव्यांगा व्यक्तींच्या मागण्याकडे दुर्लक्ष करतात वा एकूण घेत नाहीत. एकंदर या व्यक्तींचे

जीवन बऱ्याच बाबतीत इतरावर अवलंबून असते. त्यांना स्वतंत्रपणे जीवन जगता येत नाही, अनेक बाबी करीता त्यांना इतरांच्या मर्जीनुसारच जीवन जगावे लागते.

**संदर्भ ग्रंथ सूचीः–**


- Baquer A. and Sharma A. (1997). Disability: Challenges vs. Responses, Concerned Action Now. New Delhi
- Gupta, Bhawna Arora, (2020) "Rights and Entitlements of Persons with Disabilities in India: An Evaluation" Journal of Human Rights Law and Practice Vol. 3 No. 1:
- Hosain Monawar G. M., Davind Atkinson., & Peter Underwood. (2002). Impact of Disability on Quality of Life of Rural Disabled People in Bangladesh. Journal of Health, Population and Nutrition, 20(4), 297-305.
- Mehrotra, N. (2004b). Women, Disability and Social Support in Rural Haryana, Economic and Political Weekly, 6, 40-44.


* * *

# पोलीस प्रशासनामध्ये कार्यरत असणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांना पालकत्वाची जबाबदारी पार पाडत असतांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास (विशेष संदर्भ औरंगाबाद जिल्हा)

सहा.प्रा. यू. एस. बनकर
श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय,
वाशीम

**गोषवारा :-**

देशांमध्ये शांतता, स्थैर्य आणि सौख्य / एकोपा रहावा या करिता प्रत्येक देशामध्ये सुरक्षा यंत्रणा कार्यरत आहेत. या यंत्रने व्दारे देशांमधील कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित व्हावी याकरिता प्रयत्न केले जातात.आपल्या भारत देशामध्ये देखील अशा यंत्रणा कार्यरत आहेत.त्यातीलच एक महत्वाची यंत्रणा म्हणजे पालीस यंत्रणा होय. या पोलिस यंत्रणेमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना दररोज नवनवीन प्रसंगांना सामोरे जावे लागत आहे.त्यांना आपले कर्तव्य बजावत असतांना अनेक प्रकारच्या अडचणींना तोंड द्यावे लागते.अनेक प्रकारेचे गुन्हेगार, राजकीय व्यक्ती, कार्यकर्ते यांच्याशी त्यांचा सामना होत असतो त्यातल्या त्यातच महिला पोलीस कर्मचाऱ्यांना तर अधिकच समस्यांना तोंड द्यावे लागते.गृहिणी म्हणून जबाबदारी पार पडत असतांना अनेक प्रकारच्या भूमिका वडवाव्या लागतात.उदा. पत्नी, सून, आई, वहिनी आदी या भमिका पार पडत असतांना आणि कर्तव्य(डयुव्टी ) निभावत असतांना त्यांना रोजच अग्निदिव्याची परिक्षा दिल्याचा अनूभव येत असतो. नोकरिच्या अतिरिक्त ताणतनावामुळै त्यांच्यात चिडचिड ची भावना अधिक निर्माण झाली आहे. जरी नोकरी १२ तासांची असली तरी त्यांना काही आपत्कालीन परिस्थितीमध्ये १५-१८ तास डयुटी करावी लागते. या डयुटीच्या अतिरिक्त वेळेमुळे त्या आपल्या बालकांकडे पुरेपूर लक्ष दुऊ शकत नाहीत.याचाच परिणाम म्हणून बालके मोबाईल, टीव्ही या सारख्या मनोरंजन साधनांच्या आहारी गेले आहेत. त्यांना त्यांची सवय लागली असून संशोधनांमधून असे लक्षात आले आहे की ७०% महिला या आपल्या बालकाला व्यस्त ठेवण्याकरिता मोबाईल, टिव्ही या मनोरंजनांच्या साधनामध्ये गुतवून ठेवतात, कर्तव्यावर असतांना देखील त्यांचे लक्ष घरी असलेल्या आपल्या बालकाकडे असते त्या मुळे त्या आपल्या कार्यालयीन जाबदारीला योग्य न्याय देऊ शकत नाहीत. त्याचप्रमाणे हया महिला अपल्या बालकांना वेळेवर पोषक आहार व लसीकरण देऊ शकत नाहीत. त्यांना या गोष्टीकरिता नेहमी इतरांवर अवलंबून राहावे लागत आहे.

ज्या वयामध्ये बालकांना आपल्या आई-वडीलांची अधिक गरत असते अशाच वयामध्ये हया बालकांना आपल्या आईचा पुरेसा सहवास, वेळ मिळत नाही.याची खंत पोलीस प्रशासनामध्ये कार्य करणाऱ्या या माहिला पोलीस कर्मचाऱ्यांची आहे.

**मुख्य शब्द ( Key Works ) :- पोलीस, पालकत्व नोकरी करणाऱ्या महिला, महिला पोलीस कर्मचारी, कौटुंबिक जबाबदारी आदी.**

**प्रस्तावना :-**

आजचे युग हे विज्ञान युग म्हणून ओळखले जाते. या काळामध्ये विज्ञानाने केलेल्या क्रांतीमुळे अनेक नवनवीन शोध लागले.कधीकाळी अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टीही आता शक्य झाल्या आहेत. जसे की पूर्वी एकमेकांशी फोनवर बोलणे हे देखली कठीण वाटत होते, परंतु आता फोनवर आपण एकमेकांना बोलतोच त्याचप्रमाणे प्रत्यक्षात पाहु देखील शकतो, यासारखे बरेच असे अविष्कार या विज्ञानाच्या क्रांतीमुळे घडून आलेले आपणास दिसून येतात. अवघड वाटणारे काम देखील आता सुलभ झाले आहे.यामुळे क्रांती बरोबरच या विज्ञानामुळे बऱ्याचशा सामाजिक समस्या देखील उदभवलेल्या आपणास दिसून येतात. जसे अणुबॉम्ब, संहारक अश्रे यांची निर्मिती झाली असल्याकारणाने कोणताही देश कोणत्याही देशास घाबरत नाही, उलट तो प्रतिशोधाची व संहाराची भाष बोलू लागलेला आहे. प्रत्येक देशामध्ये असुरक्षेचे वातावरण निर्माण झालेले आहे.अनैतिकाता मोठया प्रमाणत वाढलेली आहे.या सर्वावरती नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक यंत्रणा कार्यरत आहेत.त्या पैकिच एक म्हणजे पोलिस यंत्रणा.

या पोलिस यंत्रणेने मधील वरिष्ठ अधिकरी हे संघ लोसेवा आयोग (UPSC) भारतीय पोलिस सेवा (IPS) व राज्याच्या लोकसेवा याव्दारे निवड करुन नियुक्त केले जातात. त्याचप्रमाणे इतर कर्मचाऱ्यांची निवड ही ज्या त्या राज्याच्या पालिस विभाव्दारे केली जाते.महाराष्ट्र पोलीस हे भारताच्या महाराष्ट्र राज्याची कायदा व सुव्यवस्था राखणारी एक संस्था आहे.महाराष्ट्र पालिस देशातील सर्वात मोठया पोलिस दला पैकी एक असून त्यात ११ पोलीस आयुक्तालय व ३६ जिल्हा पोलीस दले आहेत. BPRD २०१९ च्या अहवालानुसार भारतामध्ये पोलीस दलाचे मनुष्यबळ २० लाख ९१ हजार असून हीच संख्या महाराष्ट्रमध्ये २ लाख १५ हजार (२ लाख ४३ हजार मंजूर) इतकी आहे. देशात ५११.८१ लोकसंख्ये मागे एक पोलीस असावा या करीता मंजुरी दिली गेलेली आहे.महाराष्ट्रात मंजूर पोलीस संख्येच्या तुलनेत २८ हजार पदे रिक्त आहेत.पोलीस दलातील महिलांच्या संख्येचा विचार केल्यास २०१९-२० या वर्षी त्यांची संख्या २ लाख १५ हजार ५०४ इतकी आहे.हाच आकडा २०११ साली १ लाख १० हजार ८७२ इतका होता.लोकसंख्येच्या प्रमाणात हे संख्याबळ फारत कमी असून त्यातल्या त्यात महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे प्रमाण तर अगदीच नगण्य आहे.त्या मुळे महिला पोलीस कर्मचाऱ्यांवरती कामचा ताण अधिकच येत आहे.महिला असल्याकारणाने कुटुंबातील जबाबदारीही त्यांना पार पाडावी लागते.कुटुंबातील सर्वात मोठी आणि महत्वाची जबाबदारी म्हणजे पालकाची जबाबदारी. हि जबाबदारी पार पाडत असतांना अत्यंत काळजी घ्यावी लागते. जसे कुंभार हा मडक्याला आकार देत असतांना काळजी घेत असतो. किंबहुना त्यापेक्षाही काळजीपूर्वक बालकांचे संगोपन करावे लागते. अत्यंत बारीक बारीक गोष्टींकडे लक्ष द्यावे लागत.बाळाचा आहार, लसीकरण,इतर आजार तसेच त्यांचे वर्तन आदी. आजचे बालक हे भविष्यातील एक जागरुक व जाबाबदार नागरिक असते, त्यामुळे त्यांचे संगोपन हे आनंदी व निरोगी वातावरणात होणे आवश्यक आहे.

**पालक-बालक संबंधाचे महत्व : –**

पालक - बालक संबंध हा कौटूंबिक संबंधाचा एक भाग आहे. कुटूंबात मातापिता व बालकांमध्ये जे संबंध असतात त्यांना कौटूंबिक संबंध म्हणतात.या संबंधात मातापित्याचे संबंध, भाऊ बहिणीचे संबंध, मातापिता व बालकांच्या सबंधाचे अध्ययन केले जाते.पालक बालक सबंधात मुख्य रुपाने मात-पिता व अपत्यांच्या सबंधाचे अध्ययन केले जाते.मातापिता वबालकांचे सबंध खूप जवळचे असतात आणि ते रक्तसंबंधावर आधारित असतात.सबंधात सत्याता, पविजता, स्थिरता व प्रेमाची भावना असते.त्याचप्रमाणे हे

संबंध भावनिक प्रतिक्रियांचा परिणाम असतात.थोडे सुक्ष्मरित्या या सबंधाचे अध्ययन करतांना असे लक्षात येते की, मातापिता हे अपत्यांना जन्म देणारे असतात.पालक म्हणजे बालकांचे संगोपन करणारी व्यक्ती ही समाजातील कुणीही व्यक्ती असू शकते.परंतू या ठिकाणी मातापिता व अपत्याच्या संबंधाचे अध्ययन करावयाचे आहे.मातापिता व बालकांचे संबंध चांगले असल्यास बालक समाजामध्ये, मित्रांमध्ये योग्य प्रकारचे संबंध प्रस्थापित करु शकतो.मातापिता बालकांचे संगोपन कसे करतात.त्यावर हे संबंध चांगले किंवा वाईट हे अवलंबून असते.कौटूंबिक व सामाजिक वातावरणात मातापिता आणि अपत्यांचे संबंध अतिशय महत्वाचे मानले जातात.म्हणून मातापित्यांनी अत्यंत काळजीपूर्वक योग्य संबंधाची जोपासना करणे आवश्यक असते.कुटं ूबात प्रेमाचे वातावरण असल्यास, मातापिता बालकांचे प्रेमाने संगोपन करीत असल्यास, बालकांच्या सर्वांगिण विकासाला असे वातावरण पोषक ठरते.त्याचप्रमाणे भांडणे, तणाव आणि संघर्षाची स्थिती उत्पन्न होऊ शकत नाही.

जीवनाच्या सुरुवातीलच्या काळात पित्यापेक्षा मातेशी शिशूचा जास्त संबंध येतो. तेव्हा मातेच्या अभिवृत्ती मधून बालकांचे परस्पर संबंध विकसित होतात.शैशवस्थेत बालक पूर्णपणे मातेवर अवलंबून असते.म्हणून त्याची प्रथम आवश्यकता त्याची योग्य देखभाल करणे ही असते.माता बालकांच्या शारीरिक, मानसिक आवश्यकतांची पूर्ती करते.त्यांना अन्न, वस्त्र, संरक्षण व प्रेम प्रदान करते.संसर्गजन्य रोगापासून शिशूचे संरक्षण करते.त्यातून बालकात मातेविषयी आपलेपणाची भावना विकसित होते.माता-पिता व बालकांचे संबंध सहजपणे निरीक्षण केल्यास लक्षात येऊ शकत नाही तर ते परस्परवर्तनातून स्पष्ट होतात.

कुटूंबाचा विचार करता मूल आई व्यतिरिक्त वडील, आजी-आजोबा, काका-काकी आदींच्या संपर्कात येत असते.त्यांच्याशी आंतरक्रिया करत असते.सर्व कु ंबीयांच्या सहवासाचा परिणामही मुलाच्या जीवना होतो.तर मुलाबाबत अत्यंत कडक शिस्तीचा प ुरस्कार करणाऱ्या व अत्यंत मवाळ धोरण ठेवणाऱ्या पालकांची मुलं आक्रमक वर्तन करणारी व बंडखोर वृत्तीची असतात. फ्लॅनरी व त्याच्या सहकाऱ्यांच्या (१९९५) च्या अभ्यासानुसार, मुलाबाबत अत्यंत कडक शिस्तीचा पुरस्कार करणाऱ्या व अत्यंत मवाळ धोरण ठेवणाऱ्या पालाकांची मुले आक्रम वर्तन करणारी व बंडखोर वृत्तीची असतात. फ्लॅनरी व त्यांच्या सहकायाऱ्यांच्या (१९९३) अभ्यासानुसार पालक-बालक संबंधातील वय हा अत्यंत महत्वाचा घटक असून बालकाच्या विशिष्ट वयापर्यंत (५ ते ९ वर्ष) पालक-बालक संबंध राहतात.मात्र पुढे मुले वयात येताना ते तणावाचे बनतात. जेफ्रिज यांच्या संशोधनात असे आढळले की, बालकांना पालकांविषयी किती आकर्षण आहे व बालकाची स्वत:ची व्यक्तिमत्व गुणवैशिष्टये काय आहेत. यावर बालकाचे पालकांवरील प्रेम अवलंबून असते.बालकाला पालकांविषयी वाटणारा आदर, मित्रभाव, विश्वास, भावनिक जवळीकता आदी बाबींमुळे पालकमूल पालकाकडे आर्कषित होते.शिवाय तार्किक विचार, सेवाभाववृत्ती, भावनिक नियंत्रण, कष्टाळू वृत्ती आदी बालकाशी संबंधित गुणवैशिष्टयांमुळेही हे आकर्षण वाढीस लागत असते. या दोन्ही बाबी परस्परपूरक असतील तर बालक व पालक ांमध्ये मोकळा संवाद साधण्यास, खुलेपणाने परस्पारांना व्यक्त करण्यास, सुखद:खाचे सोबती होण्यास किंवा समरस होण्यास मदत मिळते. भविष्यात बालकाचे इतरांसोबतचे संबंध कसे असतील, त्याचे आंतरवैयक्तिक वर्तन कसे असेल हे आई-बालक सं बंधाव्यतिरिकत पालक-बालक संबंधांवरही अवलंबून असते.याकडे मानसशास्त्रीय अभ्यास अंगुलीनिर्देश करतात.कारण वडील आईच्या तुलनेत भावनिकते शिवाय तार्किकतेला, वास्तविकतेला प्राधान्य देत असतात. त्यामुळे पालक-बालक आंतरक्रियांतून मूल समाजाचे नीति-नियम, सामाजिक परिस्थितीनुरुप वर्तनाची शैली,

सामाजिक कौशल्य आदी बाबी आत्मसात करत असते व या सर्व बाबींचा परिणाम बालकाच्या भविष्यातील संबंध जोपासण्यावर होत असतो.

**संशोधनाचे उद्देश :**

१. पालकत्व आणि नोकरी या जबाबदाऱ्या पार पाडतांना येणाऱ्या समस्या व तणावाचा अभ्यास करणे.

२. कार्यव्यस्ततेचा बाल संगोपनावर होणाऱ्या परिणामांचे अध्ययन करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तूत संशोधनामध्ये प्राथमिक तथ्य संकलन निरीक्षण व मुलाखत अनुसूची प्रत्यक्ष त्याचप्रमाणे गुगल फॉम मध्ये तयार करुन या लिंकचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने केले तर द्वितीय तथ्य संकलन संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र, मासिके, संकेतस्थळ तसेच इतर प्रकाशित व अप्रकाशित दस्तऐवजांचा वापर करण्यात आला.

कुटूंबाचा विचार करता मूल आई व्यतिरिक्त वडील, आजी-आजोबा, काका-काकू आदींच्या संपर्कात येत असते.त्यांच्याशी आंतरक्रिया करत असते.सर्व कुटूंबीयांच्या सहवासाचा परिणामही मुलाच्या जीवनावर होतो.तर मुलाबाबत अत्यंत कडक शिस्तीचा प्ुरस्कार करणाऱ्या व अत्यंत मवाळ धोरण ठेवणाऱ्या पालकांची मुलं आक्रमक वर्तन करणारी व बंडखोर वृत्तीची असतात. फ्लॅनरी व त्याच्या सहकाऱ्यांच्या (१९९५) च्या अभ्यासानुसार, मुलाबाबत अत्यंत कडक शिस्तीचा पुरस्कार करणाऱ्या व अत्यंत मवाळ धोरण ठेवणाऱ्या पालाकांची मुले आक्रम वर्तन करणारी व बंडखोर वृत्तीची असतात. फ्लॅनरी व त्यांच्या सहकायाऱ्यांच्या (१९९३) अभ्यासानुसार पालक-बालक संबंधातील वय हा अत्यंत महत्वाचा घटक असून बालकाच्या विशिष्ट वयापर्यंत (५ ते ९ वर्ष) पालक-बालक संबंध राहतात.मात्र पुढे मुले वयात येताना ते तणावग्रस्थ स्थितीमध्ये आढळतात. यापाठीमागे अनेक कारणे असली तरी यामुळे मुले आक्रस्ताळी व बंडखोर होतात. जेफ्रिज यांच्या संशोधनामध्ये असे आढळले की, बालकांना पालकांविषयी किती आकर्षण आहे व बालकाची स्वत:ची व्यक्तिमत्व गुणवैशिष्टये काय आहेत. यावर बालकाचे पालकांवरील प्रेम अवलंबून असते.बालकाला पालकांविषयी वाटणारा आदर, मित्रभाव, विश्वास, भावनिक जवळीकता आदी बाबींमुळे मूल पालकाकडे आकर्षित होते.शिवाय तार्किक विचार, सेवाभाववृत्ती, भावनिक नियंत्रण, कष्टाळू वृत्ती आदी बालकाशी संबंधित गुणवैशिष्टयांमुळेही हे आकर्षण वाढीस लागत असते. या दोन्ही बाबी परस्परपूरक असतील तर बालक व पालक ां मध्ये मोकळा संवाद साधण्यास, खुलेपणाने परस्पारांना व्यक्त करण्यास, सुखद:खाचे सोबती होण्यास किंवा समरस होण्यास मदत मिळते. भविष्यात बालकाचे इतरांसोबतचे संबंध कसे असतील, त्याचे आंतरवैयक्तिक वर्तन कसे असेल हे आई-बालक सं बंधाव्यतिरिकत पालक-बालक संबंधांवरही अवलंबून असते.याकडे मानसशास्त्रीय अभ्यास अंगुलीनिर्देश करतात.कारण वडील आईच्या तुलनेत भावनिकतेशिवाय तार्किकतेला, वास्तविकतेला प्राधान्य देत असतात. त्यामुळे पालक-बालक आंतरक्रियांतून मूल समाजाचे नीति-नियम, सामाजिक परिस्थितीनुरुप वर्तनाची शैली, सामाजिक कौशल्य आदी बाबी आत्मसात करत असते व या सर्व बाबींचा परिणाम बालकाच्या भविष्यातील संबंध जोपासण्यावर होत असतो.

पोलीस प्रशासनामध्ये महिलांचे स्थानाचा विचार केल्यास देशाच्या तुलनेत सर्वाधिक **२७ हजार १६७** महिला पोलिस महाराष्ट्रात कार्यरत आहेत. महिला पोलीसांच्या देशभरातील एकूण संख्येत **२०१३ ते २०१८** या कालावधीत सुमारे **५३** टक्यांनी वाढ झाली असून, एकटया २०१७ मध्ये ही संख्या २०.९५

टक्कयांनी वाढलीचे समोर आले आहे. पोलीस संशोधन आणि विकास विभागाच्या (BPRD) आकडेवारीनूसार देशभरात १ जानेवारी **२०१८** पर्यंत शहर पोलीस, जिल्हा सशस्त्र राखीव आणि सशस्त्र पोलीस अशा एकूण एक लाख **६९** हजार महिला पोलीस कार्यरत आहेत. केंद्रीय निमलष्करी दलात २८ हजार ६१ महिला कार्यरत आहेत. यात सर्वाधिक CRSF (८,३०३) CRPF (७,७९३), BSF (५,१७४) आणि RPF (२,२५०), महिला सेवेत आहेत. देशभरातील एकूण एक लाख ६९ हजार महिला पोलीसांपैकी २५ जार २८६ कॉन्स्टेबदल, दोन हजार ५२४ हेड कॉन्स्टेबदल, तीन हजार २६४ वाहतूक पोलीस, दोन हजार ३२४ विशेष शाखा आणि ४४७ विशेष पोलीस कार्यरत आहेत. एकूण पुरुष पोलीसांच्या तुलनेत महिला पोलीसांची ही संख्या ८.७३ टक्के असल्याचे आकडेवारी सांगते.देशभरातील एकूण मंजूर पोलीस पदे २४ लाख ८४ हजार असून, केवळ १९ लाख ४१ हजार पोलीस सध्या कार्यरत आहे.विविध स्तरांवर पोलीसांच्या सुमारे पाच लाख ४३ जार जागा रिक्त आहेत.केंद्रीय सशस्त्र पोलीस दलासाठी १० लाख ८२ हजार पदे मंजूर आहेत, मात्र या दलात सध्या १० लाख कर्मचारी कार्यरत आहेत. एकूण कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यापैकी हजारो पोलीस हे मंत्री, खासदार, आमदार, न्यायाधीश व सरकारी अधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तैनात केले जात असल्याचे 'बीपीआरडी' च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

महिला पोलीसांना सन्मानाची वागणूक पोलीस प्रशासनामध्ये मिळत नसल्याची खंत महिला व्यक्त करतात. कोणत्याही वेळी कर्तव्यावर हजर राहण्याचे आदेश पाळणे महिलांना अनिवार्य असते.रात्री अपरात्री कोणत्याही ठिकाणी पाहारा लावू बसणे बधंनकारक असल्याणे महिला पोलीस आपल्या कर्तव्याबाबत असमाधानी असल्याचे आढळून येते.

**सारणी क्रं. १**

**महिला पोलीस बाळास देत असलेला वेळ दर्शक सारणी**

| अ.क्र. | विवरण | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | ५ तासापर्यंत | ६० | ४०.०० |
| २. | ५ ते ६ तास | ४४ | २९.३४ |
| ३. | ६ ते ८ तास | ३३ | २२.०० |
| ४. | ८ तासाच्या पुढे | १३ | ८.६६ |
| | एकूण | १५० | १०० |

प्रामुख्याने वरील सारणीनूसार चाळीस टक्के पेक्षा जास्त महिला पोलीस कर्मचारी आपल्या मुलाला केवळ पाच तास वेळ देऊ शकतात.तर बाळाला आठ तासापेक्षा जास्त वेळ देणाऱ्या महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे शेकडा प्रमाण दहा पेक्षा जास्त आहे जे की तुलनेने कमी आहे.म्हणजेच महिला पोलीस कर्मचारी पालकत्वाची जबाबदारी पार पाडण्यास असमर्थता दर्शवितात.त्यास पोलीस कर्तव्य व कुटूंबातील कार्य कारणीभूत असल्याचे दिसून येते.

**सारणी क्रं. २**

**महिला पोलीसांना बाळाचा राग येण्याची कारणे दर्शक सारणी**

| अ.क्र. | विवरण | वारंवारीता | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १. | रडण्यामुळे | ७२ | ४८ |
| २. | हट्टामुळे | ३८ | २५.३३ |
| ३. | वाईट सवय | २५ | १६.६७ |
| ४. | अस्वच्छ राहत असल्यामुळे | ०८ | ५.३३ |
| ५. | राग येत नाही | ०७ | ४.६७ |
| | एकूण | १५० | १०० |

वरील सारणी नुसार बाळाच्या रडण्यामुळे जवळ जवळ पन्नास टक्के महिला पोलीस कर्मचाऱ्यांना राग येतो तर बाळाच्या हट्टामुळे पंचेवीस टक्के महिला पोलीस कर्मचाऱ्यांना राग येतो म्हणजेच महिला पोलीस कर्मचाऱ्यांच्या वर्तनामध्ये वा स्वभावामध्ये चिडचिडपणा निर्माण होत असल्याचे दिसून येते.

७० टक्के पेक्षा जास्त महिला पोलीस कर्मचारी आपल्या बाळास व्यस्त करण्यासाठी मोबाईल, टि.व्ही.व मनोरंजनात्मक खेळणी देत असल्याने मुलांना त्याचे व्यसन लागले असल्याचे आढळते.बाळाच्या संगोपनासंदर्भात पती-पत्नीमध्ये वाद होत असल्याचे निदर्शनास येते.६० टक्के महिला पोलीसांना कार्यालयीन व्यस्ततेमुळे बाळाला दररोज सकस आहार देण, सर्व लस वेळेवर देणे शक्य होत नसल्याचे दिसून येते.कामाचा अतिरिक्त ताण असल्यामुळे ७० टक्के महिला पोलीसांचे मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

१. बालसंगोपना करतांना पोलीस महिला कर्मचाऱ्यांना कर्तव्यामुळे अडचण येत असल्याने, महिला पालकत्वाची भूमिका पार पाडण्यास असमर्थता दर्शवितात.
२. महिला पोलीस कर्मचाऱ्यांना कार्यालयीन व्यस्ततेमुळे बाळाला सर्व लस वेळेवर देणे शक्य होत नाही.
३. कार्यालयीन व्यस्तमुळे महिला पोलीस कर्मचाऱ्यांना बाळाला दररोज सकस आहार देणे शक्य होत नसल्याने, महिला बाजारामध्ये उपलब्ध असलेला आहार बाळाला देणे पसंद करतात.
४. महिला पोलीस कर्मचाऱ्यांना काम करण्याची इच्छा नसतांनाही कर्तव्यावर जावे लागत असल्याने, महिला पोलीस कर्मचारी आपल्या कर्तव्याबाबत असमाधान व्यक्त करतात.
५. कार्यालयीन व्यस्ततेमुळे बाळाच्या संगोपनातील सर्व गरजा पूर्ण करतांना महिला पोलीस कर्मचाऱ्यांना असहाय्य होते.
६. कार्यालयातून महिला पोलीस कर्मचाऱ्यांना मुलांच्या संगोपन करण्याकरीता कर्तव्यात सुट दिली जात नाही.
७. महिला पोलीस कर्मचारी महिलांना व्यस्त करण्यासाठी मुलांना मोबाईल, टि.व्ही. तसेच मनोरंजनात्मक खेळणी देत असल्याने, त्याचा विपरीत परिणाम मुलांवर होत असल्याचे दिसून येते.
८. महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे कामाचा अतिरिक्त ताण असल्यामुळे मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते.

**शिफारशी :**

१. नौकरीमध्ये असणाऱ्या ताण-तणावाचा कुटूंबावर परिणाम होत असल्याने महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी समुपदेशन घेऊन तोडगा काढावा.

२. महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी कुटूंबातील व्यक्तींना बाळाचा सांभाळ करण्यासाठी प्राधान्य द्यावे.

३. शासनाने महिला कर्मचाऱ्याना बाळाच्या संगोपनासाठी रजेची काल मर्यादा वाढवावी.

४. मुलांची अतिकाळजी घेऊन मुलांना सतत दडपणात ठेऊ नये.

५. पोलीस कार्यालयात पाळणाघराची सुविधा प्रत्यक्षात राबवावी.

६. महिला पोलीस कर्मचाऱ्यांना बाळाच्या संगोपनाकरीता कर्तव्यात शिथिलता द्यावी.

७. महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी मुलांना व्यस्त करण्यासाठी मोबाईल व टि.व्ही. अशा वस्तू देणे टाळावे.

८. बाळाच्या संगोपनाच्या दृष्टीने पति-पत्नीने आपसात वाद करु नये. एकमेंकाना समजूण घेण्याची वृत्ती बाळगावी.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. बोबडे प्रकाश (२००१) भारतीय समाज रचना - पारंपारीक व आधुनिक, नागपूर:मंगेश प्रकाशन पृष्ठ संख्या ७

२. इंदिरा खडसे (२००८) बालविकासशास्त्र, हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर

३. गोल्ड मार्टिन, (२००९) स्टेटस फोर्सेज इन डिलिन्कवैन्ट ब्वॉएज. पृष्ठ संख्या ३३

४. रोडमैन एण्ड ग्राम्स, (१९७६ ), जिविनाइल डिलिन्क्वैन्सी एण्ड दी फेमिली, न्यूयार्क पृष्ठ संख्या १४

५. शासननिर्णय, क्रमांकःबालसं-२०११/प्र.क्र. ३१३/का-८, दिनांक ९ ऑक्टोबर २०१३, महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्रशासन पृष्ठ संख्या १ ते ८

६. शासननिर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिककार्य, क्रीडावपर्यटनविभागक्र. बीसीए- १०७४/५७११६-एन, दिनांक २४ फेब्रुवारी १९७५. पृष्ठ संख्या १ ते १२

७. https://www.tinystep.in/blog/nokri-karnarya-matani%२०swatasthi-asa-vel-kadha


* * *

# कोविड-१९ आणि व्यावसायिक समाजकार्याची भूमिका

***प्रा.डॉ. अविनाश अ. गेडाम***
(सहाय्यक प्राध्यापक)
महात्मा ज्योतिबा फुले समाजकार्य महाविद्यालय,
बुलडाणा. (महा.), भ्रमणध्वनी क्रमांक- ७५८८९७६०६१
ईमेल आयडी- avinashpush@gmail.com

## ➢ प्रस्तावना :-

भारत हा कृषी प्रधान देश आहे आणि या देशाची ५० टक्केपेक्षा जास्त जनता ही कृषी क्षेत्रावर आधारलेले आहे.प्रामुख्याने आपल्या देशांमध्ये सामान्य स्वरुपामध्ये जीवन जगणाऱ्या शेतकरी समुदाय मोठया प्रमाणामध्ये आहे. वातावरण बदलामुळे, नैसर्गीक बदलामुळे निर्माण होणाऱ्या दुष्काळासारख्या आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या जीवनामधील आनंद नष्ट होत आहे. (दुष्काळ म्हणजे पाण्याची व त्यायोगे अनुउपलब्धता किंवा तीव्र टंचाई असलेला अनेक महिन्याचा, वर्षाचा दीर्घ कालखंड होय.) दुष्काळ ही एक भयंकर अशी नैसर्गीक आपत्ती आहे.परंतु या दुष्काळ येण्यामागे दोन प्रकारची कारणे आहेत.१) नैसर्गीक कारण आणि २) मानव निर्मित कारण. परंतु कारणे कोणतेही असले तरी या दुष्क ाळामध्ये शेतकऱ्यांना अनेक समस्या निर्माण होतात, व त्या समस्यांच ापरिणाम शेतकऱ्यांच्या जीवनमानावर काय होतो, विकासावर काय परिणाम होतो, याचा अभ्यास या संशोधन लेखामध्ये करण्यात आलेला आहे.

## ➢ पूर्व संदर्भ :-

1. (निलेश झालटे २०१६ लोकसत्ता) दुष्काळ कुठलाही असो, शेतकऱ्याला मारतोच. दुष्काळ हा एकच शब्द अनेक शेतकऱ्यांचे जीव घेतो. शेतकरी शेती व्यवसाय करुन कसा जगतोक? या प्रश्नाच खरं उत्तर त्या शेतकऱ्याकडे असतं. अर्थातच शेतकऱ्यांनी देखील शेतीच्या पारंपारिक पध्दतीला फाटा देऊन आधुनिक तंत्रज्ञान उपयोगात आणावयास पाहिजे. आणि अनेक शेतकरी याचा अवलंब करुन दुष्काळाला पर्याय शोधत आहेत. दोन प्रकारचे दुष्काळ त्याला कारणीभूत निसर्ग आहे. तरी या दोन्ही प्रकारच्या दुष्काळाच्या मुळाशी माणूस हा प्राणी आहे. या दोन्ही प्रकारच्या दुष्काळाने शेतकरी पिचून जातो व अनेक वर्षाचे आर्थिक गणित एका झटक्यात मोडले जाते. मग शेतकऱ्याला वेगवेगळया आर्थिक समस्येला सामोरे जावे लागते.
2. (ॲग्रोवन २०२०) दुष्काळ हा शेतकऱ्यांपुढे एक आव्हान आहे. २०११ सालापासून मराठवाडयामध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारचा दुष्काळ पडत आहे आणि या सततच्या पावसाच्या खंडामुळे शेतकऱ्यांना शेतीविषयक वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले आहेत. दुष्काळाच्या नियमितपणामुळे शेतकऱ्यांना फक्त आर्थिकच समस्या नाही तर मानसिक समस्याही निर्माण होत आहे. शेतकरी मानसिक दृष्टया खचला जात आहे, त्याच्या जीवनामधील आनंद काहीचा नाहीसा झाला आहे. मराठवाडयातील लालची सावकारांच्या वृत्तीमुळे शेतकऱ्यांवर कर्जाची वाढ होत आहे. या नैसर्गीक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये मोठया प्रमाणात घट झाली आहे. भांडवलशाळी अर्थव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या फसव्या बाजारपेठा यामुळे शेतकरी वारंवार लुटला जात आहे आणि त्याचा परिणाम खर्च वजा उत्पन्न केले असता, त्याची मजुरी हया उत्पन्नाच्या माध्यमातून निघत नाही.

तसेच शेतकऱ्यांच्या विकासावर परिणाम करणाऱ्या घटकामध्ये दुष्काळ हा विषय आहे. त्याप्रमाणे काही प्रकरणामध्ये शासकीय धोरणही कारणीभूत आहे.

3. (नागवंशीय छत्रपती शिवाजीमहाराज कृष्णाजी अर्जुन केळुस्कर गुरुजी) छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळामध्ये महाराष्ट्रात प्रचंड दुष्काळ पडला. महाराष्ट्राबरोबरच गुजरात, मध्यप्रदेश या प्रांतामध्येही मोठया प्रमाणात दुष्काळ पडला होता. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसमोर वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले. शेतकऱ्यांना पाण्यसासाठी भटकंती करावी लागली. या काळामध्ये गाय, बैल, घोडे इ. पाळीव प्राण्यांसोबत जंगली प्राण्यांचाही मृत्यु झाला. अन्न-अन्न करत माणसेही मरु लागली आणि या दुष्काळाच्या काळामध्ये, मोगल सेना शेतकऱ्यांवर अन्याय करुन मोठया प्रमाणात शेतसारा वसूल करु लागली. परंतू दुसरीकडे शिवाजी महाराजांनी स्वराज्यामध्ये आदेश काढला की आपल्या राज्यातील शेतकऱ्यांचा शेतसारा माफ करा, कुठल्याही सरदाराने शेतकऱ्यांना त्रास देऊ नये. शेतकऱ्यांना या दुष्काळामध्ये आधार देणे गरजेचे आहे.

➢ **संशोधनाचे उद्देश :-**

1. दुष्काळामध्ये शेतकऱ्यांना निर्माण झालेल्या समस्यांचा अभ्यास करणे.
2. दुष्काळामध्ये निर्माण झालेल्या समस्यांमुळे शेतकऱ्यांच्या विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.

➢ **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-प्रस्तुत** संशोधनाची व्याप्ती गिरवली हे गाव आहे. या संशोधनामध्ये गिरवली गावामधील शेतकऱ्यांना दुष्काळामध्ये निर्माण झालेल्या समस्या व शेतकऱ्यांच्या विकासावर झालेल्या परिणमांचा अभ्यास केला आहे.

➢ **संशोधन पदती :-प्रस्तुत** संशोधन हे विश्लेषणात्मक संशोधन आहे. या संशोधनामध्ये दुष्काळामुळे ज्या शेतकऱ्यांना समस्या निर्माण झाल्या आहेत, त्या शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीचे अध्ययन केले आहे. या संशोधनात माहिती मिळविण्यासाठी स्थानिक स्तरवरील, गावातील शेतकरी, यांच्या सोबत गटचर्चा या माध्यमाचा वापर करुन, तथ्य संकलन करण्यात आले. याशिवाय द्वितीय स्त्रोतातील उपलब्ध अहवाल, प्रकाशने इत्यादीचा आढावा घेण्यात आला.

➢ **विश्लेषण :दुष्काळामध्ये शेतकऱ्यांना निर्माण झालेल्या समस्या :-** शेतीसाठी, माणसांसाठी व जनावरांसाठी पाण्याची समस्या : २०११ पासून सतत पडणाऱ्या दुष्काळामुळे गावामध्ये पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. गावामधील विहिर बोअर हे पाण्याचे स्त्रोत काही प्रमाणात बंद पडलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी, पिण्यासाठी पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे.

**उत्पादनामध्ये घट :** दुष्काळामुळे गावामधील शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये मोठया प्रमाणात घट झाली आहे. या सततच्या पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकरी, कोणते पीक घ्यावे या संभ्रमात आहे. दुष्काळामुळे पिकांना वेळेवर पाणी मिळत नाही. गावातील महत्वाचे पीक कापूस हे पूर्णपणे पावसाच्या पाण्यावर आधारित असल्यामुळे, हंगामाच्या काळामध्ये वेळेवर पाऊस न पडल्यामुळे पिकांचे नुकसान होते व त्यामुळे उत्पादनात घट होते.

**व्यसनाधीनतेमध्ये वाढ :** गावामध्ये शेतकऱ्यांच्या व्यसनाधिनतेमध्ये वाढ झालेली आहे. कारण दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनावर परिणाम झाला व त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक प्रगतीत वाढ झाली नाही. या सर्व गोष्टींचा ताण निर्माण होऊन शेतकरी वर्ग मोठया प्रमाणामध्ये व्यसनाधीनतेकडे वळला आहे.

**शेतकऱ्यांच्या विकासावर झालेला परिणाम :**

1.**आर्थिक विकासावर झालेला परिणाम :सततच्या** पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये मोठया प्रमाणात घट झाली. शेतकऱ्याला शेतीतून मिळणारे उत्पन्न हे कुटूंबाच्या मुलभूत गरजा भागवण्यासाठी ही अपूरे पडू लागले. त्यामुळे शेतकऱ्याला सावकाराकडून कर्ज घ्यावे लागले. त्यामुळे शेतकरी हळूहळू कर्जबाजारी झाले व त्याचा परिणाम त्यांच्या आर्थिक विकासावर झाला.

2.**शेतकऱ्यांच्यासामाजिक विकासावर परिणाम :दुष्काळामुळे** शेतकऱ्यांच्या सामाजिक विकासावरही मोठया प्रमाणामध्ये परिणाम झाला आहे. शिक्षण हा महत्वाचा घटक आहे. परंतु दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. बेरोजगारीचे परिणाम प्रमाण गावामध्ये वाढले आहे. गावातील तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे.

3.**दुष्काळामुळे दुग्ध व्यवसायावर झालेले परिणाम :सतत** पडणाऱ्या दुष्काळामुळे चाऱ्याची व पाण्याची उपलब्धता कमी झाली आहे. शेतीमध्ये निघणारा कोरडा व ओला चारा कमी झाला. त्यामुळे शेतकऱ्यांना दुधाळ जनावरांची विक्री करावी लागली व परिणाम गावातील दुग्ध व्यवसाय संपुष्टात आला.

➢ **निष्कर्ष :-**

वरील निष्कर्षावरुन संशोधन विषयासंबधी काही निष्कर्ष काढण्यात आले आहेत, ते पुढील प्रमाणे-

1. दुष्काळ पडल्यामुळे गावातील उत्पादनामध्ये घट झाली व त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासावर झाला.
2. सततच्या पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांच्या मुलांना उच्च शिक्षणापासून वंचित रहावे लागत आहे. महागडया शिक्षण व्यवस्थेमध्ये शेतकरी मुलांच्या फिसची रक्कम भरु शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांच्या शैक्षणिक विकासावर परिणाम होत आहे.
3. सततच्या पडणाऱ्या दुष्काळामुळे कृषी विकासावर व दुग्ध व्यवसायावर परिणाम झाला. यामुळे गावातील काही शेतकऱ्यांना रोजगारासाठी कर्नाटक वा इतर राज्यामध्ये ऊसतोडणीसाठी जावे लागले. यामुळे गावातील स्थलांतराचे प्रमाण वाढले.

➢ **संदर्भ ग्रंथ सूची :-**


1. महात्मा ज्योतिराव फुले, (२०१४) शेतकऱ्यांचा असूड, लोकायत प्रकाशन.
2. कृष्णाजी अर्जुन केळुस्कर, (२०१५) नागवंशीय छत्रपती शिवाजी महाराज, लोकायत प्रकाशन.
3. निलेश झालटे, (लोकसत्ता २०१६)
4. दुष्काळ व शेतकरी, (अॅग्रोवन २०२०)
5. कॉलकर श्रीकांत, (२००६), पर्यावरण समस्या निराकरण व क्षेत्र अभ्यास, डायमंड पब्लिकेशन, पुणे
6. वारघडे सुरेशचंद्र,(२००४),पर्यावरण रक्षण, शिक्षण आणि ग्राम विकासाचे प्रयोग, वनश्री प्रकाशन, पुणे
7. कटारसिंग, अनिल सुशोधिया, (२०१७), पर्यावरणीय अर्थशास्त्र सिध्दांत आणि उपाय योजना, सेज पब्लिकेशन, नवी दिल्ली.
8. अरविंद बोंद्रे, (२००६), संघटनात्मक वर्तन मानव संसाधन विकास, मंगेश प्रकाशन नागपूर


* * *

# मराठवाड्यातील वृद्धाश्रमातील वृद्धांच्या समस्या एक दृष्टीक्षेप

***सिताराम विधाते***
संशोधक विद्यार्थी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद

प्रस्तावना :–

भारतीय समाजात वावरत असतांना वृद्धांचे समाजात एक विशिष्ट असे वेगळे स्थान असल्याचे आपणास पहायला मिळते. वृद्धांच्या अनेक (व्याधी) आजार असल्याचे आढळते. तसेच वृद्धांकडे पहाण्याचा दृष्टीकोन म्हणजे जीवनातील मावळता कालखंड म्हणजे वृद्धावस्था होय; त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन म्हणजे वयस्कर, वृद्ध, थकलेला चेहरा संपूर्ण शरिर थकलेले, थोडे पुढे झुकलेले हातात काठी, चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेला ऋक्ष चेहरा इत्यादी होय. वृद्धांचे प्रश्न हे आता राष्ट्रीय स्तरावरचे प्रश्न म्हणून पुढे येत आहेत. वृद्धांचे अनेक प्रश्न हे देशाच्या विकासापुढे कळीचा प्रश्न ठरत आहेत. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावर वृद्धांच्या समस्या एक ज्वलंत, बहुचर्चित व तितकाच सर्वव्यापी विषय बनला आहे.

वृद्धांच्या समस्यामुळे मानपी विकासात बाधा येत आहे वृद्धांच्या समस्यांची चर्चा करित असतांना तिच्या संज्ञाबाबत मतैक्य असलेले आढळत नाही. वृद्ध आणि वृद्धांच्या समस्या या संज्ञाबाबत विविध संस्था, यंत्रणा, संघटना आणि कायदे यामध्ये त्यांच्या पद्धतीने मांडणी केल्याची दिसुन येते, याबाबतच्या भिन्नते मुळेही वृद्धांच्या समस्येची उकल होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. असे दिसून येते. आजही समाजात वावरत असतांना अनेक वेगवेगळ्या ठिकाणी वृद्धांवर होणारे आत्याचार, माणसिक छळ, कौटुंबिक छळ शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून होणारी पिळवणुक दवाखाण्यात भरती झाल्यानंतर रुग्ण म्हणून होणारे दुरलक्ष, हॉटेल मध्ये विंवा रेस्टॉरेंट मध्ये मिळणारी वागणुक प्रवासा दरम्यान होणारी कुचैबना. रेल्वे स्टेशनवर विंवा पायऱ्यावरुन चालताना करावी लागणारी शारीरिक कसरत, स्थानिक स्वराज्य संस्था मधुन सुविधांचा अभाव जसे की, सार्वजनिक ठिकाणी होणारी गर्दी ज्यामध्ये वृद्धांना सोसावा लागणारा त्रास, गार्डन मधील आरक्षित जागेवर झालेले अतिक्रमण मोकळे वातावरण न मिळाल्या मुळे होणारे दृष्परिणाम, समवयक व्यक्तींचा सहवास लाभत नाही, कधी–कधी सोसायच्या मध्ये मोकळया जागांचा अभाव, कुटूंबात होणारी कुचैबना विंवा सतत टोचुन बोलणे खालीवर बोलणे, नोकरदार मुला–मुलीकडून वृद्ध आई वडिलांकडे होणारे दुरलक्ष विंवा औषधोपचारांवर होणारा आर्थिक परिणाम, त्यामुळे होणारे रोजचे भांडण, उतारवयात नातवंडा सोबत न राहु देणे. तसेच जोडीदाराच्या मृत्युनंतर येणारे नैराश्य, अशा अनेक गोष्टी आहेत कि ज्यामुळे वृद्धात्व हे एक शाप आहे असे वाटायला लागते असेही बरेच वृद्धामंडळी अनेकदा बोलुन दाखवतात.

वर्तमानकाळातील कौटुंबिक आणि सामाजिक जीवनात भेडसावणाऱ्या ज्या प्रमुख समस्या आहेत. त्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. त्यांचे स्वरुप धारण करुन नैतिकता, मानवता, कौटुंबिक प्रेमभाव, जिव्हाळा कृतज्ञता, जबाबदारीचे ताव या बाबींना सुरुंग लावला आहे. कारण

भारतीय संस्कृतीत दीर्घायुष्य एक मुल्य मानले गेले आहे. आश्रम व्यवस्था ही भारतीय संस्क्ृतीमधील महत्वाची संकल्पना आहे. त्यामध्ये माणसाचे आयुष्य हे शंभर वर्षाचे संकल्पिलेले आहे; एवूंण चार टप्पे सांगितले आहेत.

१) ब्रम्हाच्र्याश्रम २) गृहस्थाश्रम ३) वानप्रस्थाश्रम ४) संन्यासाश्रम

या २५ वर्षाची एक आवस्था म्हणजे साधारणपणे शंभर वर्षे आयुष्य होते पूर्वी याच्या सर्व पैलुचां अभ्यास करतांना वृद्धांच्या जीवन मानात खुप बदल झाल्याचे आढळते तसेच वृद्धांवस्थेचा आरंभ वयाच्या कोणतया वर्षा पासून होतो. या बाबत वेगवेगळी मते आहेत. विविध राष्ट्रांमध्ये (देशांमध्ये) वृद्धापकाळाची वयोमर्यादा वेगवेगळी मांडलेली आढळते तर भारतात ६० वर्षानंतर वृद्ध विंवा निवृत्तीचे वय मानले आहे. तर जागतिक पातळीवर दर महीन्याला दहा लाख विंवा एक दशलक्ष लोकसंख्या वाढत आहे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आकडेवारीनुसार १९८५ मध्ये जगातील वृद्धांची संख्या वय ६० वर्षे व अधिक ही ४२७ दशलक्ष होती. जगाच्या एकुण् लोकसंख्यंच्या प्रमाण : ८.८३ टक्के एवढे होते तर हीच संख्या २०२५ साली ११७१ दशलक्ष होईल ही वाढ १७४ टक्के एवढी आहे तर विकसनशील देशामध्ये सन २०२५ मध्ये ७१.९ टक्के पर्यंत पोहचले असे अनुमान विकसनशील देशामध्ये वृद्धांची संख्येत वृद्धी होणार हे निश्चीत आहे, तर स्वीडन, प्रॅान्स, व पाश्चिमात्य देशात एकोणीसाव्या शतकाच्या शेवटी वृद्धांच्या समस्यावर बराच अभ्यास झाल्याचे आढळून येत आहे.

तसेच जागतीक स्तरावर वयोवर्धन प्रक्रियेचे महत्व हे २० व्या शतकात कळले त्यानुसार १९८२ साली संयुक्त राष्ट्राने वार्धक्य संदर्भात जागतिक स्तरावरील सभा (ळहग्ूाे् ङ्गूग्दहे ेंदद्धत्् ॠोसं्त्ब् दह ॠ्ाग्हु ) घेऊन त्यावर वार्धक्याच्या समस्यांवर विचार विनिमय केला. त्यातुन असे प्रश्न समोर आले ही एक गोष्ट प्रकर्षाने जानवली की वृद्धांचे प्रश्न समस्या व अडचणी ह्या इतर वयातील लोकसंख्येपेक्षा वेगळया आहेत. जगातील व देशातील विविध विद्यापीठांनी पण वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी व त्या सोडवण्यासाठी विद्यापीठ स्तरावर अभ्यास विषय पदवी, पदवीत्तर, संशोधनासाठी सुरु केले आहेत.

**वृद्ध म्हणजे कोण :–**

**१) परिभाषिक संज्ञा :–**

मानवाचा नैसर्गिक वाढ व विकास हा आपल्या जन्मापासून म्हणजे बालवयाच्या, किशोरवस्था, तारुण्यवस्था, पौढावस्था व वृद्धावस्था असा होत असतो. म्हणजे वरिल अवस्थामध्ये मानवाच्या गरजा, व समस्या वेगवेगळया असतात. माणुस हा समाजशिल प्राणी आहे असे आरिस्टॉटल म्हणतात. तर माणुस हा इतरांवर अवलंबुन असतो त्याच्या गरजा इतरांवर अवलंबुन असतात. तसाच काही गरजाच्या वृद्धांच्या असतात. उतारवयात वृद्ध व्यक्ती आपल्या वुंटुबावर विंवा कुटुंबातील व्यक्तीवर अवलंबुन राहत असतो. कारण शारीरिक श्रम करण्याची क्षमता वृद्धांमध्ये कमी झालेली असते. दैनंदिन कार्य करण्यासाङ्गी कोणची तरी मदत वयोवृद्ध व्यक्तीस लागत असते. भारतात साधारणपणे ६० वर्षावरील व्यक्तींना वृद्ध मानण्याचे प्रमाणे आहे. तर ६० वर्षा नंतर व्यक्तीचे अवयवांचे कार्य हळुहळु कमी कमी होत जाते. तर नजर कमी होते, कानानी कमी ऐकु येणे, चालतना तोल जाणे, बसलेली जागा पटकन उठता न येणे, अशा प्रकारे कार्यक्षमता कमी कमी होत जाते त्यालाच आपण वृद्ध असे म्हणतात.

तर पाश्चात्य देशातील मागिल शतकापासून वृद्धांच्या संदर्भात अध्ययन करण्यात आले आहे. वृद्धांच्या समस्या बाबत अध्ययन करणारे एक स्वतंत्र शास्त्र विकसित झाले आहे. त्या शास्त्राला उीदहूदत्दुब् म्हणजे वार्धक्य विंवा वृद्धापकाळाचे शास्त्र असे म्हणतात, वृद्धापकाळाचे शास्त्र विंवा वार्धाक्याशास्त्र हे आधुनिक असले तरी वृद्धांच्या संदर्भात प्राचीन काळापासून विचार केला असल्याचे दिसून येते, व्यक्तीच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्याची स्मरण शक्ती कमी कमी होऊन त्याला मानसिक दृष्ट्या वृद्ध व्यक्ती दुर्बल होत असतात. अशा बौद्धिक व मानसिकदृष्ट्या कमकुवात झालेल्या जेष्ठ व्यक्तीस वृद्ध असे म्हणावे, वृद्धांच्या वयोगटामध्ये जगातील विविध तत्वेतयांच्या विचारांमध्ये तफावत विंवा विविधता आढळते.

**वृद्धांची व्याख्या :–**

१. **व्हिकटर डिसोसा :–** यांनी भारतातील ६५ वर्षावरिल व्यक्तींचा समावेश वृद्धांमध्ये केला जावा असे मत व्यक्त केले आहे.

२. **के.एस.सुजान :–** यांनी असे म्हटले आहे की ज्यांनी वयाची ५५ वर्षे ओलांडली आहेत त्यांना वृद्ध असे म्हणावे.

३. **एलिझाबेथ हरलॉक :–** वृद्धावस्था म्हणजे जीवनातील शेवटचा मावळणारा कालखंड होय.

४. **हेन्सी आणि क्यमिंग :–** यांनी मानवाच्या जीवनातील महत्त्वपूर्ण तसेच पूर्णपणे उपयोगी आणि ज्या विषयी अभिलाषा असते अशा आरंभीच्या काळापासून दुर जाण्याच्या प्रक्रियेला वृद्धावस्था असे म्हणतात.

५. **जेरेमी टन स्टॉलने :–** यांनी त्यांच्या ”ओल्ड अ‍ॅण्ड अलोन”ह्या ग्रंथात अमेरिकेतील ६५ वर्षावरील व्यक्तींचा समावेश वृद्धांमध्ये केला जातो. असे म्हटले आहे.

**वृद्धांच्या समस्यांची भयावह परिस्थिती :–**

आज जागतीक स्तरावर वृद्धांच्या समस्या खुप मोठ्या प्रमाणावर वाढत चालल्या आहेत. त्यांची सोडवणुक करण्यासाठी शासकिय स्तरावरुनही प्रयत्न केले जात आहेत परंतु सर्वच ठिकाणी काहीना काही प्रमाणात वृद्धांना अडथळे अडी अडचणी जाणवत आहेत. बऱ्याच वृद्धांवर आर्थिक फसवणुक होणे, मालमत्ता विंवा प्रॉपट्री मध्ये फसवणुक होणे, बँकेतील पैसा, दागीणे, चोरी करणे, वृद्धांवर जीव घेणे हल्ले होणे, जाणीव पूर्वक अत्याचार करणे. वुंटुबातून व घरातून हाकलुन देणे, कोणत्याही निर्णय प्रक्रियेत सहभागी न होऊ देणे, अशा सर्वच ठिकाणी वृद्धांचे प्रश्न वाढत आहेत. तर आता बऱ्याच वृद्धांचे ऑनलाईन फसवणुक झाल्याच्या घटना पहायला मिळत आहेत. वृद्धांच्या आरोग्य विषय समस्यांनी तर आता फार वरचे स्थान गाढले आहे. जागतिक आरोग्य संस्था या मते वृद्धांसोबत अन्य लोकांची आरोग्याचे प्रश्न खुप जटील बनले आहेत. व त्याचे स्वरुप दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे वृद्धांच्या समस्या खुप गंभीर बाबत आहेत.

**वृद्धांच्या समस्येची कारणे :–**

वृद्धांच्या समस्येची गंभीरता दिवसें दिवस वाढत चालली आहे. त्याचे परिणाम सर्व समाज व्यवस्थेवर होत आहेत. कारण समाज व्यवस्था हा समाजाचाच एक महत्वपूर्ण घटक आहे. त्याचा एक वृद्धापण घटक आहे तसेच वृद्धांच्या समस्या मागील २० वर्षाच्या तुलनेत सध्याच्या परिस्थितीत जास्त जाणवत आहेत कारण,

**१) वुंटुब व्यवस्था :–**

पूर्वी आपल्याकडे वुंटूब व्यवस्था हि खुप महत्त्वाची होती परंतु औद्योगिकरणामुळे व्यक्तीच्या जीवन मानात जोबद्दल झाला त्याचा परिणाम आपल्या कुटूंबव्यवस्थेवर पण झाल्याचे आज आढळत आहे. तर पूर्वी कुटुंबातील प्रमुख म्हणून वयस्कर मंडळीना आदराचे स्थान होते. कुटूंबात मान सन्मान होता. कोणतेही कार्य विंवा समारंभ असला तर वडील धारा मंडहीचा सल्ला घेतला जात असत त्यांचा मानमर्यादाचा सन्मान केला जायचा त्यांना प्रेमाची, आपुलकीची वागणुक दिली जायची परंतु सामाजिक कारणासोबत औद्योगिकरणाचे झपाट्याने वाढ झाल्यामुळे वुंटूबातील महिला पण नोकरी कामधंदा करु लागले आहेत. त्यांना घरा बाहेर पडावे लागते. त्यामुळे अनेक वुंटूबाचे स्थलांतर झाले कामाच्या ठिकाणी राहणे झाले त्यामुळे एकत्र वुंटूब व्यवस्थेचा ऱ्हास झाला आहे.

**२) कौटूंबिक समस्या :–**

वुंटूबातील वातावराण हे नेहमी तान तणावाचे राहते. त्यामुळे सतत चिचिडे, भांडण व एकमेकांवर मोठ्याने ओरडणे, मान अपमान करणे, त्यामुळे मुले कर्तीधर्ती झाली कि लग्नानंतर स्वतंत्र राहायला लागतात, आई–वडिल वेगळे राहतात, नोकरी निमित्त बाहेर गावी राहावे लागते, त्यामुळे वेळेवर जेवन होत नाही परिणामी आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. शहरांची वाढती लोकसंख्या त्यामुळे निवारायचे प्रश्न निर्माण झाले आहेत, शहरात खोल्यांची जागा कमी त्यामुळे स्वतंत्र एकत्रीत राहणे शक्य नाही. शहरात लहान घरातच सर्व गोष्टी करणे जमत नाही, त्यामुळे वृद्धांना घरात ठेवणे अडचणीचे वाटते त्यामुळे वृद्धांना वृद्धाश्रमात पाठवले जाते.

**३) वाढती बेकारी व दारीद्रय :–**

वृद्धांच्या समस्या वाढण्यासाठी वाढती बेकारी व दारीद्रय ह्यांचा पण परिणाम जानवत आहे, कारण कुटूंबातील कमावता व्यक्ती एक असतो व घरात खाणारे सदस्यांची संख्या जास्त असते. परिणामी वृद्धांना वयोमानामुळे काम करता येत नाही विंवा नोकरी धंदा करुन कुटूंबाचा उदरनिर्वाह करणे शक्य नाही, तसेच वाढती शहरे झपाट्याने वाढणारे औद्योगिकरण त्यामुळे सर्वांना जीवन जगण्यासाठी पुरेशी जागा मिळत नाही राहण्यासाठी जागा अपुरी पडत आहे. वाढती महगांई, वाढते इंधनाचे दर त्यामुळे अनेकवेळा वृद्धांना सोसावे लागतात. कित्येक वृद्धांना घरात अन्न शिजवळे तर ते प्रथम लहान बालकाला दिले जाते व नंतर वृद्ध व्यक्तीस दिले जाते. म्हणजे एक प्रकारे कुपोषण होते. तर कित्येक वृद्धांना पोषक व पुरेशा पोटभर आहार पण मिळत नाही. अनेक वेळा उपाशीपोटी झोपावे लागते. तर कित्येक वृद्धांना स्वत: काबाड कष्ट करुन आपल्या उपजिविकेची सोय करावी लागते.

**४) सामाजिक सुरक्षेचा अभाव :–**

अनेक वृद्धांना सामाजिक सुरक्षा मिळत नाही कारण शासकीय स्तरावरुन कितीही प्रयत्न केले तरी प्रत्येक ठिकाणी सामाजिक सुरक्षा पुरवत्ता येणे सरकारी यंत्रणेला शक्य नाही. कारण वाढत्या वसाहती, वाढती शहरे, वाढते दळण वळणाची साधने, वाढती बेरोजगारी वाढती औद्योगिक, कारखाने, वंपन्या इत्यादी ठिकाणी सामाजिक सुरक्षेचा अभाव पहायला मिळतो. कारण पोलिस प्रशासना समोर वृद्धांच्या सुरक्षेचे अनेक प्रकार व गुन्हाचे प्रकार रोज नोंद होत आहेत. वाढत्या गुन्हामध्ये वृद्धांवर होणऱ्या गुन्हांचे प्रमाण हे मोठ्या प्रमाणावर आहे व त्यात दिवसेदिवस वाढही होत असल्याचे आढळून येते.

**५) शेतीपूरक उद्दयोगाचा ऱ्हास :–**

आज वृद्धांच्या समस्यांमध्ये होणारी वाढ ही एक शेती व शेती सोबत जोड धंदयाची झालेली अत्योगती काही प्रमाणात कारणीभुत असल्याचे आढळते.

कारण पुर्वी शेती करण्यासाठी मोठ्याप्रमाणावर मनुष्यबळाची गरज लगायची, शेतीच्या कामासाठी खुप जास्त प्रमाणात रोजदारीवर काम करणारा वर्ग असायचा परंतु आता आधुनिक मशिनरी, आधुनिक औजारांमुळे कमी श्रमात शेती करता येणे शक्य झाले. त्यामुळे गावातील व शेतातील रोजगार कमी झाला, त्यामुळे शहरांकडे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होत आहे, त्यामुळे वयोवृद्ध व्यक्ती शहरात जावुन बोझ बनुन राहण्यापेक्षा गावातच व खेड्यातच ठेवले जातात. त्यांना तेथेच थोडे फार पैसे व अन्न धान्य देऊन उदरनिर्वाहाचे साहीत्य देऊन त्यांच्यावर गावात राहण्याची पाळी आली आहे. व मुला बाळांना शहरात पोटभरण्यासाठी पाठवले जाते हे असे विभिन्न चित्र ग्रामाणि भागात पहायला भेटत आहे.

**६) सामाजिक व आर्थिक समस्या :-**

वृद्धांच्या समस्यांचा आढावा घेताना सर्वात जास्त सामाजिक समस्या मध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे आढळते. कारण समाजातील सर्वच धर्मा मध्ये वृद्धांच्या समस्या वेगवेगळया स्वरुपाच्या आहेत, सामाजिक सुरक्षा, सामाजिक क्षमता, व सामाजीक स्वरुपाचे गुन्हे यांमध्ये खुप वाढझाल्याचे आढळते, सामाजीक जीवन जगताना परावलंबी जीवन जगावे लागते.

वृद्धावस्थेत व्यक्तीचे जीवन परावलंबी होऊन बसते. या अवस्थेत वृद्धांना इतरांवर अवलंबुन रहावे लागते व्यक्तीला कमी एकु येते, म्हणुन मोठ्याने बोलावे लागते, कोणतेही काम करण्यास वृद्ध व्यक्तीची तपारी नसते, व्यक्तीची शारीरिक शक्ती कमी कमी होत जाते, त्यामुहे व्यक्ती निवृत्त होते. मग त्यातून आर्थिक नुकसान होते. उत्पन्नाचा स्त्रोत कमी होतो, मग आपल्या दैनंदिन गरजांचे प्रमाण कमी होते मनाप्रमाणे खर्च पूर्ण करु शकत नाही, औषधउचारांवर खुप खर्च होतो महागडी औषधी, गोळयावर खुप खर्च होतो, त्यामुळे मुले देखील जरा फटकुन वागतात, अनावश्यक खर्च वाढल्यामुळे आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणावर होत असते, तसेच नकारात्मक स्वरुपाचा दिनक्रम असल्यामुळे छोट्या–छोट्या चुका होतात त्याचा पण परिणाम होते, शरिर साथ देत नाही अनेक आजार मागे लागलेले असतात, त्यामुळे हॉस्पीटल वर पण खुप खर्च होत असतो, इ. अनेक कारणांचा परिणाम वृद्धांवर होत असतो.

**वृद्धांच्या समस्या वरील उपाय योजना :–**

विज्ञानाच्या शोधांमुळे माणसाची आयुमर्यादा वाढत आहे, मानवाचा वार्धक्य सुसाह्य सुखकर होईल. जेष्ठांचे शेवटचे दिवस शांततेत सुखकर होतील यासाठी वुंटूबीय नातेवाईक मित्रपरिवार, समाज साऱ्यांचा सहभाग आवश्यक आहे. त्याच बरोबर कायदा ही जेष्ठांचे हित जपणारा असायला हवा, वृद्ध, वार्धक्य, वृद्धाश्रम, कठोर आर्थिक वास्तव हे सारे स्वीकारण अपरिहार्य आहे, त्याच सोबत वृद्धांना नियोजेच स्वातंत्र असायला हवे. म्हणजे राईट टू लिव्ह विथ डिग्नटी असायला हवी, वृद्धा वस्थेतील शारिरीक अवस्था, असाह्य रोग, अपुऱ्या वैद्यकिय सोयी सुविधा, यामुळे ज्गमे असह्य होत जाते. त्यामुळे अनेक वृद्ध हे स्वच्छा मरणाचा मार्ग स्विकारत नाहीत. कारण वृद्धांची जीवन जगण्याची इच्छा, जिवन जगण्याची प्रेरणा अधिक प्रबळ असते, त्यामुळे प्रत्येकाला जिवन जगण्याचा हक्क भारतीय राज्य घटनेने अभिप्रेत केलेला आहे, मानवी हक्क, म्हणजे सामाजिक दृष्ट्या वंचित

वर्गाचा विकास वयोवृद्ध, कामगार, विकलांग व्यक्तीचे कल्याण, सोबत वृद्धांचे कल्याण यामध्ये, आर्थिक समस्या अरोग्याच्या समस्या, विभक्त कुटूंब, पद्धतीमुळे भेडसावणरे प्रश्न आदींचा अभ्यास करण्यात आला आहे. तसेच वृद्धांसाठी आढळण्यात आलेले सहकारी धोरण, सरकारी धोरण योजना व कार्यक्रम अशी माहीती घेण्यात आली आहे.

भारतात राष्ट्रीय वृद्ध व्यक्ती विषयक धोरण १९९९ त्याची उद्दिष्ट्ये माता, पिता, व जेष्ठ नागरिक देखभाल कल्याण कायदा २००७, सर्वात प्रथम वृद्धांच्या वेतन योजना, १९९२ पासुन वयस्कर विंवा वृद्ध व्यक्तीच्या कल्याणासाठी लागु केलेला एकात्मिक कार्यक्रम जेष्ठ नागरिक कल्याण निधी, वयोश्रेष्ठ सन्मान जेष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय पुरस्कारांची योजना १ ऑक्टोबंर हा संयुक्त राष्ट्रातर्पें वृद्धापकाळ पेंन्शन, वृद्धांसाठी राष्ट्रीय परिषद, वृद्धांसाठी राष्ट्रीय धोरण, वृद्धाश्रम, वृद्धांसाठी काम करणाऱ्या बिगर शासकीय संस्था, इंटरनॅशनल पेंडरेशन ऑन एजिंग, हेल्प एजइंटर नॅशनल हेल्पएज इंडिया, प्रेंड इन नीड सोसायाटी एमकेअर इंडिया इत्यादी.

**वृद्धांसाठीच्या योजना :–**

विकलांग व्यक्तीसाठी असलेल्या घटनात्मक तरतुदी म्हणजे घटनेच्या भागचार मधील कलम ४१ तसेच कार्यरत असलेल्या दिव्यांग सबलीकरण विभाग, वैधानिक तरतुदी भारतीय पुनर्वसन परिषद कायदा १९९२ नि:क्षम व्यक्तीचे हक्क कायदा २०१६ पं. दिनदयाल नि:क्षम व्यक्ती पुनर्वसन योजना, सुगम्य भारत अभियान, इत्यादीचा अभ्यास केल्यास दिवांग व्यक्तीसाठी कामकरणाऱ्या संस्था इ. त्याचप्रमाणे भारतात सामाजिक सुरक्षा कायद्या बरोबरच प्रधानमंत्री सुरक्षा योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, अटल पेन्शन योजना

**वृद्धांच्या समस्येकडे पाहण्याचा दृष्टीकोन :–**

वृद्धांचा समस्यांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन हा इतर समस्यांपेक्षा वेगळा असल्याचे जानवते, कारण वृद्धावस्याही शेवट व उतार वयातील अवस्था म्हणून पाहीजे जाते, पंरतु वृद्ध हे एक ज्ञानाची बॅक आहे त्यांच्या कडे आयुष्यभर घेतलेला अनुभव आहे काम करण्याची नवीन उपाय योजना असते कुटूंबाना लागणारे सर्व ज्ञान पुरेपुर प्रमाणात वृद्धांकडे असते. तयांच्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी केला तर वेगळी ओळख समाजाला मिळेल त्यांच्याकडे असणारा अनुभवाचा वापर सकारात्मक गोष्टीकडे केल्यास वृद्ध हे समस्या न वाटता ते उर्जाचे स्त्रोत (वेंद्र) ठरु शकतात.

त्याच्याकडे असणाऱ्या कौशल्य, कला, गुणांचा वापर करुन समाजात चांगली व्यवस्था तयार केली जावु शकते, ते पुढील प्रमाणे.

१. वृद्धांना त्यांच्या मनाप्रमाणे सर्व ठिकाणी कार्य करु देणे त्यांचे निरागस वृद्धत्व हिरावुन न घेता मनसोक्त वागु दयावे.
२. वृद्धांना कमी पैसात रोजगार दिला जावु शकतो, त्यांना कार्यात व्यस्त ठेवल्यास नैराश्य व नकारात्मकता संपुष्टात येईल.
३. ते समाजावर बोझ न बनता ते एक सक्षम नागरीक बनु शकतात.
४. वृद्धांवर सतत आर्थीक खर्च न करता त्यांना कुटुंबा सोबतच समायोजन केल्यास त्यांचे योग्य ठिकाणी पालन पोषण होवु शकते.

५. वृद्ध हे समाजातील दुर्लक्षीत दुर्बल मानसिकतेमुळे समस्या बनत आहे, त्यासाठी कठोर कायदे करुन त्यांचे संपूर्ण पूनर्वसन होवु शकते.

**संशोधन साहीत्याचा आढावा :–**

संशोधन विषयाच्या अनुषंगाने आपण पुढील पूर्व साहित्याचा आढावा घेण्यात आलेला आहे. वृद्धांच्या समस्यांची पाश्र्वभुमीसाठी इंटरनेटवरील विविध वेबसाईटचा वापर, व पुस्तकांचा वापर करण्यात आलेला आहे, तसेच विविध वर्तमान पत्रातील लेख आणि प्रत्यक्ष रुग्णालयात येणाऱ्या वयोवृद्धांचे निरिक्षण, मुलाखतीच्या प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा साहित्याचा समावेश या मध्ये करण्यात आलेला आहे.

**संशोधनाची आवश्यकता :–**

वृद्ध म्हटले की आपल्या डोळयासमोर येते ती वयस्कर व्यक्ती थकलेला चेहरा, थकलेले शरीर बळजबरीने बसलेली जागा उठण्याचा चाललेला प्रयत्न, हतात काठी, डोळयावर मोठ्याल्या काचेचा चष्मा, विंवा प्रवासात एका कोपऱ्यात बसलेला वयस्कर व्यक्ती, आपल्या दैनंदिन कार्यासाठी कोणावर तरी विलबुंन असणारी म्हतारी, परंतु प्रत्यक्षात मात्र समाजात सगळीकडे असे निराशाजनक चित्र पहायला मिळते नाही, हि दुसरी बाजु विसरुन चालनार नाही, कारण २०११ च्या जनगननेनुसार भारतात ८.९ टक्के ऐवढी आहे म्हणजे एवूंण लोकसंख्येच्या ८.९. टक्के म्हणजे खुप मोठा भाग या वृद्धांचा आहे हे लक्षात येते.

एक सामाजिक जबाबदारी म्हणून सामाजिक कार्य करताना संशोधन करणे आवश्यक वाटले आहे. कारण आपल्या आजुबाजुला सर्व ठिकाणी वृद्धांचे होणारे हाल पहाविले जात नाहीत.

वृद्धांना उपेक्षित वागणुक मिळते स्वत च्या घरातुन हाकलुन दिले जाते, वृद्ध एक समाजाचा घटक म्हणून व सामाजिक जबाबदारी म्हणून प्रत्येकाने या घटकाकडे लक्ष देणे आवश्यक आहे, परंतु असे होत नाही ग्रामिण भागात वृद्धांचे वेगळे प्रश्न आहेत, तर शहरी भागात वेगळे प्रश्न आहेत दोन्ही ठिकाणी वृद्धांच्या समस्या कडे दुर्लक्ष केल्याच जाते. वृद्धांना कुटूंबापासून वेगळे न करता समाजाचाच भाग म्हणून स्विकारले जावे,

वरिल सर्व समस्या आहेत म्हणून वृद्धांच्या समस्याला सोडवणुकीचा प्रयत्न करणे संशोधकाला आवश्यकता वाटली म्हणून हे संशोधन करण्याची गरज आहे.

**संशोधन पद्धती :–**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने वर्णनात्मक व व्यष्टी अध्यापन पद्धतीचा वापर केला असून माहिती मिळण्यासाठी प्राथमिक स्त्रोतांमधील प्रश्नावली, मुलाखत, अनुसुची, प्रत्यक्ष भेट, त्यांच्यावर करण्यात आला आहे. तसेच द्वितीय स्त्रोतांमध्ये लेख, मालिक, पुस्तके, अहवाल शासकीय रेकार्ड यांचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधन मर्यादा :–**

मराठवाड्यातील वृद्धाश्रमातील वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास करतांना ३ जिल्ह्यात वृद्धांश्रमातील उपलब्ध माहीती व उत्तरदात्या एवढीच मर्यादीत असुन वृद्धाश्रमातील श्री पुरुषांची निवड केली आहे व त्यांची शैक्षणिक व मानसिक बाजुंचा विचार करुन उत्तरदात्यांकडून अनुसुची भरुन घ्यावी लागेल.

**समग्र :–**

संशोधनाचे समग्र हे मराठवाड्यातील वृद्धाश्रमातील वृद्धांच्या समस्यांचा पूर्तीचे अनुसरुनच असेल उपलब्ध २०० उत्तर दातयापूर्ताच मर्यादित असेल, व स्त्री पुरुष वृद्धांचा समस्या संशोधनात समग्र म्हणून उपयोग असेल.

**संशोधनाचे उद्देश :–**

१) वृद्धश्रमातील वृद्धांचे समस्यांचा आढावा घेणे.

२) वृद्धांच्या जिवन मानाचा व उपयांचा आढावा घेणे.

३) वृद्धांच्या बाबतीत समाज स्वंयसेवी संस्था व शासन यांच्या भुमिकेचा आढावा घेणे.

**संशोधनातील उपकल्पना :–**

१) वृद्धांश्रमातील वृद्धांच्या अनेक विविध समस्या आहेत.

२) वृद्धाश्रमाची व वृद्धांत्वाची विविध कारणे आहेत.

३) वृद्धांश्रमातील वृद्धांच्या समस्याच्या बाबतीत समाज, स्वयंसेवी संस्था शासना मार्फत विविध प्रयत्न होत नाही वृद्धांच्या समस्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत.

**नमुना निवड :–**

मराठवाड्यातील वृद्धाश्रमातील वृद्धांच्या समस्यांचा अभ्यास करतांना नमुना पद्धतीत समग्रांचे प्रतिनिधी म्हणून विशिष्ट एकक म्हणजे स्तरीत नमुन्यातील प्रमाणित स्तरीत यादृच्छिक नमुना निवड पद्धत वापरली आहे, यामध्ये वृद्धाश्रमातील निवड हि मराठवाड्यातील ३ जिल्हातील वृद्धाश्रमांची संख्या निश्चित केलेली आहे, एवूंण २०० वृद्धांची उत्तरदाते म्हणून नमुना निवड केली आहे.

**तथ्य संकलन :–**

संशोधना करिता संशोधकाने मराठवाड्यातील वृद्धाश्रमातील वृद्धांच्या समस्याचा अभ्यास करण्यासाठी ३ जिल्हाची निवड केलेली आहे, त्यातील २०० उत्तरदाते स्त्री, पुरुषांची मुलाखत अनुसुचीत निवड करतांना प्राथमिक स्त्रोत आणि दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे, यामध्ये मुलाखत अनुसुची वृद्धांचा प्रत्यक्ष भेटी, विविध ग्रंथ पुस्तके मासिके वृतमान पत्रे, लेख अहवाल वेळोवेळी इंटरनेट वरिल माहिती यांचा उपयोग करण्यात आला आहे.

**सुचना :–**

१. वृद्धाश्रमातील वृद्धांच्या बाबतीत शासनाने केलेल्या कायदयांचे व नियमांचे योग्य अमलबजावनी करणे.
२. समाजातील प्रत्येक घटकाने वृद्धाश्रमातील वृद्धांच्या बाबतीत जागरुकता दाखवुन त्याची संबंधीत विभागाला माहिती द्यावी.
३. वृद्धाश्रमातील वृद्धांच्या समस्यांचे मुळे शोधून काढणे व त्यावर उपाय योजना सुचवणे व शासनाने कायमचे पूनर्वसना बाबत ठेस उपाय योजना करावी.

**निष्कर्ष :–**

वृद्धाश्रमातील वृद्धांच्या बाबतीत व्यक्ती, समाज, सेवाभावी संस्था, समाजकल्याण विभाग, शासकीय यंत्राना या ठिकाणी उदाशिनता आढळते, ग्रामिण व शहरीभागात सर्व ठिकाणी वृद्धांच्या समस्या कडे दुर्लक्ष केल्या जाते, शासनाच्या विविध योनांचा म्हणावा तसा प्रभाव पडलेला दिसत

नाही माता पित्यांचा छळ केला म्हणून कायदयाने शिक्षा केलेले फार कमी प्रकरण ेसमारे येत आहेत म्हणवे तितका कायदयाचा धाक समाजात पहायला मिळत नाही. म्हणून आज ही अनेक वृद्धांच्या समस्या आहेत तशाच पहायला मिळतात.

**संदर्भ ग्रंथ**


**1** वरिष्ठ नागरिक जीवन दर्शन - लेखक प्रो.डॉ. साहेनराज तातडे, डॉ. गजेन्द्र सिंह शेखावत, प्रथम संस्करण २०१४, प्रकाशक : ओम प्रिन्टर्स जयपुर.

**2** वृद्धांच्या समस्या : चिंता आणि चिंतन, डॉ. दिलीप खैरनार, प्रथम आवृत्ती १ सप्टेंबर २००७ प्रकाशक, विश्वंभर कुलकर्णी, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

3 https//vishwakosh.marathi.gov.in

4 https://lib.unipune.ac.in

5 https//wwwresaerachgate.net

6 Aging an interdisciplinary approach.

7 Edited by :- Sarjoo Patel and Veena Gandotra

8 Published by :- Rawat Publications Jaipur.

9 Old – Age Care and welfare administration.

10 Pratap Joshi, - First Published – 2000, Kanishka Publishers, Distributors : New Delhi.

11 An aging India (Perspectives, Prospects & Policies)
1) Phoebe S. liebig 2) S. Irudaya Rajan

12 https/wwwsaamana.com

13 https://maharashtratime.com


* * *

# स्त्री–पुरुष यांच्या शेतीतील सहभागाच्या स्वरूपाचे अध्ययन; संदर्भ बीड जिल्हा.


मार्गदर्शक
***प्रा. डॉ. नजीर जब्बार शेख***
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय,
अंबाजोगाई

संशोधक
***माळवदकर तेजस लक्ष्मनराव***
*सहाय्यक आयुक्त*
*समाजकल्याण विभाग, नांदेड*


**प्रस्तावना:–** शेतीतील स्त्री पुरुष यांची कामे भिन्न स्वरुपाची असतात परंतु काही कामे हि समान असतात. या कामासाठी स्त्री आणि पुरुष यांची मजुरीचा दर ठरलेला असतो. वरील सारनीचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, ग्रामीण भागातील शेतीती, काही कामे हि फक्त पुरुषच करतात तर काही कामे हि महिलांनीच करावे असे अपेक्षित असते, पुरुषांच्या कामात फवारणी पेरणी, नागरणी यासारख्या कामाचा समावेश होतो तर स्त्रियांच्या कामात खुरपणी, मिरची तोडणे, लसून लावणे वेचणी यासारख्या कामाचा समावेश होतो. तर बरीचशी कामे स्त्री–पुरुष दोघेही करतात. ग्रामीण भागात स्त्री आणि पुरुषांची कामे भिन्न स्वरुपाची असलेली दिसून येते. घरात पुरुषांनी करावयाची कामे स्त्रियांनी करावयाची कामे भिन्न स्वरुपाची आहेत. महिलांना घर व शेतीतील कामे परंपरेने वाटून दिलेली दिसून येतात, परंतु काही कामे हे स्त्री व पुरुष दोन्ही करतांना दिसून येतात. जसे कोळपणी, काढणी व काही प्रमाणात कापणी.

**1. गुप्ता जे.आर. (1974)** अंतर प्रादेशिक व अंतर हंगामी मजुरीतील तफावत आणि विविध हंगामातील मजुराची गरज व वेतन यांच्यातील सहसंबंध शोधण्याचा प्रयत्न प्रस्तुत अभ्यासात करण्यात आल. प्रस्तुत संशोधनात असे निरीक्षण नोंदविल्या गेले की, विभाग परत्वे वेतनातील तफावत दिसून येते तसेच प्रत्येक रुतुमाना नुसार वेतनात तफावत दिसते.

**2. चक्रवती (1975)** यांनी महिलांचा हरियानातील शेती विकासात सहभाग या बाबीबर अभ्यास केला व असा निष्कर्ष काढला की, हरियाना राज्यातील महिलां सर्वात जास्त शेतीत सहभागी होतात.

**3. कौर (1982):–** यांनी केलेल्या अभ्यासात असे निदर्शनास आले कि मागास क्षेत्रातील महिला कामगार म्हणून जास्त आहेत. या अभ्यासात असे हि आढळून आले कि, क्षिक्षण स्त्रियांच्या विविध क्षेत्रातील सहभागात महत्वाची भूमिका पार पडते. स्वयंपाक करणे, गुरा ढोरांची काळजी घेणे, कपडे धुणे, अन्न धान्यावर प्रक्रिया करणे, दळणे , मुलांचा सांभाळ अशा कामात स्त्रियांना १३ तसा पेक्षा जास्त काम करावे लागते.

**4. अग्निहोत्री (1983)** यांनी महिलांच्या शेतीतील सहभाग विषयी केलेल्या संशोधनात असे निष्कर्ष काढले कि, शेतीत 63 टक्के महिला काम करतात तर त्या पैकी 90 टक्क्के महिला शेतीशी निगडीत विविध कामात गुंतलेल्या असतात.

**5. सिधू आणि कौल: (1985)** शेतीतील अधुनिकीकार्णामुळे महिलांच्या कामात वाढझालेली आहे व स्त्री पुरुषाच्या वेतनातील तफावत कमी झालेली आहे. तर शेतीतील यांत्रिकी कारणामुळे स्त्री व पुरुष दोन्ही कामगारावर परिणाम झालेल्या दिसून येतो, यात मुख्यत: स्त्री कामगारावर जास्त परिणाम झालेला दिसून येतो.

**संशोधनाचे उद्देश:–**

1. शेतीत काम करणाऱ्या स्त्री–पुरुष यांच्या कामातील साधार्म्यचा अभ्यास करणे.
2. पुरुष व स्त्री यांच्या कामाच्या स्वरूपाचे अध्ययन करणे.
3. स्त्री–पुरुष मजुरीच्या दरातील तफावतीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती:–**

**संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा:–**

प्रस्तुत संशोधन विषयाची व्याप्ती हि बीड जिल्हा असून या जिल्ह्यातील अंबाजोगाई व केज तालुक्यातील 10 गावातील शेतीत सहभागी होणाऱ्या महिलांच्या शेतीतील सहभाग, त्यांच्या कामाचे स्वरूप,या बाबी पर्यंतच मर्यादित आहे.

**नमुना निवड (अभ्यासासाठी समग्र व एककाची निवड ) :–**

अभ्यास क्षेत्रात बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई आणि केज या दोन तालुक्याचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रवर्ग, साक्षरता इत्यादी आधारे अभ्यासाच्या उद्देशाने प्रत्येक तालुक्यातील पाच गावे संशोधनासाठी निवडली होती. प्रस्तुत संशोधनात उद्देश्पूर्ण नमुना निवड तीन स्तरावर करण्यात आली. पहिल्या स्तरात तालुका निवड, दुसऱ्या स्तरात गावांची निवड व तिसऱ्या स्तरात प्रतीसादकाची निवड करण्यात आली.

निकषाच्या आधारावर गावांची निवड करून उद्देश्पूर्ण नमुना निवडीचा अवलंब करून एकूण 10 गावातून प्रत्येकी 20 एककाची प्रत्येक गावातून निवड करण्यात आली. म्हणजेचएकूण समग्रातून २०० एककाची नमुना म्हणून निवड केली.

**तथ्यांचे विश्लेषण:–**

**सारणी क्र. 1. स्त्री पुरुष कामातील साधर्म्य बाबत**

| अ. क्र. | विवरण | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 14 | 7 |
| 2 | नाही | 186 | 93 |
| **एकूण** | | 200 | 100 |

**स्त्रोतः प्राथमिक तथ्य**

शेतीतील कामाची विभागणी पण स्त्री आणि पुरुषात केलेली आढळून येते. स्त्रियांनी कोणती कामे करावी व पुरुषांनी कोणती कामे करावी अशी अलिखित धारणा ग्रामीण भागात दिसून येते. जे काम स्त्रियांनी करणे अपेक्षित आहे त्या कामासाठी पुरुष तयार होत नाहीत तर पुरुषाची कामे स्त्रिया करताना दिसत नाही. एकूण शेतीतील कामाची स्त्री–पुरुषात विभागणी केलेली आहे व यांची कामे पूर्णतः भिन्न आहेत असे मानणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे व त्याचे प्रमाण 93 टक्के आहे. परंतु शेतीतील काही कामे अशी आहेत की, जे स्त्रिया आणि पुरुष करू शकतात असे मत असणाऱ्यांचे प्रमाण फक्त 7 टक्के आहे.

वरील सारणीवरून असे निदर्शनास येते की, शेतीच्या कामात हि लिंगभाव आहे व समाजाने स्त्री पुरुष यांना मान्यता दिलेली कामेच स्त्रिया किंवा पुरुष करताना दिसून येतात.

**पुरुषांना शेतात करावयाची कामे :–**

पुरुषांना शेतीतील विविध कामे करावी लागतात. ग्रामीण भागात अशी धारणा आहे की, ज्या कामासाठी जास्त शारीरिक श्रम (ताकद) लागतात ती कामे पुरुष करत असतात व कमी श्रम

(ताकद) लागणारी कामे महिला करतात. शेतीतील कामाचे स्वरूप यावरून कामाची विभागणी झालेली दिसून येते.

**आलेख क्र. 1. पुरुषांना शेतात करावयाची कामे**




**स्त्रोतः प्राथमिक तथ्य**

पुरुषांना शेतीतील विविध कामे करावी लागतात. ग्रामीण भागात अशी धारणा आहे की, ज्या कामासाठी जास्त शारीरिक श्रम (ताकद) लागतात ती कामे पुरुष करत असतात व कमी श्रम (ताकद) लागणारी कामे महिला करतात. शेतीतील कामाचे स्वरूप यावरून कामाची विभागणी झालेली दिसून येते. फार पूर्वी पासून श्रमविभागणी स्त्री–पुरुष यांच्यात झालेली आहे व त्यानुसार शेतीतील कामे पूर्ण करण्यात येत असतात. वरील सारणी वरून असे दिसून येते की, प्रतिसादक महिलांच्या मतानुसार पेरणे, नांगरणे व कोळपने हि कामे पुरुषांची आहेत तसेच जनावरांचा सांभाळ करणे व शेतीला पाणी देणे हि पण कामे पुरुषांना करावी लागतात.

**स्त्रियांची शेतातील व इतर कामेः–**

स्त्रियांना पुरुषापेक्ष कमी कामे असतात असे पुरुष सांगत असतात, परन्तु महिला अणि पुरुष यांच्या कामाचे विश्लेषण केले  असता असे दिसून येते की, महिलांना घरातील सर्व कामे करुन शेतीतील कामे करावी लागतात. विशेषतः महिलांना घरातील कामे ही कामावर जाण्याच्या वेळेत पूर्ण करावी लागतात. शेत व घरातील कामाबरोबरच जनावाराची देखभाल पण महिलेलाच करावी लगते. यात गुरांचा गोठा स्वच्छ करने, गुरांना गोठ्यात बंधने, कधी कधी दूध काढ़ने यासारख्या कामाचा समावेश होतो.

शेती आणि शेतीशी निगडीत सर्वच कामे स्त्रियांना करावी लागतात. स्त्री पुरुष अशी कामाची विभागणी झालेली जरी दिसून येत असली तरी महिला पुरुषाबरोबर पुरुषाची कामे पण करतांना दिसून येतात.

**आलेख क्र. 2. स्त्रियांची शेतातील व इतर कामे**




**स्त्रोतः प्राथमिक तथ्य**

शेती आणि शेतीशी निगडीत सर्वच कामे स्त्रियांना करावी लागतात. स्त्री पुरुष अशी कामाची विभागणी झालेली जरी दिसून येत असली तरी महिला पुरुषाबरोबर पुरुषाची कामे पण करतांना दिसून येतात. महिलांना शेतात करावयाच्या कामात प्रामुख्याने खुरपणी वेचणी व काढणी या तीन मुख्य कामाचा समावेश होतो. अभ्यास क्षेत्रात असे निदर्शनास आले की, सर्वच गावात वरील तीन कामे हे महिला प्रकर्षाने करतांना दिसतात असे मत अनुक्रमे 97 टक्के, 98.50टक्के व 99 टक्के महिला प्रतीसाद्काने दिले.

महत्वाच्या कामाव्यतिरिक्त महिलांना जनावरांना चार टाकणे, दुध काढणे,जनावरांना गोठ्यात बंधने या सारखी कामे करावे लागतात. तर कोळपणी चे काम महिलांना करावे लागतात असे मत असणाऱ्या प्रतीसाद्काचे प्रमाण 45 टक्के आहे, तर महिला खत हि घालण्याचे काम करतात असे 40.50 टक्के प्रतीसादकाचे मत आहे या शिवाय 31.50टक्के महिला प्रतीसाद्काच्या मतानुसार शेतीतील पिकांना पाणी देण्याचे काम महिला करतात.

वरील सारणीचे विश्लेषण केल्यास असे दिसून येईल की, कोळपणी, खात घालणे, पिकांना पानी देणे हि कामे पुरुषांनी करणे अपेक्षित आहे तरी पण हि कामे महिला करतांना दिसून येतात.

**सारणी क्र. 2. स्त्री –पुरुषाच्या कामाचे स्वरूप व मजुरी दर**

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | पुरुष मजुरी दर (रुपयात) | स्त्री मजुरी दर (रुपयात) |
|---|---|---|---|
| 1 | शेतीतील वेचणी | ––– | 200 |
| 2 | दगडाचे बांध बांधने, दगड वेचणे, उचलणे | 300 | 200 |
| 3 | पेरणी | 400 | ––– |
| 4 | खत पेरणी | ––– | 200 |
| 5 | अदरक व कापूस लावण्याची कामे | 300 | 200 |
| 6 | फवारणी | 400 | ––– |
| 7 | कोळपणी | 300 | 300 |
| 8 | खुरपणी | ––– | 200 |
| 9 | मिरची तोडणे | ––– | 200 |
| 10 | काढणीचे सर्व कामे (सोयाबीन काढणी) | 500 | 300 |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | तोडणी बडवणे | 500 | 300 |
| 12 | लसून लावणे | ––– | 200 |
| 13 | पेरणी (रब्बी) | 500 | ––– |
| 14 | वेचणी | ––– | 200 |
| 15 | तूर बडवणे | 300 | 200 |
| 16 | गहू, ज्वारी काढणे | 300 | 200 |
| 17 | हरभरा काढणे | 300 | 200 |
| 18 | मळणी चे कामे | 60 रु. कट्टा | 60 रु. कट्टा |
| 19 | शेतातील शेनखत उचलणे/पसरविणे | 300 | 200 |
| 20 | नांगरणी पाळी घालणे | 300 | ––– |

**स्त्रोतः– प्राथमिक तथ्य**

वरील सारनीचे निरीक्षण केले असता असे दिसून येते की, जी कामे फक्त महिलाच करतात त्या कामाचा मजुरी दर हा रु. 200 आहे तर पुरुषांना करावयाच्या कामाचा मजुरी दर कमी अधिक दिसून येतो. तसेच जेंव्हा एकाच काम स्त्री व पुरुष करत असतात तेंव्हा पण मजुरीत तफावत दिसून येते. वरील सारणीत असे दिसून येते की, दगडाचे बांध किंवा दगड उचलणे हि कामे स्त्री व पुरुष दोन्ही करतात परंतु, या कामासाठी पुरुषाला दिवसाला रु ३०० मजुरी मिळते तर स्त्रियांना रु. 200 देण्यात येते. या मागे स्त्रिया पुरुषाच्या तुलनेत कमी काम करतात अशी पुष्टी देण्यात येते. या व्यतिरिक्त आडारक व लसून लावणे या सारख्या कामात हि पुरुषांना रु 300 तर स्त्रियांना रु. 200 मजुरी देण्यात येते.

फक्त एकाच कामात स्त्री आणि पुरुष यांना समान मजुरी देण्यात येते ते म्हणजे पुरुषांच्या बरोबरीने कोळपणी करणे होय. हे काम पुरुषांच्या बरोबरच करावे लागते व स्त्रिया हे काम पुरुषापेक्षा कमी करतात अशी पुष्टी जोडता येत नाही म्हणून दोघानाही समान मजुरी म्हणजे रु 300 मिळतात. या कामाव्यतिरिक्त कोणत्याही कामात स्त्रियांना पुरुषाबरोबर मजुरी मिळत नाही.

काही मजुरीच्या काही कामात स्त्री व पुरुष यांच्या मजुरी दारात 30 ते 33 टक्के तफावत दिसून येते तर काही कामात 40 टक्क्यापर्यंत तफावत दिसून येते. सोयाबीन काढणी या कामात पुरुषांना रु 500 मजुरी दिल्याजाते तर स्त्रियांना फक्त रु 300 देण्यात येते याठिकाणी रु 200 म्हणजेच पुरुषाच्या तुलनेत 40 टक्के मजुरी कमी मिळते. तूर बडवणे हरभरा काढणे, शेतात शेन खात पसरविणे या सारख्या कामात महिलांना रु 200 तर पुरुषांना 300 रु रोज दिला जातो.

**वर्षभरातील स्त्री –पुरुषाच्या कामाचे स्वरूप :–**

शेतीत स्त्री–पुरुषांना वर्षभर काम उपलब्ध असते. फक्त कामाचे स्वरूप ऋतूनुसार बदलत जातात. कोरडवाहू शेतीतील कामे पेरणीपूर्वी पूर्ण करावी लागतात, सर्वसाधारणपणे कोरडवाहू शेतकऱ्यांना शेतीच्या मशागतीची कामे एप्रिल–मे महिन्यात पूर्ण करावी लागतात. सरासरी जून–जुलै महिन्यात पेरणीला सुरुवात होते.

**सारणी क्र. 3. वर्षभरातील स्त्री –पुरुषाच्या कामाचे स्वरूप**

| अ. क्र. | कामाचे स्वरूप | पुरुष | स्त्री | महिना |
|---|---|---|---|---|
| 1 | शेतीतील वेचणी | ––– | होय | एप्रिल–मे |
| 2 | दगडाचे बांध बांधने, दगड वेचणे, उचलणे | होय | होय | एप्रिल–मे–जून |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | पेरणी | होय | होय | जून–जुलै |
| 4 | खत पेरणी | –– | होय | जून–जुलै |
| 5 | अदरक व कापूस लावण्याची कामे | होय | होय | जुन–जुलै |
| 6 | फवारणी | होय | ––– | जुलै–ऑगस्ट–सप्टेंबर |
| 7 | कोळपणी | होय | होय | ऑगस्ट–सप्टेंबर |
| 8 | खुरपणी | ––– | होय | ऑगस्ट –सप्टेंबर |
| 9 | मिरची तोडणे | ––– | होय | सप्टेंबर –ऑक्टोबर |
| 10 | काढणीचे सर्व कामे | होय | होय | ऑक्टोबर– नोव्हेंबर |
| 11 | तोडणी बडवणे | होय | होय | ऑक्टोबर– नोव्हेंबर |
| 12 | लसून लावणे | ––– | होय | ऑक्टोबर–नोव्हेंबर |
| 13 | पेरणी (रब्बी) | होय | होय | ऑक्टोबर–नोव्हेंबर |
| 14 | वेचणी | ––– | होय | ऑक्टोबर– जानेवारी |
| 15 | तूर बडवणे | होय | होय | जानेवारी–फेब्रुवारी |
| 16 | गहू, ज्वारी काढणे | होय | होय | मार्च–एप्रिल |
| 17 | हरभरा काढणे | होय | होय | मार्च–एप्रिल |
| 18 | मळणी चे कामे | होय | होय | मार्च–एप्रिल–मे |
| 19 | शेतातील शेनखत उचलणे व पसरविणे | होय | होय | एप्रिल–मे |
| 20 | नांगरणी पाळी घालणे | होय | ––– | एप्रिल–मे–जून |

**स्त्रोतः– प्राथमिक तथ्य**

प्रत्येक हंगामानुसार कामे भिन्न असतात, शेतीतील वेचानीची कामे स्त्रियांना एप्रिल मे मध्ये करावी लागतात, तर जून–जुलै या महिन्यात पेरणी, खात पेरणी, अदरक लावणी यासारखी कामे महिलांना करावी लागतात. जुलै–ऑगस्ट–सप्टेबर या महिन्यात महिलांना अदरक व कापूस लावणी ची कामे करावी लागत्तात. ऑगस्ट –सप्टेंबर –ऑक्टोबर या महिन्यात मिरची काढणे, मुग उडीद काढणे, बडवणे या सारखी कामे असतात तर नोव्हेंबर ते मार्च पर्यंत महिलांना शेतीतील पिके काढणे, तूर बडवणे, ज्वारी हरभरा काढणे या सारखी कामे करावी लागतात.

वरील सारणी वरून असे दिसून येते की, महिलांना प्रत्येक हंगामात भरपूर कामे असतात व या सर्व कामाचे विश्लेषण केले असता असे दिसून येते की, शेतीतील बहुतेक कामे हे स्त्रियांवरच अवलंबून आहेत.

**निष्कर्षः–**

लिंगभेदावर आधारित भूमिका व दर्जाचा उल्लेख ताल्कोत पारसन ने प्रकार्यात्मकता या सिद्धांतात दिसून येतो. या सिद्धांतानुसार दिलेल्या दर्जानुसार हक्क व कर्तव्य ठरत असतात. ग्रामीण भागात विशेषतः शेतीच्या प्रक्रियेत सहभागी होणार्या महिला ह्या त्या त्या समाजाने ठरवून दिलेल्या लिंगाधारित भूमिका पार पडताना दिसून येतात. ग्रामीण भागात महिलेचा शेतीतील सहभाग हा लिंगाधारित आहे. शेतीतील कामाची विभागणी स्त्री–पुरुष यावर आधारित आहे. महिला ह्या शेतात काढणीचे काम, काशा, दशकात, दगड वेचनीचे कामे, उसतोडी, खुरपणी, पिकांना पाणी देणे, खात पेरणे, कोलपणे, कापूस वेचणे , जनावरे सांभाळणे, भाजीपाला तोडणे, तूर बडवणे, मुग–उडीद बडवणे या सारखी कामे करतात. शेतीच्या कामाव्यतिरिक महिलांना इतर हि कामे करावी लागतात

जसे गुरे बंधने, शेन काढणे, गोठा स्वच्छ करणे, इत्यादी घर कामात हि महिलांना पूर्ण लक्ष द्यावे लागते.

स्त्रीयाची जी कामे असतात्त त्या कामाच्या मजुरीच्या दरात हंगामा नुसार बदल होत नाही तर पुरुषांच्या कामात वाढझालेली दिसून येते. तसेच शेतीच्या कामात महिलांना पुरुषाच्या तुलनेत 30.33टक्के मजुरी कमी मिळते तर काही कामात स्त्री पुरुष यांच्या समान काम असले तरी मजुरीत 40 टक्क्या पर्यंत तफावत दिसून येते.

ग्रामीण भागात स्त्रियांची शेतीतील कामे निश्चित असतात, ती कामे स्त्रिया करतांना दिसून येतात.प्रस्तुत संशोधनात असे दिसून आले की, परंपरेने स्त्रीयासाठी शेतीत असलेली कामे त्या करतात, स्त्रियांची शेतीतील कामे पुरुष करतांना दिसत नाहीत पण परिस्थिती नुसार महिला शेतीतील पुरुषांची हि कामे करतांना दिसून येतात. स्त्रियांनी पुरुषांची कामे केली तर समाजात त्यावर प्रतिक्रिया नसते परंतु एखादा पुरुष जर स्त्रियांची कामे करू लागला तर त्यावर लिंगाधारित टोमणे मारण्यात येतात.

## संदर्भ -:


- Agnihotri (1983): Income and Employment pattern of rural women – A case study in the Una District of Himachal Pradesh, Unpublished M.Phil. thesis, Economic Department, H.P. University, Shimla.
- Chakravarty, s. Women Labour and Exploitation, Social Change, Vol.5, No.12,197
- Gupta, J. R. (1974), "An Inter-Regional study into the seasonality of Agricultural wage Rates with particular Emphasis on its Relationship with the Levels pf Employment Indian Journal of Agricultural Economics, Vol. 29, No.3, July-September, P 67.
- Kaur (1982): Emerging Status Role of Rural Women in the context of changing technology in Haryana: Un published Ph.D. Thesis, HAU, Hisar
- Singh S.N., Anil Kumar B., Singh S.R., (2005), "Labour Wages Discrimination in Agriculture: Gender Bias and Policy Implications", Agricultural Situation in India, Vol. LXI, No. 12, March pp. 869-874.


* * *

# कोवीड–१९ च्या काळात ऑनलाइन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांवर व पालकांवर झालेला परिणाम अभ्यास संदर्भ अंबाजोगाई

**डॉ. हनुमंत अंगदराव साळुंके**
सहाय्यक प्राध्यापक
मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड

**प्रस्तावना :**

बालपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा, असे आपण नेहमी ऐकत असतो किंवा म्हणतही असतो. हे असे म्हणण्याच्या मागचा उद्देश म्हणजेच बालपणीचा काळ सुखाचा असतो, आनंदाचा असतो, ना कशाची चिंता, ना कशाची काळजी, मनसोक्त खेळा, हसा, आनंद लुटा, पण हा काळ सध्याच्या मुलांना जगता येतो का? हा मोठा प्रश्न आहे. कारण सध्या पालक स्वतःच्या पाल्याला शिक्षण घेण्याच्या दृष्टीने स्वतःच्या स्वप्नांचा भडीमार पाल्यावर करत असताना दिसून येत आहेत. मुलांचे स्वप्न काय आहेत? मुले कोणत्या क्षेत्रात स्वतःची आवड दाखवतात? याबाबत पालक मुलांना विचारत नाहीत किंवा करिअर बाबत विचारकरताना दिसून येत नाहीत प्रत्येक व्यक्तीच्या अंगी काही ना काही उपजत गुण असतातच. पण त्या गुणांकडे दुर्लक्ष करून पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी प्रवेश उपलब्ध करून देतात.त्याच्या मागचा हेतू म्हणजे प्रत्येक आई–वडिलांना आपल्या मुलाने इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण घेतले पाहिजे अशी मानसिकता स्वतःचे बनवलेली आहे. आपण कितीही कष्ट करू पण आपल्या पेक्षा उज्वल भविष्य आपल्या लेकराचे झाले पाहिजे यासाठी इंग्रजीत शिक्षण घेतल्याशिवाय कोणताही पर्याय नाही असा विचार करून आपली मानसिकता इंग्रजी शाळांबाबत पालकांनी सकारात्मक बनवलेली आहे.सध्याच्या एकविसाव्या शतकात शिक्षण घेणे हा मानवाचा जीवनजगण्याचा आविभाज्य घटक समजला जातो त्याचप्रमाणे प्राचीन आणि मध्ययुगीन काळातही शिक्षणाला अनन्य साधारण महत्त्व दिले गेलेले होते असे आपल्याला दिसून येते.

विद्येविना मती गेली ! मतीविना नीती गेली !
नीतिविना गती गेली ! गतीविना वित्त गेले !
वित्ताविना शूद्र खचले ! एवढे अनर्थ एका अविद्येने केले !

वरील महात्मा फुले यांचे विचार म्हणजेच एक प्रकारचे क्रांतिकारक संदेश देत होते तसेच शिक्षणा शिवाय जीवनात कोणतीही परिवर्तनशील कृती करणे शक्य नाही असे स्पष्ट मत महात्मा ज्योतिराव फुले यांचे होते. आपण विद्या घेणे किंवा ज्ञान प्राप्त करणे म्हणजेच आपण ज्ञानी होणे असे ज्योतिराव फुले यांचे स्पष्टपणे मत होते. शिक्षण म्हणजे मानवाचा तिसरा डोळा आहे असे प्राचीन काळी समजले जात असे व सध्याची शिक्षण घेणे म्हणजे मानवाचे जीवन, सुखी,समृद्धी, आणि आनंददायी जगण्याचा मार्ग समजला जातो.

**संदर्भ साहीत्य :**

**पानसे रमेश (मुलांचे शिक्षण पालक,प्रशासन )**

मुलांचे शिक्षण आणि त्यामध्ये पालक आणि प्रशासन यांचा असणारा संबंध स्पष्ट केलेला आहे म्हणजेच मुलांच्या शिक्षणामध्ये पालक मोठ्याा प्रमाणात हस्तक्षेप करताना दिसून येत आहेत असे या

पुस्तकांमध्ये लेखकाने स्पष्टपणे नमूद केलेले आहे. शिक्षण घेताना मुलांनी कोणत्या कोर्सला जायच किंवा कोणता कोर्स घ्यायचा नाही याबाबत पालक मोठ्याा प्रमाणात निर्णय घेतात. मुलांनी एखादा निर्णय घेतला तर त्याबाबत पालक सकारात्मक असत नाहीत आणि त्यामध्ये भारतीय शिक्षण पद्धत आणि त्याचा मुलांच्या मानसिकतेवर होणारा परिणाम मोठ्याा प्रमाणात मुलांच्या बौद्धिक क्षमतेवर होताना दिसून येत आहे. पालक विद्यार्थी आणि प्रशासन या तिघांचा समन्वय मुलांच्या शिक्षणावर होताना तसेच मुलांनी कोणता कोर्स घ्यावा याबद्दल मोठ्याा प्रमाणात मुलांवर दबाव आणला जातो आणि पालकांनी मुलांसाठी सिलेक्ट केला आहे त्याच कोर्सला शक्यतो मुलांनी शिक्षण घ्यावे अशी अपेक्षा पालक करतात आणि म्हणूनच पालकांची आर्थिक परिस्थिती असो वा नसो आज प्रत्येक मुल सेमी इंग्लिश व इंग्लिश स्कूल मध्ये दिसून येत आहे. घरातील वातावरण हे मराठी असेल आणि मूल जर इंग्रजी माध्यम शाळांमधे शिक्षण घेत असेल तर त्याच्या मानसिकतेवर काय परिणाम होईल याचा मोठ्याा प्रमाणावर इथे लेखकाने आपले मत या पुस्तकामध्ये व्यक्त केलेले आहे.मुलांच्या शिक्षणामध्ये शासनही मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप करते म्हणजेच ज्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण घ्यायचे आहे त्यांच्यासाठी इंग्रजी माध्यम शाळा काढणे शासनाचे कर्तव्य आहे परंतु शासन इग्रजी माध्यमांच्या शाळांना मंजुरी न देता मराठी माध्यम शाळांवर भर देते म्हणूनच पालक आपल्या पाल्यांना प्रायव्हेट शाळेमध्ये शिक्षण देण्यासाठी प्रवेश मिळवून देण्यासाठी उत्सुक असताना आपल्याला दिसून येत आहेत.

**गोगटे श्री. ब. (मराठवाड्यातील शिक्षण)**

प्रस्तुत पुस्तकांमधील लेखकाने मराठवाड्यतील शिक्षण आणि त्याचे मराठवाड्यतील लोकांना होणारे फायदे तोटे या विषयी महत्त्वपूर्ण लेखन केलेले दिसून येते. मराठवाड्यामध्ये शिक्षण प्रणालीचा मोठ्या प्रमाणात वाढत चाललेला कल आणि त्यामध्ये पालकांची वाढत चाललेली मुलांच्या शिक्षणाबद्दलची काळजी याविषयी सविस्तरपणे मांडणी पुस्तकात करण्यात आलेली आहे. पालक आपल्या विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाबाबत जास्त अग्रेसिव दिसून येत आहेत. भारतीय शिक्षण प्रणाली ही मोठ्याा प्रमाणात जरी गुरु कडून विद्या विद्यार्थ्यांना ग्रहण करण्यासाठी दिली जात आहे. आज भारतामध्ये मोठ्याा प्रमाणात शाळांची निर्मिती झाली आणि त्यामध्ये मुला–मुलींना समान शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. याच धरतीवर केद्र व राज्य सरकारच्या वतीने महाराष्ट्रामधील मराठवाड्यात गावपातळीपर्यत शिक्षण पोहचण्यासाठी वेगवेगळया विद्यापिठाची निर्मीती करुन शिक्षणाची दारे खुली केली गेली.

**महासंचालक, युनेस्को ( २८मार्च २०२० )**

जागतिक व देशाच्या अर्थव्यवस्था लॉकडाउनमुळे मंदी, बेरोजगाराच्या चक्रात अडकल्यामुळे डळमळीत होत आहेत. ठप्प झालेल्या अर्थव्यवस्थेमुळे हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांचे तांडे, शहराकडून गावाकडे निघाले आहेत व उपासमारीचे मरायचे, की करोनामुळे या पेचात हा कष्टकरी वर्ग अडकला आहे. चीन–अमेरिका यांच्या आर्थिक सत्तासंघर्षाला जैविक युद्धाचे स्वरूप येत आहे का, या भीतीने जग ग्रासले आहे. जागतिक सत्ता केंद्र युरोप–अमेरिका खंडाकडून आशिया खंडाकडे सरकत आहेत. लॉकडाउनमुळे येणाऱ्या सक्तीच्या रिकामेपणामुळे व एकटेपणामुळे कौटुंबिक–सामाजिक–मानसिक आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत.

करोनाला रोखण्यासाठी अनेक देशांनी शिक्षणसंस्थासुद्धा बंद केल्या आहेत. युनोस्कोच्या अहवालानुसार एप्रिल २०२० मध्ये १८८ देशांत १५४ कोटी विद्यार्थी घरी बसले आहेत. भारतात १५ लाख शाळा बंद आहेत. त्यामुळे २६ कोटी विद्यार्थी व ८८ लाख शिक्षक घरी बसले आहेत, तर

उच्च शिक्षणात ५० हजार शिक्षणसंस्था बंद आहेत व ३.७० कोटी विद्यार्थी आणि १५ लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसले आहेत. ३० कोटी विद्यार्थ्यांनी रिकामेपणे घरी बसणे हा एक टाइमबॉम्ब आहे. सध्या करोनाची समस्या ही केवळ आरोग्याची समस्या आहे, असे मानले जात आहे. पण या संकटाला शैक्षणिक समस्यांची बाजू आहे, हे सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे.

**कारोना विषाणु आणि ऑनलाइन शिक्षण**

लॉकडाउनच्या काळात विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान भरून काढणे म्हणजे परीक्षा पुढे ढकलणे नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासात खंड पडणार नाही, याची काळजी घेणे होय. कष्टकरी जनतेची मुले डोळयांसमोर ठेवून शाळा बंदच्या काळात या समाजघटकातील मुलांचे शिक्षण कसे अखंडपणे चालू राहील याची योजना केंद्र व राज्य सरकारनी तातडीने करावी.करोना विषाणूची साथ हे दुसऱ्या महायुद्धानंतरचे जगासमोरचे मोठे संकट आहे. मानवी जीवनाच्या सर्वच बाजूंवर या संकटाने प्रभाव टाकला आहे. या रोगाला अजून प्रतिजैविके न सापडल्यामुळे रोग होऊ नये, म्हणून प्रतिबंधक उपाय योजणे एवढाच आता सर्वांसमोर पर्याय आहे. म्हणून लॉकडाउनचे धोरण अवलंबून हा रोग आटोक्यात आणण्याचा सर्व देशांत प्रयत्न चालू आहे. या परिस्थितीतून निर्माण झालेल्या अनिश्चिततेमुळे जगभर भीतीचे वातावरण पसरले आहे.

सध्या कोरोनाच्या जागतिक संकटामुळे शाळा बंद आहेत. शाळा सुरु करण्याजोगी परिस्थिती कधी निर्माण होईल, हे आज सांगता येणे कठीण आहे. शाळा सुरु झाल्याच तरी, सामाजिक अंतराचे नियम काय असतील आणि ते पाळून शाळा पूर्ववत चालवता येतील का, हेही सांगता येणे कठीण आहे. सरकारने शाळा 'ऑनलाईन' सुरु करायला परवानगी दिली आहे. अनेक शाळांनी कोणत्या ना कोणत्या पद्धतीचे, ऑनलाईन उपक्रम सुरु देखील केले आहेत. पण, या साऱ्याची पुढील दिशा काय असेल? याचा विचार गांभीर्याने करायला हवा.

आपल्याकडे मोबाईल, लॅपटॉप अशी उपकरणे वापरून, आपण अनेक गोष्टी करतो. पण या माध्यमांचा वापर करून शाळा किंवा कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक उपक्रम चालवणे, हे आपल्यासाठी पूर्णपणे नवीन आहे. कोरोनामुळे लादल्या गेलेल्या सक्तीच्या सुटीमुळे हे ऑनलाइन माध्यम एकाएकीच आपल्या गळयात पडले. पण या ऑनलाईन शिक्षणाची आजची परिस्थिती काय आहे? त्यासाठी कोणते पर्याय उपलब्ध आहेत? ते आज कोणत्या प्रकारे वापरले जात आहेत? या सगळ्याचे भविष्य काय असेल? या प्रश्नांचा उहापोह करताना, सर्वात महत्त्वाचे म्हणजे यातून आपल्याला नक्की काय साध्य करायचे आहे? ते समजून घ्यायला हवे.

ऑनलाईन शिक्षणाच्या प्रणालीची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी झाली तर, त्याचा अनेक स्तरांवर फायदा होऊ शकतो. ज्ञानदानासाठी किंवा क्षमताविकसनासाठी, एका शारिरिक वयाच्या ५०—१०० मुलांना एका छताखाली रोज जमवून, त्यांना एकाच पद्धतीचे शिक्षण देणे ही औद्योगिक काळाची (Industrial Age) ची गरज होती. केवळ त्याच पद्धतीने शिक्षण देणे तेव्हा शक्य होते. पण अगदी कोरोना येण्यापूर्वीपर्यंत या परिस्थितीत काहीसा फरक पडला नव्हता. कोरोनाच्या या झटक्याने आपण अचानक नव्या पद्धतीत आलो आहोत. भविष्यात या नव्या ऑनलाईन शिक्षण पद्धतीत प्रत्येकासाठी व्यक्तिगत शिक्षणाचे नियोजन (लर्निंग प्लॅन), शिक्षणाचा मार्ग (लर्निंग पाथ) असू शकतात. वयानुसार आणि व्यक्तिगत क्षमतेनुसार त्या नियोजनामध्ये लवचिकता येऊ शकते. म्हणजे दहा वर्षांचे एक मूल त्याच्या नैसर्गिक क्षमतेनुसार, चौथीचे तर दुसरे मूल त्याच्या क्षमतेनुसार सातवी—आठवीचे गणित शिकू शकते. हे आज घडत नाही, पण उद्या कदाचित असे घडू शकेल. प्रत्येकजण आपापल्या क्षमतेनुसार आणि आवडीनिवडीनुसार आपल्या शिक्षणाचा मार्ग निवडू शकेल.

शाळा चालवण्यासाठी शाळेच्या इमारती, मैदाने यांचे इन्फ्रास्ट्रक्चर लागते. शहरांपासून ते खेड्यांपर्यंत प्रत्येक मुलाच्या घराजवळ शाळा हवी असेल तर त्यासाठी लागू शकणाऱ्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी महाकाय गुंतवणूक करावी लागते. शाळा घराजवळ नसेल तर, मुलांच्या वाहतुकीची व्यवस्था आणि त्यासंबंधी इन्फ्रास्ट्रक्चर लागते. वाहतुकीमध्ये मुलांचा जाणारा वेळ आणि त्या दरम्यानच्या त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ही देखील एक मोठी समस्या असते. अत्यंत प्रभावीपणे चालवल्या गेलेल्या ऑनलाईन शिक्षणामुळे या समस्यांचे निराकरण होऊ शकते. शाळांच्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणुक न करता, शिक्षण सर्वदूर पोहोचवता येऊ शकते.

**ऑनलाईन शिक्षणाचे फायदे**

सध्या जगामध्ये कोरोना महामारी थैमान घालत आहे त्यामध्ये सरकारचे लॉकडाउन केल्यामुळे सर्व कामकाज ठप्प झाले असून काही आवश्यकता अशा सेवा पुरवल्या जात आहेत पण त्यामुळे मुलांच्या शिक्षणाचा एक नवीन प्रश्न उभा राहिला आहे. त्यामध्ये काही परीक्षा या रद्द केल्या व काही या ऑनलाइन घेण्यात आल्या कारण कोरोना महामारी मध्ये सामाजिक अंतर ठेवणे हे सुरक्षितेचे मानले जाते. ऑनलाइन शिक्षणामुळे तसे भरपूर फायदे होत आहे जसे की मुलांना सकाळी उठून तयार करणे, त्यांच्यासाठी टिफिन बनवणे आणि शाळेत वेळेवर सोडणे ही कामे बंद असून त्यामुळे पालकांना मुलांना अभ्यास घेण्यासाठी भरपूर वेळ मिळत आहे. तसेच विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणामुळे कम्प्युटर, लॅपटॉप, पॅड, टॅबलेट, स्मार्टफोन, इंटरनेट आणि झूम, गुगल मीटिंग इत्यादी हाताळण्याचे ज्ञान आले असून त्यांचा वापर ते आपल्या वैयक्तिक जीवनात देखील करू लागले. पण ऑनलाइन शिक्षणामुळे जसे फायदे होत आहे तसेच तोटे देखील समोर येत आहेत. कारण पालक व मुले अगोदर काही तास सोबत असत पण ऑनलाइन शिक्षणामुळे ते २४ तास सोबत आहेत. त्यामुळे काही वेळेस थोडाफार वाद देखील निर्माण होत आहे आणि मुलांमध्ये देखील आळस निर्माण होत आहे तसेच ऑनलाईन शिक्षणामुळे इंटरनेटचा गैरवापर देखील मुले करत आहेत. जसे की ऑनलाइन गेम खेळणे, ऑनलाईन व्हिडिओ पाहणे इत्यादी त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर देखील दुष्परिणाम पडतो आहे. कारण स्क्रीन समोर बसल्यामुळे डोळ्यांवर ताण येतो तसेच मान दुखी, पाठ दुखी, सतत मोबाईल वापर करणे, चिडचिड पणामध्ये वाढ, लहाण मलांना विविध संदर्भातील आरोग्य समस्या निर्माण झाल्या आहेत. या डिजिटल शिक्षणामुळे मुले अजून एकलकोंडी होत आहेत कारण ती एकटीच घरून शिक्षण घेत आहे जर हे शिक्षण एका वर्गात असते तर मुलांमध्ये एकोप्याची भावना निर्माण होते. एकत्र शिकल्यामुळे मिळून मिसळून राहण्याची वृत्ती तयार होते, त्यांच्यात मैत्री निर्माण होते तसेच त्यांना एकमेकांना मदत करण्याची भावना निर्माण होते. पण ऑनलाइन शिक्षणामुळे या सर्व गोष्टी घडत आहेत आणि सर्वात मोठी अडचण म्हणजे इंटरनेटची उपलब्धता कारण सर्वच भागात इंटरनेट सुविधा उपलब्ध असेल असे देखील नाही. कारण आपल्या शाळेमध्ये सर्व स्तरातील मुले असतात मजुरांची देखील मुले असतात त्यामुळे त्यांना हे ऑनलाईन शिक्षण घेणे शक्य होईलच असे नाही.

**ऑनलाईन शिक्षणाच्या मर्यादा**

शाळांमध्ये मुले पारंपारिक शिक्षणासोबत सामाजिक वर्तन (Social Skill) सुद्धा शिकत असतात. कोणत्याही व्यक्तीच्या जडणघडणीमध्ये तो जिथे शिकतो तिथल्या वातावरणाचा, संगतीचा आणि सोशल स्किल्सचा अत्यंत महत्वाचा वाटा असतो. पूर्णपणे ऑनलाईन असलेल्या शिक्षण पद्धतीमध्ये मुलांनी आपल्या समवयीन मुलांमध्ये गटाने एकत्र रहाणे, एकमेकांशी मैत्री करणे, मैदानात एकत्र खेळणे, दंगामस्ती करणे इत्यादी गोष्टी घडत नाहीत. या सगळयातून आपोआप शिकले जाणारे

सामाजिक वर्तनाचे नियम, सामाजिक शिस्त आणि संबंधित सोशल स्किल्स ही ऑनलाईन शिक्षणातून देता येत नाहीत. ऑनलाईन शिक्षणाची ही सगळयांत मोठी मर्यादा आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशेधन हे वर्णनात्मक संशोधन असुन ऑनलाईन शिक्षणाची प्रक्रिया राबविल्यानंतर शहरामध्ये ऑनलाईन शिक्षणामुळे निर्माण झालेल्या समस्या त्याचे परीणाम संबधीत शिक्षण घेणारया विद्यार्थी व पालकांवर झाला का नाही तसेच ऑनलाईन शिक्षण घेतांना आलेल्या अडीअडचणी यांचे अध्ययण करण्यासाठी प्राथमिक व व्दितीय स्त्रोताचा वापर करण्यात आला. प्राथमिक स्त्रोतामध्ये गटचर्चा, मुलाखत अनुसुची याचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले तर व्दितीय स्त्रोतामध्ये लेख, प्रकाशने,पुस्तकांचा वापर करण्यात आला.

**संशोधनाचे उद्देश :**

- ऑनलाइन शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांना येणारया समस्यांचे अध्ययन करणे.
- ऑनलाइन शिक्षण प्रणालीमुळे पालकांवर कौटुंबिक, आर्थिक, मानसिक, सामाजिक संबंधाचे अध्ययण करणे.

**नमुना निवड**

प्रस्तुत संशोधन अंबाजोगाई शहरातील कोवीड १९ च्या काळात ऑनलाइन शिक्षण घेणाऱ्या २० शाळापैकी संशोधनासाठी ०५ वेगवेगळया शाळांची निवड करून त्यामध्ये सोयीस्कर नमुना निवडीच्या माध्यमातुन ४० एककाची निवड करण्यात आली आहे. विषयासाठी समग्र हा निश्चित करून २० पालकांच्या २० विद्यार्थ्याच्या माध्यमातुन तथ्य विष्लेषण करण्यात आले आहे.

सारणी : ०१

ऑनलाईन शिक्षणासंदर्भातील समस्या

| अ. क्र | विवरण | वारंवारीता | टक्के |
|---|---|---|---|
| १ | नेटवर्क नाही | १२ | ३० |
| २ | वीजेची उपलब्धता | ६ | १५ |
| ३ | शैक्षणीक साधनांचा अभाव | १६ | ४० |
| ४ | वरिलपैकी नाही | ६ | १५ |
| | एकुण | ४० | १०० |

स्त्रोत : प्राथमीक

विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना नेटवर्क अडचणींना सामोरे जावे लागले आहे कारण विविध कंपन्याचे मोबाईल आणी त्यांच्या सेवा तसेच त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न अनेक प्रकारचे असल्यामुळे ३० टक्के विद्यार्थ्यांना नेटवर्क मिळत नसल्याचे आढळुन आले. शहरामध्ये राहणारया १५ टक्के विद्यार्थ्यांना वीजेचे प्रश्न व चार्जीगच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत. तसेच ४० टक्के विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षणाचे शैक्षणीक साधन उपलब्ध झाले नाही. या मध्ये मोबाईलची उपलब्धता, आर्थिक समस्या, शैक्षणीक सुविधा अभाव व ईतर समस्या प्रमुख्याने निदर्शनात आढळुन आल्या आणि १५ टक्के मुलांना ऑनलाईन शिक्षण पध्दतीविषयीची विषयी माहिती नाही असे दिसून आले. ऑनलाइन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागले आहेत वरील सारणी नुसार दिसून आले आहे.

सारणी : ०२

ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यावर झालेले परिणाम

| अ. क्र | विवरण | वारंवारीता | टक्के |
|---|---|---|---|
| १ | मोबाईलचा जास्त वापर | १३ | ३२.५ |
| २ | डोळे | ० | ० |
| ३ | कान | ० | ० |
| ४ | वरीलपैकी सर्व | २७ | ६७.५ |
| | एकुण | ४० | १०० |

स्त्रोत : प्राथमीक

प्रस्तुत संशोधनात उत्तरदातांवर ६७.५ टक्के त्यांच्यावर परिणाम सर्वात जास्त दिसून आलेले आहेत कारण ऑनलाईन शिक्षण घेत असताना उत्तरदात्यांना सकाळी अकराला बसल्यानंतर सलग दोन ते तीन वाजेपर्यंत क्लास करावे लागत असतात. त्यामुळे मुलांच्या शारीरीक, मानसिक आजार तसेच मुलांच्या बौध्दीक क्षमतेवर मोठया प्रमाणात परिणाम झालेले आहेत. सतत मोबाईलचा स्क्रीन कडे पाहत राहणे व आवाज व्यवस्थित येत नसल्यामुळे कानाला हेडफोन लावणे आवश्यक असते आणि त्यामुळे मोबाईलची जवळीकता वाढलेली आहे. यामुळे उत्तर दात्यांना वर सर्वच परिणाम दिसून आलेले आहेत. तसेच काही सतत ऑनलाईन राहत असल्यामुळे उत्तरदाते यांवर ३२.५ टक्के मोबाईलचा जास्त वापर करताना दिसलेले आहेत.

सारणी : ०३

ऑनलाईन शिक्षणाचा पालकांवर झालेला परीणाम

| अ. क्र | विवरण | वारंवारीता | टक्के |
|---|---|---|---|
| १ | आर्थिक | १५ | ३७.५ |
| २ | समाजीक | २ | ५ |
| ३ | मानसीक | १२ | ३० |
| ४ | ईतर | ११ | २७.५ |
| | एकुण | ४० | १०० |

स्त्रोत : प्राथमीक

वरील सारणीवरून अंबाजोगाई शहरातील कुटुंबातील पालकांना ऑनलाईन शिक्षण व्यवस्थेमुळे मोठया प्रमाणात आर्थिक समस्या निर्माण झाली. एकाच कुटूंबांत एक पेक्षा जास्त मुले शिक्षण घेत असल्यामुळे शैक्षणीक सुविधासाठी पालकांवर अतिरीक्त आर्थीक बोजा पडला. यामुळे मासीक तसेच वार्षीक कौटुबीक अर्थव्यवस्थेवर ३७.५ टक्के परीणाम झाला तसेच शिक्षण घेणारे विद्यार्थी व त्यांचे पालक यांना मानसिक समस्या ३० टक्के आढळुन आल्या कारण शिक्षणाचा परिणाम मुलांसोबत पालकांवर पण दिसून आलेला आहे. जे शिक्षकांचे कामे असतात ते आता

पालकांना करण्यास सांगत आहेत विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेणे त्यांच्या कडून शैक्षणीक उपक्रमे करून घेणे. आर्थिक समस्या तसेच कौटुबीक समस्याचे समाधान न होणे.

समाजामध्ये वावरत असताना पाल्याना ऑनलाईन शिक्षण घेतांना समाजातील वेगवेगळया समस्यांना समोरे जावे लागत असते. निर्माण झालेल्या समस्याचे समाधान न झाल्यामुळे त्याचा पाल्य तसेच पालकांवर व कुटुंबातील व्यक्तींवर २७.५ टक्के परिणाम झालेला आहे. तसेच अंबाजोगाई शहरातील पालकांना व विद्यार्थ्याना ११ टक्के वेगवेगळया समस्या निर्माण होउन त्याचा परीणाम त्यांच्यावर झालेला दिसुन आला.

वरील सर्व सारणीवरुन असे निदर्शनात आले की, ऑनलाईन शिक्षणामुळे पालक, विद्यार्थी यांना सामाजीक, आर्थिक व मानसीक तसेच सेवा सुविधांचा अभाव आणि समाजातील ईतर वेगवेगळया प्रकारच्या विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत.

**निष्कर्ष :**

- ऑनलाइन शिक्षणामुळे पाल्यांच्या आर्थिक व सामाजिक व मानसिक स्थितीवर परिणाम दिसून आला आहे तर त्यामध्ये ३७.५ टक्के लोकांवर आर्थिक परिणाम झालेला आहे आणि ३० टक्के पालकांवर मानसिक परिणाम झालेला आहे.
- ऑनलाईन शिक्षणामुळे ६७.५ टक्के मुलांच्या शाररीक, मानसिक आजार तसेच मुलांच्या बौध्दीक क्षमतेवर मोठया प्रमाणात परिणाम झालेले आहेत. तसेच मुलांना ऑनलाईन शिक्षणामुळे सतत मोबाईलचा वापर करावा लागतो यामुळे ३२.५ टक्के मुलांना डोळे, कान तसेच मोबाईल दुष्परीनामांना सामोरे जावे लागत आहे
- पालक, विद्यार्थी यांना सामाजीक, आर्थिक व मानसीक तसेच सेवा सुविधांचा अभाव आणि समाजातील ईतर वेगवेगळया प्रकारच्या विविध समस्या निर्माण झालेल्या आहेत. ऑनलाईन शिक्षणामुळे कौटुबीक अर्थव्यवस्थेवर ३७.५ टक्के परीणाम झाला, मानसिक समस्यामुळे ३० टक्के परीणाम आढळुन आले तर २७.५ टक्के पाल्यांना सामाजीक परिणाम झालेला आहे.
- ऑनलाईन शिक्षणाचा फायदा शहरातील विद्यार्थ्यांना झालेला आहे तसेच ६० टक्के मुलांना ऑनलाईन शिक्षणामुळे शिक्षणाची आवड निर्माण झालेली आहे.

**संदर्भसूची :**

१. ऑनलाइन शिक्षण अणि आपण, साधना साप्ताहिक, जुन २०२०
२. दत्तात्रय ग पास्टे, मुलाचे शिक्षण पालक व शासन, डायमंड पब्लिकेशन, पुणे
३. रमेश पानसे, शिक्षण परिवर्तनाची सामाजिक चळवळ,डायमंड पब्लिकेशन पुणे
४. हेरंब कुलकर्णी, आमच्या शिक्षणाचे काय, मनोविकास प्रकाषन,पुणे
५. https://www-saamana- com/article&on&online&education&3/
6- https://www-bhashanmarathi-com/2021/02/online&education&essay&in&marathi-html\m¾1

* * *

# ऊसतोड महिला कामगारांची अभिवृत्तीचा अभ्यास संदर्भ ता. धारूर जि. बीड

***महादेव चैतराम चुंचे***
(सहाय्यक प्राध्यापक)
कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा
ईमेल- prof.chunche@gmail.com

**मानव विकास निर्देशांकामध्ये** जगातील १८९ देशांच्या क्रमवारीत भारत १२९ व्या स्थानावर आहे. म्हणजेच भारताची एका स्थानाची सुधारणा झाली आहे. मात्र भारतातील अनेक भागामध्ये समुह आधारित विषमता कायम असुन, महिला आणि मुलींना योग्य स्थान दिले जात नाही. तसेच २००५-०६ ते २०१५-१६ या दशकामध्ये भारतातील २७ कोटी १० लाख लोक दारिद्रयरेषेच्या वर आले तसेच दरडोई उत्पन्न २५० हुन अधिक टक्क्यांनी वाढले आहे. **वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने** आरोग्य, शिक्षण, आर्थिक व राजकीय अशा चार क्षेत्रांत स्त्री-पुरुषातील लिंगभाव आधारित असमानेची गणना केली. आरोग्य, जीवनमान आणि आर्थिक संधी यामध्ये भारत ११२ स्थानावर असल्याचे आढळते. तसेच आर्थिक भागीदारीच्या दृष्टीने, गेल्या काही वर्षात भारतीय महिलांची कागिरी असमाधानकारक आहे. महिलांच्या क्रयशक्तीमध्ये २०१७-१८ मध्ये २३.३ टक्के आणि २०१८-१९ मध्ये २६.९ टक्के मोठी घसरण झाली आहे. तर जागतिक सरासरीच्या तुलनेत जागतिक बँक २०१८ मध्ये ४८.४७ टक्के कमी आहे. वेगवेगळया कारणांमुळे महिलांना पुरुषांच्या तुलनेत आर्थिक संधी मिळत नाही. ते प्रमाण अतिशय कमी आहे. २०१६ च्या 'वर्ल्ड **इकॉनॉमिक फोरम'** च्या स्त्री-पुरुष समानता निर्देशांकान्वये १४४ देशांमध्ये भारतांचा ८७ वा क्रमांक लागतो. भारतातील महिला व मुली सामाजिक व आर्थिक असुरक्षित आहेत. तसेच असंघटित क्षेत्रामध्ये महिलांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे समस्यांना वाचा फोडण्यास्तव **'लिंगाधारित अर्थसंकल्प'** समर्पक ठरतो.

भारतात २००१ साला पासून 'लिंगाधारित अर्थसंकल्पाची औपचारीक सुरुवात झाली. तर २००४ मध्ये 'लिंगाधारित अर्थसंकल्प' वर शिक्कामोर्तब झाले. यानुसार बिभाग 'अ' मध्ये १०० टक्के योजना हया महिलांकरीता असतील तर विभाग 'ब' मध्ये किमान ३० योजना महिला प्रणीत राहतील अशी तरतूद केली. तसेच २०१३ पासून राज्यस्तरावर विचार करणे बंधनकारक केले गेले. भारतात महिला विषयक योजना व प्रकल्पांवर लिंगाधारित खर्च १८ टक्क्यांवर गेला आहे. २०१६-१७ मध्ये ९६ हजार ३३१ कोटी वरुन हा खर्च रुपये एक लाख १३ हजार ३२६ कोटीवर गेला आहे. यामध्ये महिलाविषयक योजना, कामगार महिलांच्या मजुरी संदर्भातील धोरणे तसेच अनु. जाती/ अनु. जमातींच्या महिलांसाठी विशेष तरतुदींचा समावेश केला आहे. महिलांना आजही त्यांच्या हक्क व अधिकार यांची पुरेशी जाणीव नसल्याने ते मिळविणे दुरापास्त होते. त्यामुळे महिलांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जात आहे. मात्र महिला सक्षमीकरण ही दुसऱ्याने करावयाची गोस्ट नसून, ती स्त्रीची अंत:प्रेरणा असायला हवी, हेही लक्षात घ्यायला हवे. परंतू महिला सक्षमीकरणामध्ये 'लिंगाधारित अर्थसंकल्प' मैलाचा दगड ठरतो.

**संशोधनाचे उद्देश :**

१. ऊसतोड महिला कामगारांची जीवनविषयक बोधात्मक, भावनात्मक व क्रियात्मक दृष्टीकोन/अभिवृत्ती अभ्यासणे.
२. ऊसतोड महिला कामगारांचे जीवन व व्यावसायिक समाजकार्याशी संबंधीत प्रमाणित सिध्दांत यातील सहसंबंधाचे परिक्षण करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत संशोधनामध्ये तथ्य संकलनाच्या अनुषंगाने, प्राथमिक तथ्य संकलन साधनातील मुलाखत अनुसूची व द्वितीय तथ्य संकलन स्त्रोतातील ग्रंथ, मासिक , प्रकाशित अहवाल व संकेतस्थळांचा वापर केला आहे.

**ऊसतोड कामगार :**

**संजय दकाले :** यांच्या मते, "एक हंगामी कामगार म्हणजे अशी व्यक्ती जी वर्षाच्या प्रत्यक्ष कामकाजाच्या एकूण वेळेच्या अर्धापेक्षा काळी मौसमी कामगार असते".

**अभिवृत्ती :**

**सेकर्ड व बॅकमन (१९६४) :** यांच्या मते, "वातावरणाच्या काही बाबींप्रती व्यक्तीच्या भावभावना, विचार व क्रिया करण्याची पूवप्रवृत्ती म्हणजे अभिवृत्ती होय."

**अभिवृत्तीचे स्वरुप :** दृष्टिकोनाचे व्यापक, विस्तृत व मानसशास्त्रीय रुप म्हणजे अभिवृत्ती होय. व्यक्तीची अभिवृत्ती व्यक्तीचे विचार, भावना व वर्तन यावर निर्धारीत केली जाते. परंतू यामध्ये सुसंगतपाण असेलचं असे नाही. व्यक्तीच्या जीवनामध्ये अनंत प्रसंग घडतात. त्यानूसार व्यक्तीचा अनुभवाचा परिघ वाढत असतो. अभिवृत्ती ही व्यक्ती, व्यक्तीसमुह, विषय, वस्तू, प्रसंग, घटना, विचार आदींशी संबंधित असते. म्हणजेच अभिवृत्तीसाठी कोणत्या ना कोणत्या विषयाची आवश्यकता असते. विशयाअभावी अभिवृत्ती निर्माण होऊ शकत नाही, हे एका अभिवृत्तीचे वैशिष्टय आहे. फुल, पदनाम, खेळ म्हणजेच निसर्गातील कोणतीही सजीव किंवा निर्जिव वस्तू व्यक्तीच्या अभिवृत्तीचा मुलाधार असते. जसे की अभिवृत्ती होण्याकरीता कोणत्याना कोणत्या विषयाची आवश्यकता असते किंबहूना विषय ही अभिवृत्तीची मुलभूत तथा प्राथमिक गरज असते. त्या शिवाय अभिवृत्ती निर्माण होणे शक्यत होत नाही. अभिवृत्ती ही अमुर्त व परिकल्पात्मक अवस्था असते. ती मुर्तपणे आपणास दाखवता येत नाही. महिलांविषयी समाजामध्ये मध्ये असलेली मानसिकता होय.आनंद मिळवणं ही वैयक्तीक शोधाचा भाग आहे असे प्राचीन ग्रीसमधल्या **इपिक्यूरिस** या तत्ववेत्याने म्हटले आहे. व्यक्तीचे जीवन हे व्यक्तीच्या बोधात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक अभिवृत्तीवर निर्भर असते. ब्रिटिश तत्वज्ञ **जेरमी बेथॅम** यांच्या मते, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जास्तीत जास्त व्यक्तीच अधिकतम सुख आहे. जीवन जगणे आणि त्याचा पुरेपर अनंदमय उपभोग घेणे हे ज्या व्यक्तीला जमते त्या व्यक्तीला जीवन जगण्याची कला अवगत होते. **जॉन स्टयुअर्ट मिलनं** यांच्या मताप्रमाणे, सुख म्हणजे केवळ आनंददायक भावना आणि दु:खापासून सुटका आहे. तर **गौतम बुध्दांनी** सुखाचा शोध घेणं हे दु:खाचं मुळ आहे असे सांगितले आहे. अर्थात व्यक्तीच्या दृष्टीकोनात सुख, समाधान, आनंद, प्रगती, यश-अपशय, राग, लोभ, प्रेम, करुणा तसेच सामाजिक मुल्यांचा अंश दडलेला असल्याची साशंकता निर्माण होते.

मानसशास्त्रज्ञ **कार्ल युंग** यांच्या मते सकारात्मक व नकारात्मक विचार संसर्कजन्य आहेत. या विचारांचा आपल्यावर व आपल्या सहवासत येणाऱ्या घटकांवर परिणाम होतो. सकारात्मक मानसाभोवती विशिष्ट वलय निर्माण होत असल्याने इतर लोक त्याकडे आर्षित होतात. असे माणसं प्रसन्न, आनंदी असतात. म्हणजेच आपण स्वत: स्वत:शी काय बोलतो यावर भविष्य अवलंबून असते त्यालाच आपण **सेल्फ टॉक** असे म्हणतात. तसेच डॉ. **जॉईस ब्रदर्स** यांच्या मते, यश ही मानसिक स्थिती असून, जर यश पाहीजे असेल तर ते मिळाले आहे असा विचार करणे. कारण सकारात्मक विचारसारणी उज्जवल भवितव्याचा दाखला असतो.

व्यक्ती सभोलताच्या परिस्थितीमुळे आनंदी नसतो, तर स्वत:ची विशिष्ट मनोवृत्ती, विचारांमुळे आनंदी असतो. त्यामुळे मन सकारात्मक व निर्मल ठेवण्यासाठी ध्यान करणे आवश्यक आहे. अर्थात, ऊसतोड महिला कामगारांच्या जीवनातील सुख, समाधान किंबहूना जीवन विषयक दृष्टीकोनाचा शोध घेतांना त्यांचे वर्तनाचे आणि विवेकी विचाराचे परिक्षण केल्यास जेस विचार तसेच वर्तन आणि भावना आढळतात. म्हणजेच त्यांच्या बोधात्मक विचारामध्ये आणि क्रियात्मक वर्तनामध्ये सुसंगती आढळून येत असल्याने त्यांची जीवन विषयक अभिवृत्ती जीवनामध्ये येणाऱ्या प्रत्येक संकटाना व असमतोल वातावरणास सक्षमपणे सकारत्मक, समतोल परिस्थितीमध्ये बदलण्याची दृष्टी बाळगते.

आनंद मिळवणं ही वैयक्तीक शोधाचा भाग आहे असे प्राचीन ग्रीसमधल्या **इपिक्यूरिस** या तत्ववेत्याने म्हटले आहे. व्यक्तीचे जीवन हे व्यक्तीच्या बोधात्मक, भावनात्मक आणि क्रियात्मक अभिवृत्तीवर निर्भर असते. ब्रिटिश तत्वज्ञ **जेरमी बेथॅम** यांच्या मते, सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे जास्तीत जास्त व्यक्तीच अधिकतम सुख आहे. जीवन जगणे आणि त्याचा पुरेपर अनंदमय उपभोग घेणे हे ज्या व्यक्तीला जमते त्या व्यक्तीला जीवन जगण्याची कला अवगत होते. **जॉन स्टयुअर्ट मिलनं** यांच्या मताप्रमाणे, सुख म्हणजे केवळ आनंददायक भावना आणि दु:खापासून सुटका आहे. तर **गौतम बुध्दांनी** सुखाचा शोध घेणं हे दु:खाचं मुळ आहे असे सांगितले आहे. अर्थात व्यक्तीच्या दृष्टीकोनात सुख, समाधान, आनंद, प्रगती, यश-अपशय, राग, लोभ, प्रेम, करुणा तसेच सामाजिक मुल्यांचा अंश दडलेला असल्याची साशंकता निर्माण होते.

मानसशास्त्रज्ञ **कार्ल युंग** यांच्या मते सकारात्मक व नकारात्मक विचार संसर्कजन्य आहेत. या विचारांचा आपल्यावर व आपल्या सहवासत येणाऱ्या घटकांवर परिणाम होतो. सकारात्मक मानसाभोवती विशिष्ट वलय निर्माण होत असल्याने इतर लोक त्याकडे आर्षित होतात. असे माणसं प्रसन्न, आनंदी असतात. म्हणजेच आपण स्वत: स्वत:शी काय बोलतो यावर भविष्य अवलंबून असते त्यालाच आपण **सेल्फ टॉक** असे म्हणतात. तसेच डॉ. **जॉईस ब्रदर्स** यांच्या मते, यश ही मानसिक स्थिती असून, जर यश पाहीजे असेल तर ते मिळाले आहे असा विचार करणे. कारण सकारात्मक विचारसारणी उज्जवल भवितव्याचा दाखला असतो.

**निष्कर्ष :**

१. ऊसतोड महिला कामगारांना, पैसे/आर्थिक बचत, मुलं-मुलीचे शिक्षण व इच्छापूर्ती, वस्तू खरेदी, जोडीदाराचे प्रेम, सोन-चांदी खरेदी, माहेरी जाणे, नातेवाईकांना भेटी देणे, मध्यस्थी करणे, लोकांना सहकार्य करणे, अन्नदान करणे, गीत गायन/ऐकणे, साडी/कपडे खरेदी, दानधर्म/देवधर्म, व नक्षीकाम इत्यादी कृती करण्यास आनंद मिळतो.

२. ऊसतोड महिला कामगार जीवनामध्ये स्थैर्य/स्थिरता अणण्यासाठी आर्थिक बचत, भविष्यासाठी तरतूद, स्वंयरोजगार, मुलांना चांगले शिक्षण व लग्न, जोडीदाराचे प्रेम, सुखी संसार, घरगुती वस्तू खरेदी, पाहुणचार, माहेरचे संबंध चांगले, घर बांधणे, पतीस व्यसनापासून दुर ठेवणे, व्यवहारामध्ये काटकसर, फसवणूकीपासून सावध, इतरासोबत आपलेपणाची भावना इ. बोधात्मक विचार बाळगूण उज्वल भविष्यासाठी अशावादी राहण्याची वृत्ती ऊसतोड महिला कामगारामध्ये आढळून येते.

३. ऊसतोड महिला कामगारांचा पैसे कमविण्याच्या दृष्टीकोनामध्ये जगण्यासाठी, भविष्यासाठी बचत, कर्जाची परतफेड, मुला-मुलीचे लग्न, मुलामुलींचे शिक्षण, सोन/चांदी खरेदी, घरगुती वस्तू खरेदी, घर/प्लॉट/ जमीन खरेदी, मुलांचा संसार, दारिद्रयातून मुक्त व सुखी-समाधानी जागण्यासाठी इत्यादी उद्देशांचा समावेश होतो.

४. ऊसतोड महिला कामगारांच्या घरातील वस्तू विषयी आपुलकी बाळगण्याच्या दृष्टीकोनामध्ये लोकांचे पाहून सवय, संसारात मर्यादित वस्तू, लोक वस्तू हडप करतात, वस्तू मध्ये जीव गुंतलेला, वस्तूमध्ये आठवण दडलेली , वस्तूचे जतन व वस्तू गेल्यास ती लवकर मिळत नाही इत्यादी कारणांचा प्रामूख्याने समावेश होतो.

५. ऊसतोड महिला कामगारांच्या स्वत:च्या जीवनविषयीच्या क्रियात्मक परिकल्पनेत गुलामगिरेचे, वेठबिगारीचे, अन्यायग्रस्त/तणावग्रस्त, संघर्षमय, गरिबी/दारिद्रय, परावलंबी व एकलकोंडी दृष्टीकोनाचा समोवश होतो तर बोधात्मक दृष्टीकोनामध्ये अनंदी, स्वावलंबी, अर्थपूर्ण व स्वच्छंदी इत्यादीचा समावेश होत असल्याचे दिसून येते.

६. ऊसतोड महिलांचे वास्तव्य हे बालाघाट डोंगर रांगेत असून, कमी पर्जन्यमान, आपुरी शेती, मुलांचे शिक्षण व कुटूंबाच्या गरजा, आजार/रोगाची लागण, व्यसन, निरंतर रोजगार नसणे, कर्जबाजारी, आर्थिक फसवणूक इत्यादी प्रमूख कारणांमुळे ऊसतोड महिला कामगार ऊसतोडणीच्या व्यवसायाकडे वळाल्या असल्याचे निष्पन्न होते.

७. ऊसतोडणीमुळे ऊसतोड महिला कामगारांबरोबर त्यांच्या कुटूंबातील व्यक्तींची ताटातुट होते मुले व वृध्दाकडे दुर्लक्ष होते तर अतिकष्टाचे आणि असुरक्षित कामामुळे जखमा, आजार, रोग होतात तसेच मालक वर्गाकडून आर्थिक फसवणूक होते इ. नुकसान ऊसतोड महिला कामगारांचे होत असल्याचे स्पष्ट होते.

८. ऊसतोडणीचे काम सामुहिक असल्याने ऊसतोड महिला कामगारांना इतरही व्यक्तीसोबत नाईलाजाने काम करावे लागते त्यामुळे त्यांना सतत असुरक्षितता वाटते तर अनोळखी व्यक्तीसोबत काम करतांना महिलां लैंगिक अत्याचारास बळी पडतात.

९. ऊसतोड महिला कामगारांचे वय व राहाणीमान यामध्ये सहसंबंध पडताळल्यास स्पियर्सन मापन पध्दतीनूसार -८३२ व स्पियरमन मापन पध्दतीनूसार -८५५ मुल्य प्राप्त होते अर्थात, दोन्ही चलामध्ये उच्च ॠनसहसंबंध आहे म्हणजेच युवा अवस्थेतील महिलांचे राहाणीमान उत्तम आहे तर प्रौढ महिलांचे राहाणीमान चांगले आहेत तर प्रौढत्तर महिलांचे राहाणीमान सर्वसाधारण असल्याचे दिसून येते.

१०. ऊसतोड महिला कामगारांच्या जातीचा प्रवर्ग व लग्नाचे वय यामध्ये सहसंबंधाची चाचणी केली असता, पियर्सन मापन पध्दतीनूसार -४४७ तर स्पियर्सन मापन पध्दतीनूसार -३१५ मुल्य प्राप्त होते अर्थात, दोन्ही चलामध्ये अल्प ॠ नसहसंबंध आहे म्हणजेच अनु.जाती व जमाती व मागसवर्गीय प्रवर्गातील महिलांचा विवाह बाल वयात झाला असल्याचे निष्पन्न होते.

**शिफारशी :** प्रस्तूत संशोधनाच्या शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

**१.** ऊसतोड महिला कामगारांची अधिकृत नोंदणी करणे आवश्यक आहे.

**२.** ऊसतोड महिला कामगारां त्यांच्या अपेक्षाप्रमाणे ऊसतोडीस योग्य भाव देणे गरजेचे आहे.

**३.** ऊसतोड महिला कामगारांठी स्वतंत्र महामंडळाद्वारे योजनांची निर्मीती व अंमलबजावणी करावी.

**४.** ऊसतोड महिला कामगारांना बचतगटाद्वारे स्वयंरोजगाराठी प्रेरीत करुन, चालविण्यासाठी आर्थिक मदत द्यावी.

**५.** ऊसतोड महिला कामगारांमधील नैराश्य व नकारात्मक विचार दुर करण्यासाठी समुपदेशन मोहीम राबवावी.

**६.** ऊसतोड महिला कामगारांचा साखर कारखाण्याद्वारे व शासनाद्वारे विमा काढावा.

**७.** ऊसतोड महिला कामगारांना संघटीत कामगारांच्या सुविधा प्रदान कराव्यात.

**८.** ऊसतोड महिला कामगारांवर कौटूंबिक हिंसाचार करीत असलेल्या व्यक्तीविरुध्द कडक कार्यवाही करुन, पिडीत महिलांना जलद स्वरुपात न्याय द्यावा.

**९.** ऊसतोड महिला कामगारांना शासकीय योजनांचा लाभ घेतांना कागदपत्रामध्ये शिथिलता द्यावी.

**१०.** ऊसतोड महिला कामगारांमधील अंधश्रध्दा कमी करण्यासाठी विशेष जनजागृती मोहिम राबवावी.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1. *अभिमन्यू रा. ढोरमारे, पुंडलिक वि. रसाळ, (२०१५) सामाजिक मानसशास्त्र, उन्मेष प्रकाशन, पुणे पृ.क्रं.१५५*
2. *कॉ.कुमार शिराळकर, मुक्ता कुलकर्णी, विवेक घोटाळे, सोमिनाथ घोळवे (२०१८) ऊसतोडणी मजूराचं स्थलांतरित जगणं, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स,प्रा.लि., पुणे (सर्वेक्षण अहवाल)*
3. *डॉ. कालिदास मा. भांगे (२०१२) स्त्री-ऊसतोड कामगार, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद (Ph. D. शोध प्रबंधपर ग्रंथ)*
4. *प्रताप बापूसो लाड (२०१८) सहकारी साखर कारखान्यातील ऊस तोडणी कामगार व वाहतुक कामगारांची गरज व उपायायोजना, Monthly Multidisciplinary Research Journal Golden Research Thoughts, Chief Editor Dr. T. N. Shinde, Solapur*
5. *https://marathivishwakosh.org/२२२०२/*
6. *https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/१०६०३/२३४९९/६/०६_chapter%२०१.pdf*
7. *https://shodhganga.inflibnet.ac.in/bitstream/१०६०३/९७२२९/११/११_chapter%२०६.pdf*
8. *http://१४.१३९.११६.२०:८०८०/jspui/bitstream/१०६०३/९७१९४/१२/१२_chapter-५.pdf*
9. *http://makamaam.in*


* * *

# मंदिर परिसरातील उपेक्षितांचे अंतरंग (12 खांबी मंदिर, अंबाजोगाई जि. बीड)

*डॉ.मोहन मिसाळ*
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय
सोनपेठ. जिल्हा परभणी
मो. नंबर 9405814989

दि 22जाने.2017 रोजी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे हनुमंत पोखरकर यांनी बांधावरील झाड तोडत असताना त्यांना काही मुर्त्या सापडल्या. यानंतर त्यांनी जेसीबीच्या साह्याने ही जागा खोद्दी असता संपूर्ण बारा खांबी मंदिराचा सांगाडा सापडला. या बारा खांबी मंदिरलाच सकलेश्वर मंदिर असेही म्हणतात.अंबाजोगाई मध्ये सापडलेले हे मंदिर यादव घराण्यातील सिंघम देवाचा मंत्री खोलेश्वर याने 1128 -29 या काळात निर्माण केले या मंदिराला बारा खांबे असल्याने त्याला बारा खांबी मंदिर असे म्हणतात.या बाराखांबी सभामंडपाची रचना अशाप्रकारे करण्यात आली आहे की कोणत्याही बाजूने प्रवेश केला तरीही आपल्या बाजूला केवळ सहा खांबदिसतात. या खांबावर डोक्यावर दिवे धारण केलेल्या सप्तमातृका कोरलेल्या आहेत ,शिवाय डोके तुटलेल्या काळा पाषाणातील नंदीही आहे. गर्भगृहात शिवपिंड आहे. मंदिराच्या बाहेरील भिंतीवर पद्मासनात गौतम बुद्धाची मूर्ती आहे. त्याचबरोबर अस्थिपंजर झालेले शरीर आणि हातात भिक्षापात्र असणारे बुद्धाची मूर्ती लक्ष वेधून घेते.ध्यानस्थ बुद्धाची मूर्ती या उत्खननात सापडली आहे .याशिवाभैरव ,विष्णू, पार्वती, नाग देवता, मातृदेवता, सुरसुंदरी ,खंडोबा इत्यादी देव देवतांची शिल्पे येथे मोठ्या प्रमाणात सापडली आहेत.या मंदिराची शैली ही उत्तरव दक्षिणेतील नागर व बेसर पद्धतीचा सुरेख संगम साधणारी आहे. यादवांचा मंत्री हेमाद्रीयाने आपला ग्रंथ चतुर्वर्ग चिंतामणी यामध्ये तत्कालीन समाजव्यवस्थेचे वर्णन केलेले आहे. त्याचे प्रतिबिंब या कला व स्थापत्यात पडलेले आढळते. ज्यांनी हे बारा खांबी मंदिर निर्माण केले यासाठी कष्ट उपसले त्यांचा मात्र कुठेही उल्लेख आलेला दिसून येत नाही.

प्रस्तुत शोधनिबंधात पुढील उद्दिष्टांचा समावेश केलेला आहे आहे.

1) मंदिर निर्माण करण्यासाठी कष्ट केलेल्या कलाकारांचा शोध घेणे.
2) या कलाकारांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
3) मंदिर निर्माण काळातील सामाजिक रूढी परंपरा यांचा अभ्यास करणे.
4) मंदिर परिसरातील शिल्पांचा अभ्यास करणे

संशोधन पद्धती –

प्रस्तुत शोधनिबंधात साठी प्रत्यक्ष उत्खणान स्थळास भेट देण्यात आली. याच बरोबर इतर दुय्यम साधनांचाही वापर करण्यात आला.

भारतीय समाज हा विविध जाती जमातींनी युक्त होता. या जाती-जमातींच्या आपापल्या विधी प्रथा परंपरा होत्या ."प्राथमिक अवस्थेतील समाजात पुजारी हा पितृसत्ता गटात एका जमातीचा पुढारी कुलप्रमुख अथवा आपल्यापेक्षा संपूर्णपणे वाहिलेला समर्पित वृत्तीचा वैद्य असे अथवा मातृसत्ताक व्यवस्थित एक देवतेची प्रमुख अथवा मातृसत्ताक व्यवस्थेत ती एक देवतेची प्रमुख चारणी अथवा भिक्षूनि संघाची सदस्य असे. पुढे आर्य ब्राह्मण लोकांनी उत्तरेकडून आक्रमणे करून महाराष्ट्रावर आधी राज्य प्रस्थापित केले यामुळे इंडो-आर्यन संस्कृती मिश्रण घडून आले"1असे मत डी.डी. कोसंबी यांनी व्यक्त केले आहे म्हणूनच इरावती कर्वे यांनी "महाराष्ट्रीय लोक इंडो-आर्यन भाषिक गटातील भाषा बोलतात परंतु त्यांचे विधी व त्यातील घटक हे मात्र

द्रविड रक्तसंबंध दर्शवितात”2 असे प्रतिपादन केले आहे यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रातील लोक लोकांचा रक्त संबंध हा आर्या पेक्षा द्रविडलोकांकडेजास्त जुळलेला दिसून येतो.

देवतेची उत्पत्ती आणि विकास- प्राचीन काळातील मानव हा निसर्गपूजक होता.आपल्या इच्छापूर्तीसाठी तो वेगवेगळया मातीच्या अथवा दगडाच्या मुर्त्या3 करून त्याच्यापुढे आपले गाऱ्हाणे मांडत असे. कित्येकदा आपले पूर्वज किंवा माणसाच्या प्रतिनिधी- नाही देवतेच्या स्वरूपात ते पूजा करीत. त्यांना वेगवेगळ्या प्रकारची स्थानिक नावे देण्यात आली होती. उदाहरणार्थ मेगाई मागाई सोगजाई,सटवाई, मरिआई ,खंडोबा ,धारोबा, ज्योतिबा इ. या देवतांचे पूजाविधी ही अत्यंत साधे होते परंतु पुढे या आर्य ब्राह्मणांनी या समाजात घुसखोरी केली. ज्या ईश्वरी देवता आर्य ब्राह्मणांच्या नव्हत्या, त्या देवतांचा ही समावेश त्यांनी आपल्या देवता मंडळात केला. त्यासाठी नवीन धर्मग्रंथ,पुराने ,काव्ये, स्मृती ग्रंथ, निर्माण करण्यात आली 4.”या नव्याने सामावून घेतल्या गेलेल्या प्राचीन देवतांची पूजा म्हणजेच सांस्कृतिक एकीकरणाच्या तंत्राचा उघड देवाण–घेवाण याचा भाग होता”.5

परंतु या सांस्कृतिक देवाण–घेवाणीचा हेतू शुद्ध नव्हता उलट वैदिकांनी इतर देव देवता चा समावेश आपल्या देवता मंडळात करून.स्थानिक लोकांनाही आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला. याचे पुरावे आपलयाला बारा खांबी मंदिर परिसरातही आढळले.गौतम बुद्धआणिइतरवैदिक देवी–देवतांचाशिल्पे आढळून आली आहे. गौतम बुद्धाचे विचार आणि वैदिकांची विचारसरणी ही परस्पर भिन्न आहे. असे असताना जेव्हा बुद्ध विचार संपवता आले नाही,तेव्हा बुद्धालाच आपल्या मध्ये समाविष्ट करून घेण्याचा हा बाराव्या शतकातील प्रयत्न दिसतो. यासंदर्भात डी डी कोसंबी म्हणतात “एखाद्या देवाच्या पूजेचा प्रसार आणि लोकप्रियता खूप वाढली की तो देव शिव किंवा विष्णू म्हणून असे देवता पार्वती लक्ष्मी किंवा अशीच एखादी ब्रामणीदेवता म्हणून ओळखल्या जाते”6

**कलाकारांची हेळसांड**

कोणतीही वास्तू किल्ला राजवाडा अथवा मंदिर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तेथील उभारलेल्या शिलालेखातून वास्तू निर्माण केलेल्या राज्यांची देणगीदार यांच्या नावाचा उल्लेख करण्यात येतो. परंतु प्रत्यक्ष ज्यांनी ही वास्तू निर्माण केली दिवस–रात्र मेहनत घेतली, त्या कलाकारांचा त्या मजुरांचा साधा उल्लेखही कुठेही आढळून येत नाही. अंबाजोगाई येथील बाराखांबी.मंदिरात शिलालेख खोलेश्वर याचाचत्उल्लेख येतो. प्राचीन काळापासूनकलाकाराकडे धर्म धुरिणांनी केवळ दुर्लक्षच केले. शिल्पकला /वास्तुकला निर्माण करणाऱ्या कलाकारांना धर्म वराजदरबारी खालचे स्थान देण्यात आले..त्यांना वेळप्रसंगी बक्षीस दिले गेले परंतु युरोपमध्ये कलाकारांचा मानसन्मान ज्या पद्धतीने झाला त्या पद्धतीने मात्र भारतीय कलाकारांचा मानसन्मान सामाजिक प्रतिष्ठा मात्र बहाल करण्यात आलेली दिसून येत नाही. या कलाकारांना कर सुद्धा भरावे लागत असे.त्यामुळे त्याचे वर्णन डॉ डी. एन. झा यांनी पुढीलप्रमाणे केले आह.”उत्पादित वस्तूच्या स्वरूपात कर गोळा केले जावेत.कारूम्हणजे कारागीर हे जास्तीत जास्त शुद्र होते जसा काळ गेला तसा बिगारी च्या उपयोगाची मागणी त्यांचा अत्याचारीपणाकडे झुकू लागली”7

कलाकार हे शूद्र जातितुनच निर्माण झाले होते. त्यामुळे त्यांच्या श्रमाला मूल्य न देता त्यांची छळवणूक करण्याचे धोरण तत्कालीन राज्यकर्ते, सरदार व ब्राह्मण वर्गाने केले. एकीकडे श्रमिकांचे श्रमाचे मूल्य घेत असताना इकडे ब्राह्मण वर्गाला मात्र सर्व करातून सूट देण्यात आली.यामुळे कराचा बोजा सर्वसामान्य जनतेवर पडला.मनु म्हणतो “विनाशाची वेळ आली तरी राजाने क्षोत्रीयापासून (ब्राह्मण) कर वसूल करू नये, कारण ब्राह्मणांनी संचित केलेल्या धार्मिक पुण्याचा वाटेकरी राजा आहे ब्राह्मण विद्वान असो अथवा नसो सर्वच ब्राह्मणांना करातून सूट होती.”8

**मंदिर निर्माते–**

मंदिराच्या निर्मितीसाठी राजा मोठा अधिकारी जमीनदार अथवा धार्मिक व्यक्ती प्रयत्न करीत असे परंतु प्रत्यक्ष मंदिराचे निर्माते हे विविध जाती धर्मात विखुरलेले आपल्याला पुढील प्रमाणे दिसून येतात.

1) **बेलदार**

बेलदार म्हणजे बेल किंवा फावडे ,टिकास खांद्यावर घेऊन जाणारा किंवा गवंडी काम करणारा होय।बेलदारा मध्ये सुद्धा चुनाभट्टीचा काम करणारा चुनकर आणि छिन्नीने दगड कापणारा थापटरकरया पोट जाती होत्या. या बेलदारयांनी गावकोट ,दरवाजे, राजवाडे बांधण्याचे काम केले.

2) **चितारी/ जिनगर**

रसेल /हिरालाल9 यांनी चितारी जातीला संमिश्र व्यावसायिक गटात समाविष्ट केले आहे. चर्मकला चित्रकला लोहार काम आणि सुतार काम असे कौशल्याचे काम या जातीने केले.याशिवाय घराच्या भिंतीवर चित्र काढणे तोंडावर लावायचे वेगवेगळे मास्क तयार करण्याचे काम त्यांनी केले. जातीव्यवस्थेत ते अस्पृश्य समजल्या गेले.

3) **काचार/कासार**

अंबाजोगाई येथील विविध मंदिरातील शिल्पकलेत सुरसुन्दरी नी विविध प्रकारच्या बांगड्या हातामध्ये घातलेल्या दिसून येतात वेगवेगळया जातीनुसार बांगड्या घालण्याची पद्धत होती बंजारा स्त्रीलाखेच्या बांगड्या, मारवाडीस्त्रीहस्तिदंता पासून तयार केलेल्या बांगड्या धनगर स्त्री नारळाच्या वरवटी पासून आणि बंगालीस्त्री ही शंखाच्या कवचाच्या बांगड्या घालत असे. काचेच्या बांगड्या ची सुरुवात तुर्कांनी10 केली. या बांगड्या भरणाऱ्यांना काचार अथवा कासार म्हटले गेले त्यांनाही समाजात कनिष्ठ जातीचे मानले गेले.

4) **कैकाडी**

मध्ययुगीन कालखंडामध्ये राजे लोक हे भवन, मंदीर, जलाशय, प्रासाद निर्माण करीत असत. त्यासाठी त्यांना दगडाची आवश्यकता होती. हे दगड खाणीतून काढणे, फोडणे, घडविणे.हे काम कैकाडी समाजाकडे होते. शिवाय धान्य दळण्यासाठी जाते व माणसाला वाटण्यासाठी पाटेनिर्माण करण्याचे कामही कैकाडी समाजाने केले, मात्र हा समाज आजही गावकुसाबाहेर राहिला आहे.

5) **कोहळी**

मध्ययुगिन काळात विहिरी ,तलाव, पाण्याची टाकी आणि बांध निर्माण करणे हे जिकरीचे व कष्टाचे काम होते. हे काम पावरा पोवरा आणि कोलाम लोकांनी केले. यामुळे लोकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय झाली परंतु आजही हा समाज अतिमागास म्हणूनच गणला गेला आहे.

6) **ओतारी**

धातु वितळून तोओतणेव त्यापासून देवी-देवतांच्या मूर्ती तयार करणे ,तांब्या-पितळेची भांडी तयार करणे, मातीतून लोखंड काढणे, वेगवेगळे हत्यारे तयार करणे. इत्यादी कामे ओतारी व माडिया गोंड ह्या जमाती करत असे. परंतु आजही या जाती जमाती मागास म्हणून ओळखल्या जात आहेत.

7) **पांचाळ**

सोनार लोहार सुतार तांबट शिल्पकार यांना मिळून पांचाळ ही जात आली सोन्या चांदीचे दागिने घडविणे पितळ व लोखंड यांच्या मूर्ती तयार करणे ही कामे पांचाळ करीत अंबाजोगाई येथील शिल्पा मध्ये देवी-देवतांचे दागिने व अलंकार धारण केलेल्या दिसतात या दागिन्यांमध्ये मुकुट करण्या कुंडले उदार बंद गळयात हार कंगन कमरेवर मेखला पायात तोडे इत्यादीचा समावेश होतो कवार ही छत्तीसगढमधील आदिवासी जमातीत ही पुरुष सोन्याच्या किंवा चांदीच्या अंगठ्या मनगटात चांदीचे कडे तरी आपल्याकडे गळयात सोन्याचे व चांदीचे साखळया कर्णफुले धडक की नाबाद नाकात सोन्याच्या

फुली व कमरेला चांदीचा कंबर पट्टे किंवा साखर घालतात पायात चांदीचे पैंजण घालतात यावरून स्पष्ट होते की देवी-देवतांच्या दागिन्यांची निर्मिती ची कल्पना ही आदिवासीच्या जागेवरून घेतली असावी वरील सर्व जाती जमातीच्याचकामाचा उल्लेख करणे नसल्याने केवळ मोजक्याच जाती जमातीचा उल्लेख या शोधनिबंधात करण्यात आला आहे.

**समारोप**

तत्कालीन राजे सेनापती सरदार अथवा व्यापारी वर्ग हा मंदिर निर्माण करण्यासाठी तत्पर असे मंदिरामुळे व्यापारास चालना मिळाली व्यापारी वर्गाने आणि पूर्वीचा हिने लोकांच्या श्रद्धांचा बाजार मांडून प्रचंड नफा कमविला परंतु यांनी निर्माण करण्यासाठी श्रम केले त्या श्रमिक वर्गात मात्र अस्पृश्य किवा जातीबाहेर ठरविण्यात आले त्यांना हालाखीचे जीवन जगण्यास भाग पाडण्यात आले या "धार्मिक विधीचाकलनेहमी परिवर्तन विरोधी राहिला"11

परिणामी अल्प जन सुखी संपन्न बनले पण बहुजन मात्र कफल्लक बनले प्रथम देवाची निर्मिती त्यानंतर देवतेची स्तुती ग्रंथ यातून जनतेच्या धर्मभोळेपणा त्यातून मंदिराची निर्मिती मंदिरातून अर्थसंपन्न आता अर्थसंपन्न येथून राखी सत्ता व राजकीय सत्तेतून पुन्हा जनतेवर अन्याय-अत्याचार अशी मालिका सुरू झाली ती आजही कायम आहे

**निष्कर्ष**

प्रस्तुत शोधनिबंधाचे निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत

1. अल्पजनांनी मंदिराची निर्मिती करून आर्थिक संपन्नता प्राप्त केली.
2. ज्या कामगारानेर श्रम कडून विविध वस्तूंची निर्मिती केली त्यावर मात्र जातीबाहेर ठरवून अन्यायच झाला.
3. श्रमिकांचेमोल झाले नाही.

**संदर्भग्रंथसुची**

1) कोसंबीडी.डी-भारतीयइतिहासाचाअभ्यास, पुणेडायमंडप्रकाशन, प्र.आ.2006,प्र.26
2) ----कित्ता........पा.52.
3) .......कित्ता.....पान195.
4) ......कित्ता......पान 189.
5) कित्ता........... पान191.
6) .....कित्ता.....पान 232.
7) Dr.Zha. D. N.-Revenuesystem in post Maurya and Gupta times,Pune Diamond publication,2006,page 49.
8) कित्ता......पान 119.
9) डॉ. देवरुखकर-आदिवासीसमाज, पुणे. 2006,पान 99
10) कित्ता...... पान105.
11) कोसंबीउपरोक्तपान112.

# Women Explotation and Gender Justice

MR. S. G. DHAWAD
Kumbhalkar College Of Social Work
Wardha

In spite of literacy and increased rate of women education, atrocities against women have become the most serious social evil of contemporary Indian society. If through literate common women of the every social reality of India are unaware of the dynamic concept of equality of sexes which the Indian constitution guarantees. Few women of those who are aware use of low to fight bact, they being traditionally opperessed and serve in all social institutions like family, cast , community religion, politics etc. subjugated to man. Despite the promises of legislative favours the identities like women, Dalit and tribal etc. Experience discriminations involving cultural resources in forms subtler than that the common sense can grasp. The relevance of knowing how the social structure reproduces such forms of discrimination is only proportional to the urgency of resisting such discriminations.

Atrocities towards women are forms of oppression hindering the development of women and thereby resulting in gender injustice, this being ideologically supported by a value system, which is androcentric and gender insensitive. Deepening inequalities and struggles by the oppressed section to assert their have unleashed retaliations by the more privileged and, women situated as they are in the social matrix as non-free, dependent subjectivities, become specially affected ones. Irrespective of caste, class or religion women are socio-cultural dependents in our society, having no roles of decision making capacities whether it is family, community, politics religion, or any walk of life, if through law provides formal equality and properly rights cultural norms are against the decisive role of women at the time of sharing of properties Interconnectedness of the property right and the personal laws plays an ant women role. It is clear that rules, positions prestige and property are with men and norms, regulations and proper behaviour, obedient character are for women in a social system which is male-oriented and male determined.

Democratic rights, granted in principle, are nullified by the social institution where women have subordinated status. The process of development have increasingly separated the public from the private and enlarged the public sphere with more formal institution as against the earlier less formal community, cast, and neighbourhood institutions. Public institutions often provide scope for women, for e.g. law, to escape from traditional constraints. However access to formal institutions is limited for women and the ideologies of many public institutions themselves reinforce traditional subordination. Hence women are restricted from utilizing the facilities democracy offer and once again they become more cribbed and confined to the dark interiors of the whole society.

"Both in its day to day conduct and in its enduring structures the social life today show a staggering indifference to matters related to the protection of rights and securing of duties, Justice in social affairs is the harmonious blending of rights and duties of concerned human agents and also the guarantee that no one is made underprivileged by this orchestration i.e. no person or position enjoy advantage at the cost of the other. In this sense justice permeates the body of most of the social institutions. Yet they hardly figure among the right whose protection is guaranteed by the constitution. These rights sometimes receive articulations through social revolutions and political struggles. But most often they lie indistinct. Muffled by the voice of common sense that is eagerly nurtured by our media establishment and cultural leadership.

The question of justice deserves special attention in today's socioeconomic circumstance. Planning and development actives push greater and greater number of social groups to the margins. They are victims of collective forgetfulness. At a time when these groups begin to break their silence and assert themselves, it is only relevant and significant to inquire into the nature of this forgetfulness and consider the question of justice it raises, while pledging solidarity, Only a systematic research in to the working of the social institutions, i.e., their modality and structure, can reveal in the figure of social institutions, i.e., their modality and structure, can reveal in the figure of social life the rights and duties of its participants, The real forms that sustain and is sustained by the common sense could thus be made to stand face to face with us. This enables the human agents to intervene in the construction of i.e. the common-sense" (Dr Nizar Ahmed, Prayoga Trust 1996)

**CONCEPT**

Atrocity is an act which accompanies force, committed to prove or feel a sense of the force, which provoke or questions the values and feelings one treasure for the whole life, it is the violation of the guarantee that no one is underprivileged or disadvantaged by the orchestration of the harmonious blending of right and duties of the human agent involved. The aim of atrocity is to induce the underprivileged sections to comply with the wishes of the more privileged, thereby.

Any individual or group facing the threat of coercion or being disciplined to act in a manner required by another individual or group is subject to violence. This is not necessarily confined to physical violence by the creation of an atmosphere of terror, a situation of threat and reprisal. The concept of gender is constructed by and through humans that is socially effective as the division between female and male, which is deeply woven into the organization of institutions and everyday life in the social area the effect of which is that, it is not just a division but an asymmetry with men having more power and status Gender is not natural and it can be understood as the set of meanings, expectations and roles that a particular society ascribes to sex. It is the socio-cultural make up and the human beings who internalize the same through socialisation that recognize these situations as masculine and feminine characteristics which are ascribed ones.

Gender is a construct that can be clearly seen in the day today human life realities. But as and when we try to disentangle the life situations it leaves behind so many complexities that construct and reconstruct the very human life. The concept that gender is constructed through self-reflexivity and it becomes effective only through the social, tempts us to analytically examine the arenas like gender based roles, gender relation, self, identify, the social gender perception etc.

Common sensually gender is understood as the division between man and woman, based on the bearing of their body at the time of their birth human bodies having the male sex organs are commonly considered as males and those having female sex organs are considered females. But the process of gendering is something more than that and once named male/female it works almost independently of the bodies to which it belong. In all spaces such as that of socialisation of children, social positioning, experiences, conceptual formations and cultural mediations it is tactile and present, Through the cyclic processes it creates the cobwebs of the organisations of the entire social institutions and the self-formation and self-expression of each human being. Body of each human being has a role in the process of defining its self. But it doesn't mean that the very same body is there in the definition of itself. The same can be applicable to gender also i.e. the sexual appearance of a human body plays its part in the process of defining the gender. But it need not have any role in the definition of gender, the thereby social structural, and legitimating of patriarchy. This shows that once constructed gender works independently of the sex. In effect this constructs and reconstructs gender works independently of the sex. In effect, this construct and reconstructs gender disparity creating social spaces of domination and prestige for men and the subordinate roles for women resulting in reinforcing and reinforcing and reifying the structural properties of the social and the patriarchal system thereby. Though it is structured in a peculiar way gender is determined not in an ultimately unchangeable and unquestionable manner. Perhaps, men and women who go through experience and thereby crates the upper and Lowe stratification of being masculine and feminine may have the belief that it is quite natural and normal. The condition that they accept it without even an iota of doubt in turn becomes the basement for strengthening the gender disparity.

The constitution promises formal equality to man women but the structure and functions of the society through its institutions norms values and etc., is in a peculiar way that man is getting the privileges and advantages and women is underprivileged and disadvantaged, there starts the enquiry what is gender justice. This enquiry takes us to terms like patriarchy, discrimination, sexual division of labour and so on. Any hierarchical system of domination and subordination victimises the weaker sections and the victimisations can vary from subtle pressures and through the power of ideology and socialisation or open brutal oppressions.

The social institutions addressed in this study e.g. family, marriage etc. are maintained and reproduced in such a way that the very structuration of these institutions are based on unbalanced power-relations of the interacting agents and the male oriented

privileges of the whole institutional set up. This power relation in and by itself creates a hierarchy in the areas of resource allocation, distribution etc. where in women are treated as Bing subservient to men common seismically. Our anxiety is that, from such a social reality, how we can be so sure about the reliability of the details received from the fieldwork, as those will be half revealed facts or orally transmitted stories.

Confusion concerning the unpredictability of a situation may make the affected subjectivities inactive to an atrocity. For example, in the case of an issue of wife beating for reasons known and unknown the wife may go on suffering the same. Why wife beating is repeatedly happening in a unit being a wife and beating a wife is considered as a normal situation in our patriarchal social situations. As privilege and advantage the main attains by being husband is legitimised through the action of beating and the wife is supposed to contribute to maintain and perpetuate the institution of marriage by being his subordinate. It is noteworthy that the beating and battering a girl or a woman gets from the home during the making of a girl or a women is not even identified as atrocity and there is no special socio=legal provision to question such acts. In such a situation, if one identify woman beating as an atrocious act, there is a chance that the affected Subjectivity does not understand or not reaching to that understanding it goes unreported and so unnoticed in the phenomena.

**Atrocities against women**

1. Rape :- a violation of female's integrity and dignity as a person by forced sexual intercourse, the social basement of which is patriarchy perpetuating the concept that women as property of men
2. Dowry
3. Dowry tortures and dowry death
4. Seeing female body as sex object
5. sexual Harassment :- Assault or unwelcome behaviour as a} physical contact b}a demand for sexual favour c} sexually coloured remark d}showing pornography e} tempting to engage in prostitution
6. Domestic violence
7. Female child labour
8. Sexual division of labour
9. Subordinate marital status: wife beating looking down upon females etc.
10. Any unwanted sexual experience or mental trauma experience by women that might have remained never disclosed
11. female infanticide
12. Suicides and murders of mothers and children single or gang
13. Kidnapping and abduction
14. Denial of opportunities :-just for being females

This study is on the realities of lives of women. It had helped in contributing to the interactions and experiences of the persons studied. This study helps us to understand the issues of justice in the events of intimate man woman relationship. The hope is that it will sensitise the whole social about the visibly invisible violence in

human interactions through awareness programmes for the prevention of occurrence of violence, anticipating transformation in the very perception of human agent's involved in particular day to day life situation

**Reference**

1. Ahmed Nizar, 1977-2000 prayoga trust proceeding, social science research group Kozhikode
2. S. P. Sathe Towards gender justiced RCWS Gender Series
3. Sobha P V Prayoga Trust Orma Poovattuparambu Kozhikode Understanding gender justice and atrocities

* * *

"Go to the people,
Live among them,
Learn from them,
Love them.
Start with what they know
Build on what they have"

**BOOK-POST**

To, ____________________

____________________

____________________

____________________




Printed and Published by Dr.Prakash B. Jadhav, Principal, Manavlok's College of Social Work, Ambajogai, Post Box No.23, Ring Road, Ambajogai Dist. Beed, Pin-431517 (MS) at AAI offset, Shop No. 11, Raje Shivchhatrapati Vyapari Sankul, Ambajogai, Dist. Beed.